# प्रकरण तिसरे

## "बी"ची कविता

3.1 प्रस्तावना :-

"फुलांची ओंजळ" या काव्यसंग्रहातील कविता यापूर्वीच कवी "बीं"नी महाराष्ट्र शारदेच्या सेवेसाठी वाहिलेल्या आहेत. त्या कवितांचा सुगंध आजही दरवळत आहे, आणि तो आपल्या सर्वांना माहितच आहे. कविवर्य "बी" हे वयाने केशवसुत, रे. टिळक, विनायक यांच्या पिढीत येतात. पण काव्य निर्मितीच्या बाबतीत मात्र ते गोविंदाग्रज, रेंदाळकर, बालकवी यांच्या कालखंडात समाविष्ट होतात. त्याला कारण म्हणजे त्यांनी आपल्या काव्यलेखनास फारच उशिरा सुरवात केला. उशिरा म्हणजे जवळ जवळ आयुष्याचा मध्य ओलांडल्यानंतरच. वयाच्या चाळीशीच्या आसपास त्यांनी काव्यप्रांताकडे झेप घेतली. कवी "बी" हे प्रतिभावंत असले तरी त्यांची प्रतिभा अंकुरित व्हायला उशीर लागला. अर्थात त्याला काही कारणेही असतील, कदाचित अगदी लहान वयात माता-पित्याचे छत्र उडून गेले. त्यामुळे त्यांच्यावर कुटुंबपोषणाची जबाबदारी पडली. प्रापंचिक अडचणीमुळे "बीं"ना काव्यलेखनाकडे लक्ष देण्यास वेळ मिळाला नसेल. काव्यलेखनच काय, पण कोणत्याही प्रकारचे कार्य करायचे म्हटल्यानंतर त्याच्यावर वातावरणाचा परिणाम नक्कीच होत असतो. कवी "बीं"ना काव्यलेखनास अनुकूल असे वातावरण मिळाले नसेल. परिस्थितीच्या नैराश्याच्या भोव-यात जणू काही ते अडकले होते. जीवनाच्या सुरवातीपासूनच त्यांच्या आयुष्यात एकामागून एक अशी संकटांची मालिकाच होती. ती संकटे आपण त्यांच्या चरित्रात प्रकरण एक मधे पाहिली आहेत. त्यामुळे त्यांच्या मनाला मनस्वास्थ मिळाले नाही. कदाचित त्यामुळेही त्यांच्या हातून काव्यलेखन घडले नसेल. व्यक्तीच्या भावजीवनाला उमलविण्याचे सामर्थ्य असणारी कोणी व्यक्ती पाठीशी असेल तर प्रतिभा भरारी मारू शकते.

त्यांच्या संपूर्ण काव्याचा, चरित्राचा अभ्यास केला असता असे दिसून येते की, "बी" कवींची कोणत्याही समकालीन कवींशी गाठ मैत्रीचे संबंध होते असे वाटत नाही. एवढेच नव्हे तर ओळख सुध्दा होती की नाही याबद्दल शंका येते. कोणत्याही प्रसिध्द साहित्यिकांशी अगर टीकाकारांशी त्यांचे कधी सख्य, रहस्य जमलेले दिसत नाही. शिवाय कुटुंबातही ते मोठे होते. त्यातही थोडासा एकलकोंडा स्वभाव, मितभाषी त्यामुळे त्यांना प्रेरणा देणारे कोणी असेल असे वाटत नाही. ते काहीही असले तरी कवी "बीं"च्या प्रतिभाबीजाला खतपाणी मिळून अंकुरित होण्यास आयुष्याचा मध्यकाळ लोटावा लागला ही गोष्ट मात्र खरी.

हळूहळू त्यांच्या काव्याचा परिचय महाराष्ट्राला होऊ लागला. उशिरा का होईना पण एक प्रतिभावंत कवी म्हणून रसिकजन त्यांच्याकडे पाहू लागला, वळू लागला. त्यांच्या काव्याची ओळख, परिचय रसिकांना त्यांच्या कवितेतून मोठ्या प्रमाणात झाली. तरीही त्यांच्या व्यक्तित्वाची ओळख मात्र महाराष्ट्राला फारच उशिरा झाली. आणि ती ही आचार्य अत्र्यांच्या प्रस्तावनेमुळे. "फुलांची ओंजळ"च्या प्रस्तावनेत आचार्य अत्रे म्हणतात, "विद्यमान कविवृंदात वयाने व गुणांनी जे वंद्य व आदरणीय कवी समजले जातात. त्यांच्यामधे कविवर्य 'Bee' यांचे स्थान निःसंशय थोर आहे. ते नावाने जरी B असले तरी त्यांचे कर्तृत्व $A_1$ दर्जाचे आहे. ही गोष्ट एखादा बालकवीही कबूल करील. म्हणून त्यांच्या नावाचा व कृतीचा उल्लेख होताच आधुनिक तरूण कवींच्या माना मुजऱ्यासाठी खाली लवतात."[१]

कवी "बीं"ची कविता सलग अशी झालेली दिसत नाही तर ती अडखळत, विराम घेत झालेली दिसते. "कवी "बीं"ची पहिली कविता "प्रणयपत्रिका" १८९१ मधे प्रसिध्द झाली. १९११ ते १९२२ या अकरा

वर्षांत ३३ कवितांची निर्मिती झाली. १९२२ ते १९२८ या सहा वर्षांत ५ कवितांची निर्मिती झाली. पुढे निर्मितीला विराम. पुन्हा १९४६ मध्ये अकरा वर्षांनंतर १० कविता."[२] म्हणजेच त्यांची ही काव्यनिर्मिती अखंड ओघवती नाही. ती अडखळत विराम घेत घेत झालेली दिसून येते.

एका बाजूने त्यांच्या कवितांचा नावलौकिक झपाट्याने होत चालला होता. तेवढीच दुस-या बाजूने त्यांच्या व्यक्तित्वाची जाणीव बुजत चालली होती. "बी" कवीचे व्यावहारिक नाव श्री.नारायण मुरलीधर गुप्ते हे आहे ही गोष्ट आजच्या पिढीला जितकी अज्ञात आहे तितकीच ती त्यांच्या काव्यनिर्मितीच्या वेळीही त्यांच्या पुष्कळ वाचकांना आणि समकालीन कवींना अज्ञात होती. मुळातच त्यांची वृत्ती प्रसिध्दीपराङ्मुख असल्यामुळे त्यांच्या कवितात आत्मचरित्रपर उल्लेख कुठेही आढळून येत नाही इतकेच नाही तर त्यांच्या कवितेवरुन त्यांच्या आयुष्याचा किंवा नावा गावाचा ति-हाइताला पत्ता लागणे कदापि शक्य नाही. त्यांची कविता आत्मलक्षी नसल्यामुळे संसारातील किंवा वैयक्तिक अनुभवाचे, सुख-दु:खाचे वर्णन आपल्याला त्यांच्या काव्यातून दिसत नाही. प्रापंचिक जबाबदारी व अनेक अडी-अडचणींना तोंड देत देत ते कविता लिहित होते. तरी सुध्दा त्यांच्या या संपूर्ण काव्यात निराशेचे सूर कुठेही उमटलेला दिसत नाही. म्हणून चिंतामणराव कोल्हटकरांनी कवी "बीं"ची मृच्छकटिकातील चारुदत्ताशी तुलना केली आहे. कोल्हटकर म्हणतात -

"बीं"ची सांपत्तिक स्थिती चारुदत्तासारखीच हलाखीची असली तरी चारुदत्ताप्रमाणे विमनस्कतेने किंवा खिन्नतेने त्यांना ग्रासले नव्हते. याउलट खेळीमेळीने बोलत, प्रसन्न हसत व दारिद्र्याचा उपहास करीत."[३] आपल्या दारिद्र्याचा नकळत देखिल यत्किंचितही उल्लेख त्यांनी आपल्या काव्यातून केलेला नाही. काव्य लिहिताना लोकाभिरुचिला बळी पडून मागणी तसा

पुरवठा त्यांनी केला नाही. ठराविक ठशाच्या किंवा भडक उत्तान अशा शृंगारिक कविताही त्यांनी लिहल्या नाहित. तर उदात्त अशा प्रकारचे काव्य त्यांनी निर्माण केले.

जे सर्वसामान्यांना मोह घालते, प्रिय वाटते ते कवी "बी"ना मोह घालू शकले नाही. तर त्या नादरूपात्मक प्रत्याक्षाच्या मागे दडलेले सौंदर्य त्यांना मोहक वाटत होते. नादरूपात्मक प्रत्यक्षाची चित्रे त्यांनी रेखाटली नाहीत असे नाही पण त्यातच ते अडकून बसले नाहीत. तर त्याच्या पलिकडे जाऊन त्यात दडलेले सौंदर्य त्यांनी दाखविले.

मुळातच "बी" विचारक होते. त्यांनी काव्यलेखनास आरंभच चाळीशीनंतर केला त्यामुळे त्यांच्या भावनांच्या फुलांची विचारांच्या फळात निर्मिती झाली होती. "ज्ञानप्रकाशा"ने "विद्यमान कवीत तिघे श्रेष्ठ कवी कोण ? असा प्रश्न विचारला होता. त्याचा निकाल तांबे, चंद्रशेखर व बी या अनुक्रमाने लागला होता. वस्तुत: या तिघांच्या भूमिका परस्परांपासून वेगळ्या होत्या. तांबे हे भावकवी होते, चंद्रशेखर हे कथाकवी तर "बी" हे विचारकवी होते."[४]

त्यांची प्रवृत्तीच चिंतनशील असल्यामुळे त्यांचे काव्य विचारपूर्वक लिहलेले दिसते. त्यांच्या विचारात विसंगती, विसंवाद किंवा विरोध दिसत नाही तर विचार स्वच्छ आणि स्पष्ट असे. त्यामुळे त्यांची कविता वस्तुनिष्ठ वाटते. बालकवी हे निसर्गकवी, रे. टिळक हे फुलामुलाचे कवी, गोविंदाग्रज हे प्रेमाचे शाहीर तर कवी "बी" हे विचार कवी आहेत असे दिसते. मात्र त्यांच्या काव्यात भावनाशीलता मुळीच नाही असे म्हणता येत नाही.

"बी" कवींच्या काव्यात जीवनविषयक तत्वज्ञानाचे निरूपण करणाऱ्या कवितांची संख्या अधिक आहे. विचारांचे अतिशय बारीक पापुद्रे हलक्या हाताने उकलून आतील तत्व दर्शन ते कुशलतेने करतात.

त्यामुळे बाह्यस्पाचे वर्णन करता करताच ती वैचारिक बनते. आयुष्याचे रहस्य ज्यामुळे कळेल व प्रगतीचा मार्ग सापडेल असे जीवनाला पोषक असलेले तत्वज्ञान "बी"च्या काव्यात पुरेपूर भरलेले आहे. तत्वज्ञानाविषयी सिसोरे म्हणतात - "तत्वज्ञानाचा अभ्यास करणे म्हणजे आपल्या मरणाचा रस्ता तयार करण्यासारखे आहे."[५] तर फ्रेडरिक द ग्रेटचे म्हणने असे आहे की, "एखाद्या प्रांतातील लोकांना मला जबर शिक्षा करावयाची असेल तर तेथील राज्यकारभार मी तत्वज्ञांच्या हाती देईन."[६] तर एका प्रसिध्द ग्रंथकाराचे वचन असे आहे की, "तत्वज्ञानाने बुध्दीचे समाधान झाले तरी कर्तबगारीचे कंबरडे मोडते."[७] यावरून तत्वज्ञान या शब्दाच्या उच्चारानेच सामान्य माणसाच्याच काय पण जाणत्या माणसांच्या अंगावरसुध्दा काटे उभे रहातात. पण अशा तत्वज्ञानाने खच्चून भरलेल्या कवीता कवी "बी"नी लिहल्या आहेत. यावरून त्यांच्या बुध्दीची साक्ष आपल्याला पटते. म्हणूनच आचार्य अत्रे म्हणतात - Bee हे नुसते Poet नसून Poet and Philosopher आहेत."[८]

कवी "बी"ची कविता ही आशावादी, उदात्त व आध्यात्माचे अधिष्ठान लाभलेली आहे. जीवनात अनेक कष्ट भोगूनही प्रवृत्तीपर आध्यात्मवाद, त्यांनी स्वीकारला. नोकरीत असताना त्यांचा एका योगमार्गीय सत्पुरुषांशी संबंध आला होता तेंव्हापासून ध्यानयोगाच्या अभ्यासात व आध्यात्म चिंतनात ते आपला बराचसा काळ घालवू लागले. त्या अंतर्मुख वृत्तीचा परिणाम त्यांच्या जीवनावर तसेच कवितालेखनावर बराच झालेला दिसतो.

"बी"ची कविता जी आशावादी आहे ते आशावादित्व त्यांच्या अध्यात्मातून स्फुरलेले दिसते. त्यांच्या अध्यात्मप्रवणतेमुळे त्यांची कवीता तत्वगर्भ तर झालीच पण तिच्यातील आशावादाची बैठकही चांगलीच उंचावलेली दिसते.

कवी "बीं"च्या जीवनाचा व काव्याचा आपण जरा बारकाईने विचार केला तर आपणास असे आढळून येते की, "बीं"ची स्वातंत्र्य हीच जीवनकांक्षा होती. "बी" हे स्वातंत्र्यवादी कवी आहेत. असे आचार्य अत्रे ही प्रस्तावनेत म्हणतात. "मात्र हे स्वातंत्र्य आपल्या राष्ट्रापुरते किंवा समाजापुरते आकुंचित स्वरूपाचे नाही."[९] अशी अत्र्यांनी त्याला पुस्ती जोडली आहे. त्यांच्या कवितांचा अभ्यास केला असता असे दिसते की, "कोणत्याही समकालीन कवींच्या काव्याचा सुतराम देखील संस्कार झालेला नाही हे कळून येईल. असेही अत्रे म्हणतात. केशवसुतांनी तुतारी वाजविली म्हणून "बीं"नी "डंका" पिटला अशी टीका "बीं"वर केली गेली. त्याविषयी बोलताना श्री.वा.ना.देशपांडे यांना "बीं"नी पत्रातून लिहले होते की, "केशवसुत आणि माझ्यात कोणतेही साम्य नाही. विनायकांची "दसरा", बालकवींची "धर्मवीर", टिळकांचे "रणशिंग" आणि माझी "डंका" ही एकमेकांची अनुकरणे नव्हेत. समान भावनेने किंवा समान हेतूने प्रेरित झालेल्या त्या कविता आहेत. एखाद्या काळात काही विचार त्यावेळच्या वातावरणात पूर्वीपासून सारखे घुमत असतात. त्यात काही अपूर्वता नसते किंवा तो शोध काही नवीन नसतो. तसेच "माझ्या कवितेचा आधार वेदान्त आहे हे चुकीचे आहे. जर काही आधार असेल तर जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात क्रांती हा एवढा एकच आधार आहे."[१०] म्हणजेच केशवसुताचे अनुकरण म्हणून "बीं"नी काव्यनिर्मिती केलेली नाही, तर ती उत्स्फूर्त आहे. केशवसुतांनी जे दाखवून दिले त्यापेक्षा वेगळे काही तरी शोधण्याचा प्रयत्न "बी" करताना दिसतात. "बीं"नी काव्यविषयक, प्रेमविषयक, सामाजिक, राजकीय,भाषांतरित अशा विविध विषयावर काव्यरचना केलेली दिसते.

## ३·२ काव्यविषयक दृष्टी

आधुनिक कवितेने विषयाचे आणि आशयाचे बंधन पार झुगारुन दिलेले आपण मागील प्रकरणात पाहिलेलेच आहे. बंधन झुगारल्यामुळे या आधुनिक कवितेवर काही विद्वान पंडितांचा रोष होता आणि त्यामुळेच त्यांनी आधुनिक कवितेवर विविध प्रकारचे आक्षेप घेतले, टीका केली. या टिकेला उत्तर देण्यासाठी कवी "बीं"नी निरनिराळ्या कवितांमधून मार्मिकपणे चर्चा केली आहे. "काव्यातील वादभूत स्थलांची काव्यामधेच चर्चा करणारे ते पहिलेच कवी ठरतील"[११] असे आचार्य अत्रे यांनी प्रस्तावनेत म्हटले आहे. ते योग्यच आहे.

कवी "बी" आपल्या काव्यविषयक कवितेत काव्य म्हणजे काय ? काव्यानंद कसा असावा ?, काव्याचे उद्दिष्ट काय ?, कवीचे कार्य काय आहे ? प्रतिभेचे स्वरूप कसे आहे ? इत्यादी सर्व प्रश्नांची त्यांनी आपल्या काव्यविषयक कवितातून चर्चा केली आहे. "बीं"नी आपली काव्यविषयक भूमिका मोठ्या आवेशाने आणि आत्मविश्वासाने आपल्या कवितेतून मांडली आहे.

"बी" कवींच्या काव्याची व्याख्या "सौंदर्याची काव्य" हीच आहे परंतु हे सौंदर्य केवळ अर्थ चमत्कृतीचे नाही हे सांगताना –
कविवंदन – या कवितेत सौंदर्याचे वर्णन केले आहे. हे वर्णन करत असतानाच काव्याबद्दलच्या जुन्या समजुती बाजूला सारुन आधुनिक कवितेकडे सहानुभूतीने पाहिले पाहिजे. हे ही या कवितेत सांगितले आहे.
"बी" कवींच्या काव्याची व्याख्या "सौंदर्यची काव्य" आहे.
काव्यनिर्मितीला लागणारी "प्रतिभा" ही ईश्वरी देणगी असून ती शारदादेवीच्या कृपा प्रसादाने लाभू शकते म्हणून त्यांनी शारदेला व तिचा प्रसाद लाभलेल्या कवींना वंदन केले आहे.

कवी "बी" सांगतात आधुनिक कवितेचे स्वरूप बदलले आहे तर मग तिचे मूल्यमापन करण्याची पध्दतीही बदलली पाहिजे. असे न करता टीकाकार जुन्या पध्दतीनुसार तिचे मूल्यमापन करून योग्य-अयोग्य ठरवत होते म्हणून "बी" लिहितात -

"कारकसंधीरूपें व्याकरणांतिल सूक्ष्मतर
रसरीत्यादिक साहित्यात्यांतिल दगडांचा चूर,
बूझ कशी या नियमे व्हावी तव माधुर्याची,
अगाध लावण्याची, निस्तुळ रूपारीतीची १
-ह्रस्वदीर्घवेलांटीमात्राशास्त्री जीं होती
जुनी मापकोष्टकें जराशी बाजूस सारा ती."

तिच्याकडे जरा विशाल दृष्टीने पाहिले पाहिजे असे "बी" टीकाकारांना सांगतात. त्याचबरोबर मराठी भाषा स्वतंत्र आहे. तिच्याकडे भरपूर शब्द भांडार आहे.

पण काव्य हा फक्त नादमधुर शब्दांचा खेळ नाही. हे सौंदर्य म्हणजे केवळ अर्थचमत्कृतीचे नाही, थाटदार घाटाचे वर्णन म्हणजे सौंदर्य नाही. त्याचबरोबर नीतीपाठ सांगणारे लांबलचक व कंटाळवाणे गाणेही नाही. तर काव्य म्हणजे -

"ऐश्वर्यात्मक सामर्थ्याची निर्माणाक्षमता
अंतरंग ओथंबुन ओसंडे ती "सुंदरता",
केवळ सौंदर्याची स्फुरणे प्रस्फुरणे दिव्य
जिव्हार हे स्वानंदाचे. - "सौंदर्यची काव्य" आणि
हीच त्यांची सुंदरतेची व्याख्या आहे.

हे सांगत असतानाचा काव्यनिर्मितीसाठी लागणारी "प्रतिभा" या विषयीचे आपले मत मांडतात -

"या सौंदर्यस्फुरणा म्हणाती "चैतन्य स्फूर्ति"
प्रसाद भगवंताचे देणे नैसर्गिक शक्ती."

आणि आपले हेच विचार केशवसुत खालील शब्दात सांगतात.

"शारदेने मज मंत्र दिला कानी ।
तसे लिहिले मी काव्य तिचे मानी."

यावरून "बी" आणि केशवसुत यांच्या काव्यशास्त्र विषयक भूमिकेत साम्य दिसते. दोघांनाही कवीचे द्रष्टेपण मान्य आहे. तर प्रतिभेची महती गाताना "बी" म्हणतात -

"देवि शारदा हीच न हे स्थल अभ्यास साध्य
लोकोत्तर काव्याचे हेचि प्रसवस्थल आद्य."

प्रतिभा ही अशी अभ्यासाने साध्य होत नाही म्हणून टीकाकारांना मिस्कील विनोदाने म्हणतात -

"मृगजल पाणी भरुनि रांजणी पठिका फुंकूं दे
सौंदर्याच्या फुंजी आम्हां रूंजी घालूं दे."

"कविवंदन" या कवितेसंबंधी सौ. निर्मला कणेकर सांगतात की, "कवी "बीं"नी श्री.वा.ना.देशपांडे यांना ७-८-२८ ला पाठविलेल्या पत्रात ती अपूर्ण असल्याचे कळविले आहे.[१२] यावरून ती त्यांनी नंतर पूर्ण केली असावी असे म्हणता येते. मात्र तिचा पुढील भाग कुठेही उपलब्ध नाही. व देशपांडे यांनीही तो दिलेला नाही.

कवितेच्या शेवटी श्री शारदादेवीच्या कृपाप्रसादासाठी तिला आणि तिच्या भक्तांना बी वंदन करतात -

"देवि । जशी तूं, तसेच तुझे ते भक्तहि, मज पूज्य
वंदन माझे गतांस, त्यांसहि असती जे आज

अशी प्रतिभेची महती गायिली आहे.

"फुलांची ओंजळ" केशवसुतांचा कवी हा "देवाचा लाडका आहे तर "बीं"चा कवी हा "सृष्टीचा लडिवाळ बाळ आहे." म्हणूनच "बी" म्हणतात -

"सृष्टीचा लडिवाळ बाळ वेल्हाळ कवी धाकटा
अफाट जगहारांत पहिला हिरमुसला एकटा."

त्याचे हे रुसणे पाहून त्याची सृष्टी मात्र कळवळली. त्याचे मन रिझवण्यासाठी त्याला चंद्रसूर्याची खेळणी खेळायला दिली आहेत. त्याचबरोबर

"नक्षत्रांची, चटक फुलांची, माळ टपोरी नवी
जरतारी तारांत गुंफुनी लेकरास लेववी."

तरी काही उपयोग झाला नाही. "बीं"ना असे म्हणावयाचे आहे की, वरवरचे सौंदर्य पाहून मनाला भुरळ पाडण्यात काही अर्थ नाही. ख-या सौंदर्याचा शोध घ्यायचा असेल तर सृष्टी आणि कवी यांच्यात एकरूपता आली पाहिजे. त्यांच्यात अद्वैत निर्माण झाले पाहिजे. असे झाले तरच त्याच्या हातून लोकोत्तर, उदात्त अशा स्वरूपाचे काव्य निर्माण होईल म्हणून "बी" म्हणतात -

"कवीच झाला सृष्टी, सारी सृष्टी झाली कवत,
दिसण्याचे लपण्याचे गारूड अपूर्ण हा भासवी."

कवी "बीं"ना वरवरचे सौंदर्य मोह घालू शकत नाही. तर त्याच्या पलीकडे आत काही तरी अपूर्व असे सतचित शाश्वत असे सौंदर्य आहे आणि त्याचा शोध घेण्यासाठी "बीं"चे मन आतुर झाले आहे. आणि अशा वेळी त्यांच्या ओठावर काव्याच्या ओळी येतात -

"सृष्टीशी कवि समरस झाला, प्राण तिचा आतला,
हृत्कमळाची तिच्या कळाली फुलती-मिटती कळा."

अशा समरसतेने तो तिच्या -हृदयकमलालाफुलवू शकतो. अशा शाश्वत सौंदर्याचे वर्णन करता करताच कवीचे कार्य कोणते या बद्दलचे विचारही या कवितेत मांडतात. ध्येयाकडे चाललेल्या सृष्टीचक्राच्या प्रवासांची वाट जवळची नाही. त्या वाटेत अनेक चढउतार आहेत. त्यामुळे ती अत्यंत

बिकट वाटते आहे आणि अशा बिकट वाटेवरुन जाताना परिश्रम वाटून या परिश्रमामुळे दुर्बलता येऊ नये म्हणून आपल्या मधुर अशा गीतांच्या अमृताने विश्वाचे तेजोबल वाढविले पाहिजे आणि हेच कवीचे कर्तव्य आहे म्हणून "बी" म्हणतात -

"काव्यरसामृत यास्तव कारुण्याने निर्मुनि कवि
मृदुमधुरोज्ज्वल गीते गाऊनि तेजोबल वाढवी."

या ध्येयाच्या मार्गाची लांबण मोठी आहे. अनेक वेडेवाकडे चढउतार असल्यामुळे कधी या सृष्टीचक्राचा तोल सुटून ते कधी भलत्याच बाजूला कलंडते. तोल सांभाळणे कठीण जाते तर कधी एखाद्या उंचवट्यावर पोहचल्यावर आपण पूर्णत्वास पोहचलो अशी खोटीच समजूत होऊन ते आनंदू लागते. कधी कधी पाणथळीच्या खोट्या तेजोभासाला भुलून ते चिखलात फसते. आपण बराच मार्ग चालून आलो आहोत अशा भावनेने एकाच जागेवर गरगर फिरत राहते. पण इतकी बिकट वाट असली तरी अंतिम ध्येय आपण गाठूच असा त्याला आत्मविश्वास असतो म्हणूनच तो निर्भय असतो.

"आनंदाला म्लानपणा नच सौंदर्याला क्षय
स्थलाकडे त्या जाताहे हे विश्वचक्र निर्भय."

कवीची थोरवी गाताना "बी" म्हणतात हा कवी कधी कटू बोलून तर कधी आपल्या मधुर वाणीने तर कधी सहकार्याच्या भावनेने तो हे सृष्टीचक्र सांभाळत असतो. असा वर्तमानकाळ तो घडवीत असतोच पण भविष्यकाळ घडविण्याचे सामर्थ्यही त्याच्यात आहे म्हणूनच "बी" म्हणतात -

"काव्य आगेदर झाले, नंतर झाले जग सुंदर,
रामायण आधी, मग झाला राम जानकीवर."

आचार्य अत्रे प्रस्तावनेत म्हणतात, "इमारत बांधण्याच्या आधी एखादा

इंजिनिअर बांधकामाचा नकाशा तयार करतो त्याप्रमाणे भविष्यकाळाच्या उदरात असलेल्या अनेक उदात्त घटनांची रेखाचित्रे हजारो वर्षे आधी नुसतीच अस्पष्ट स्वप्ने पडत नसून त्याला त्या काळाचा प्रत्यक्ष साक्षात्कार होत असतो."[१३] कवी आपल्या काव्यातून आदर्श व्यक्ती निर्मितो आणि उदात्त, पवित्र असा मानव आपल्यापुढे ठेवतो याचे सर्व श्रेय कवीलाच आहे. यावरून "बी"ची आंतरिक सौंदर्य पाहण्याची वृत्ती दिसून येते. सद्‌चित आनंदाचा शोध ते घेतात. जिथे अवीट आनंद व सतेज सौंदर्य आहे तिथेच पूर्णत्व संभवते आणि हेच सृष्टीचे किंवा जीवनाचे अंतिम ध्येय आहे असे "बी" सांगतात.

<u>वेडगाणे</u> -

या कवितेत कवी "बीं"नी कवींच्या प्रतिभेच्या विराटशक्तीचे स्वरूप व्यक्त केले आहे. प्रतिभा ही अपूर्व शक्ती आहे. सामान्य लोकांना वाटते तितकी ती सोपी नाही. नुसते "र" ला "र" आणि "री" ला "री" जुळवून काव्य तयार होते असे सामान्य लोकांना वाटते पण हे काव्य करणे इतके सोपे नाही. तिच्या अद्‌भुत सामर्थ्याची कल्पना या सामान्य लोकांना नाही म्हणून या अफाट शक्तीचे वर्णन "बी" करतात -

"आकाशाची घरे
त्याला प्रकाशाची दारे
ग्रहमालांच्या वर अडसरी ग."

अशा या दैदीप्यमान आकाशात या प्रतिभाशक्तीचा प्रासाद आहे. लावण्याच्या जलाने न्हाऊन निघाल्यामुळे पाचूच्या हिरव्यागार लतावेली तिच्या उद्यानात डोलत आहेत. तर तिच्या सोनेरी उंबरठ्यावर स्वर्गातील अप्सरा उभ्या आहेत. हे सौंदर्य पाहून "बीं"ना भव्य आणि दिव्य कल्पना सुचतात. व "बी" वर्णन करतात.

"पाचूच्या वेली
न्हाल्या लावण्याच्या जली
दारी उभ्या स्वर्गीय नरनारी ग।"

सा-या विश्वाची जी राणी आहे ती नक्षत्रगणांच्या गगनव्यापी विमानात बसून प्रदक्षिणा घालते. तेंव्हा "बी" वर्णितात -

"चंद्राचे हसणे
वायूचे वरळणे
सृष्टीसुरात सुर मी भरी ग"

असा सृष्टीच्या सुरात सूर मिसळून निसर्गाला बोलके करते. ब्रम्हांडाच्या प्रचंड घडामोडी करीत असलेली ही भव्य शक्ती कोणाच्याच आधीन नाही. तर तिची आपल्या स्वत:वर देखिल सत्ता नाही. या शक्तीच्या अनुग्रहामुळे कवीच्या अंतकरणात दिव्य आनंदाच्या खाणी खुलतात आणि या आनंदाचे गाणे ती मनातल्या मनात गाते

"दिव्य भोगांच्या खाणी
गाय मनोमन वाणी
कशी वदेल वैखरी ग."

या गीतातील शब्दाशब्दात व्यक्त झालेले प्रतिभा शक्तीचे तेज बुध्दीला थक्क करून टाकल्याशिवाय रहात नाही. यावरून आपणाला "बीं"ची प्रतिभा खरोखरच गगनाला गवसणी घालणारी आहे याची साक्ष पटते. या प्रतिभेचा आनंद इतरांना काव्यातून सांगून त्याला आपल्या बरोबर या आनंदात गुंगविण्याचे सामर्थ्यही त्यांच्याजवळ आहे. म्हणूनच अवघ्या महाराष्ट्राला त्यांच्या या वेडगाण्याने वेड लावले आहे. त्यांनी केलेले हे प्रतिभेचे नादमधुर वर्णन वाचून रसिकांचे लक्ष "बीं"कडे आकर्षित झाले आणि रसिकांच्या अंतकरणात सहजासहजी प्रवेश करण्याचे भाग्य "बीं"ना लाभले आहे. त्यांच्या कल्पनेची रम्यता, विचारांची उदात्तता आणि

नादमाधुर्य किती अफाट होते याची कल्पना येते.

काव्यानंद -

या कवितेत कवी "बी"नी काव्यनंदाचे वर्णन केले आहे. हा काव्यानंद ब्रह्मानंदसहोदर असतो. लोकोत्तर काव्य असेल तरच तो अनुभवता येतो. परंतु हे लोकोत्तर काव्य करणे ही गोष्ट वाटते तितकी सोपी नाही. काव्य करणे किती कठिण आहे हे सांगताना "बी" म्हणतात -

"दैत्यांनो । न समुद्रमंथन, वृथा येथे बळाची कथा
येथे वायूसुता । हतप्रभ तुझी उड्डाणदर्पप्रथा."

कारण काव्य हे अभ्यास करून किंवा प्रयत्न करून करावे लागत नाही, तर ते आपोआपच आणि उत्स्फुतपणे बाहेर पडते आणि असे उत्स्फुर्तपणाने स्फुरलेले काव्यय श्रेष्ठ दर्जाचे असते. त्यात प्रत्यक्ष अनुभवाची उत्कटता असते. आणि म्हणूनच "बी" म्हणतात -

"येथे अद्भुतरम्य नित्य पडले स्फूर्तिप्रभेचे कडे
अम्लान प्रतिभा-कळया उमलल्या आहेत चोहिकडे
वोसंडे दुथडी भरूनि सरिता सत्कल्पना पावन
वृत्तींची रसलीन चंचल खगश्रेणी करी क्रीडन."

श्रेष्ठ दर्जाचे काव्य निर्माण होताना जितकी उत्स्फूतता असते तशाच प्रकारची एकस्पता रसिकांचीही काव्य वाचताना झाली पाहिजे. "मी"पणाचा पूर्णपणे लोप झाला पाहिजे. त्याच बरोबर अंतकरणातील कठिणतेचा लोप झाला पाहिजे. अशा रीतीने जर रसिक काव्यविषयाशी तद्रुप झाला तरच त्या काव्यापासून त्याला खराखुरा आनंद झाला असे समजावे असा उत्कट काव्यानंद पदरात टाकू शकणा-या काव्यालाच "बी" काव्य समजतात. काव्यानंदाच्या श्रेष्ठ दर्जाचे वर्णन कवीने केले आहे.

विचारतरंग -

आधुनिक कवितेवरील आक्षेप खोडून टाकण्याच्या उद्देशाने कविता लिहित असताना त्यांनी या कवितेत प्रतिभेचे महत्वही गायिले आहे. हे महत्व गात असताना त्यांच्या मनात जे विचारतरंग उठले त्याचे वर्णन "बी" करतात -

"वाटे, तारा होवीनी विचरावे अवघ्या भुवनी
धरणीच्या -हृदयावरती ठेवुनि कर हसवावी ती ।"

कवी हा श्रेष्ठ कलाकार असतो, तो द्रष्टा असतो तो जे दृश्य पहातो ते दृश्य शब्दांच्या माध्यमातून इतरांना दाखविण्याचा तो प्रयत्न करीत असतो.

"विहंगमोत्तम की व्हावे आकाशी वरवर जावे ।
नूतन नूतन प्रांताते आक्रमुनी जावे वरते.
उदयागिरीच्या पलीकडे बालरवीचा किरण पडे
प्रथम करुनि त्याला प्रणाती शुभवार्ता कळवू जगती
घोर निशा संपुन गेली । मंगल वेळ जवळ आली ।
खंत सोडुनी कामाला लागा, रवि उद्या आला"

रविउदया झाल्याची शुभवार्ता मानवांना देऊन त्यांच्या मनात नवचैतन्य निर्माण करणारा, आपल्या काव्यमय शब्दांनी भाग्यकालाची जाणीव करुन देणारा असा हा कवी श्रेष्ठ असतो. आणि हे रसिकांच्या अंतकरणात हळूच शिरण्याचे कामही कवी करीत असतो त्याचे वर्णन "बी" करतात -

"सोप्या सोप्या शब्दांनी, स्फूर्तीसूत्राने गुंफोनी,
मंजुळ मंजुळशी गाणी रचुनी रसिकान्त:करणी
हळू शिरावे चोरोनी, जावे मीपण लोपोनी,
हौस मनी ही असे परी टीका तीते विफल करी ।"

अशी हौस वाटते पण टीकाकारांचे प्रहारामुळे अंत:करण विदीर्ण होते. काव्यनिर्मिती करणे ही गोष्ट सोपी नाही. कवीच्या अंत:करण स्फूर्तीचे दिव्य संदेश शब्दमय करणे कीती अवघड आहे ते कवी "बी" सांगतात.

"अंत:करण पटावरती आत्यंतिक वेगे उठती
दिव्य लेख उन्मेषाचे धरावया ते स्मृति काचे
बुध्दीच्या भिंगावरती बिंबित ज्या प्रतिमा होती
शब्दचित्र त्यांचे कसले नकळे कादिल मन दुबळे."

इतके कठिण असले तरीसुध्दा तो दिव्य संदेश जसाच्या तसा व्यक्त करण्याचा प्रयत्न कवी करीत असतो. पण टीकाकारांना मात्र त्याचे काहीच वाटत नाही. उलट आपले टीकास्त्र उपसून हल्ला करायला ते नेहमी आघाडीवर असतात. आणि म्हणतात की,

आधुनिक कवितेत सत्याचा गंध नाही, गांभीर्य नाही, तिला शब्द-चमत्कृती साधता आली नाही. एवढेच नव्हे तर त्यापुढे जाऊन टीकाकार म्हणतात शास्त्रीय सिध्दांतासारख्या विषयाला सोडून ती सामान्य व क्षुद्र विषयातच ती रममाण झाली आहे. असा आक्षेप घेणा-या टीकाकारांना "बी" अगदी समर्पकपणे काव्यमय शब्दात उत्तर देतात.

"सिध्दांत घेऊनि शास्त्राचे करा कथन त्या सत्यांचे
पुरे पुरे कल्पना पुरे काल मागला आज सरे
थांबा थांबा रसिकवरा । गदारोळ हा पुरे करा ।
प्राण कल्पना काव्याला न कळे हे मतिमंदाला
तुटपुंज्या ज्ञाने फुगती रसज्ञ आपणाला म्हणती."

काव्यामधे कल्पनेचे स्थान मोठे आहे हे कवीला मान्य आहेच पण त्याही पुढे जाऊन "बी" म्हणतात विश्वव्यापक अशी कल्पना हीच एक शक्ती आहे म्हणून "बी" म्हणतात -

"जे जे अविश्व ज्ञेय असे त्यात कल्पना मात्र वसे
करा कल्पना वजा बरे म्हणजे बाकी शून्य उरे."

काव्याचा आस्वाद घेण्यासाठी रसिकांची वृत्ती सुध्दा अशीच काल्पनिक सौंदर्यपूर्ण असायला हवी. रसिक हा सुध्दा काव्याशी एकरूप झाला पाहिजे. या एकरूपतेचे वर्णन कवी करतात -

"संगम -हृदयंगम साचा मृणाला अलि या युगुलाचा
अथवा सज्जन रसिकाचा सहजमनोहर कवितेचा !"

अशी रसिकता त्यांच्याजवळ नाही पण टीका करण्यास मात्र पुढे पुढे सरसावतात म्हणून कवी खेदाने म्हणतात -

"महाराष्ट्रकवि परंपरा खंड न पडला तिला जरा
उणीव रसिकांचीच परी आज भासते खरोखरी."

या कवितेतून रसिकांची उणिव भासते. ही तक्रार करीत असतानाच प्रतिमेला शब्द रूप देणे कसे कठिण आहे याचे वर्णन केले आहे.

अनुकार -

कवी "बी"च्या "विचारतरंग" या कवितेवर टीकाकारांनी टीका केली होती. श्री.आनंदराव टेकाडे यांनी "आधुनिक कवीची कुरकुर" ही कविता लिहली होती. श्री.टेकाडे यांच्या "आनंदगीत" भाग १ या पुस्तकाच्या प्रस्तावनेत रा.अणे यांनी "बी"वर जहाल टीका केली होती ते लिहितात - "जगातील रसिकतेचे झरे आटून शुष्क झाले असून त्यांचा किंचितसा ओलावा कोठे उरला असेल तर तो माझ्या अंत:करणात उरला आहे. अशा अहंतेच्या खडकातील अेका खाणीत साचलेल्या गोष्पदप्राय उदकसंचयात मंजन करणा-या कूपमंडूकाच्या बेसूर ओरडयास मंजूळ गीत समजून तच्छवणार्थ रसिकांच्या झुंडीच्या झुंडी लोटल्या नाहीत तर त्याचा दोष कोणाकडे आहे."[१४] अर्थात ही टीका गैरसमजुतीने झाली होती. श्री.अणे यांनी "बी"ना तसे पत्र पाठवून क्षमाही मागीतली होती. श्री.अणे यांनी "बी"ना

पाठविलेले पत्र -

रेल्वेच्या डब्यात
भुसावळवरून
चैत्र शुध्द १ दा, मंगळवार
ता. १७-३-४२.

कविवर्य गुप्ते यास कृ. सा. न. वि. वि.

आजच्या गुढीपाडव्याच्या मंगल दिवशी मी आपणास अभिवादन करून नूतन संवत्सर आपणास शुभदायक व कल्याणप्रद होवो असे इच्छितो.

आपल्या एका काव्यातील एक दोन ओळी घेऊन मी काही टीका आनंदगीताच्या प्रथम भागाच्या प्रस्तावनेत आपणावर केली, तिच्यातील मथितार्थ हा व्यक्तिशः आपल्यासारख्या कविश्रेष्ठाच्या कृतीवर टीका करण्याचा नसून एका विशेष सिध्दांताचा परिपोष करण्याचा होता. तथापि त्या टीकेत वापरलेली भाषा निष्कारण कठोर व कटु होती. ही गोष्ट माझ्या नजरेस ग्रंथ प्रसिध्द झाल्यावर काही दिवसांनी आली व त्या संदर्भात आपणास समक्ष भेटून क्षमा मागावी असा विचार माझ्या मनात त्या गेल्या २०-२२ वर्षात अनेकदा आला. रा.माडखोलकर यांचेजवळ याबद्दल दोनचारदा गोष्ट काढली. पण आपण सर्वसंग परित्याग करून एक प्रकारचा एकांतवासच स्वीकारला आहे व अशा त-हेने कोणी भेटीस आल्यास आपणास एक प्रकारचा मनस्ताप होतो, असे मला समजले. त्यामुळे मला आपणास समक्ष भेटून माझे मनोगत कळविता आले नाही. आपले विषयी वाटणारा माझ्या मनातील आदर व्यक्त करण्याची संधी घेता आली नाही.

मी या पत्राद्वारे, माझ्या त्या किंचित आवेशयुक्त अविचारामुळे लिहिलेल्या वाक्याने आपल्या मनोभावना दुखल्या असतील त्याबद्दल मला क्षमा करावी, असे अंत:करणपूर्वक आपणास विनवितो व आपण ती क्षमा

उदार अंत:करणाने कराल अशी उमेद वाटते.

आपले काव्य मी कॉलेजमध्ये शिकत असताना वाचीत असे व त्या वेळीच आपल्या कृतीविषयी मला एक प्रकारचा आदर वाटत असे. बी हे कोण हे मला गेल्या १५-२० वर्षांत कळले, पण बींची वाङ्मयातील श्रेष्ठता ही मला विद्यार्थीदशेतच पटली.

आपली प्रकृती नीट नसतेच. तथापि या वृध्दावस्थेत आपणास प्रकृतीस्वास्थ्य व मनस्वास्थ्य लाभावे, अशी मी आजच्या मंगल दिवशी भगवंताची प्रार्थना करून हे पत्रलेखन संपवितो.

आपला

क्षमायाचनेच्छु

माधव श्रीहरी अणे, "[१५]

यावरून आपणाला "बी" किती विचारपूर्वक लिहित याची कल्पना येते. आपल्या लिखाणात दोष नाहीत याबद्दल त्यांना खात्री होती. श्री.अणे यांच्या पत्राविषयी सौ.कणेकर सांगतात. "श्री.अणे यांच्या हातून एक वाक्य अनवधानाने पडले आहे. "आपले काव्य मी कॉलेजमध्ये शिकत असताना वाचीत असे." असे त्यांनी लिहले आहे. परंतु "वेडगाणे" या कवितेपासून "बीं"ची कविता "मनोरंजना"तून प्रसिध्द होऊ लागली. तेव्हा श्री.अणे यवतमाळला वकिली करत होते."[१६]

श्री.अणे यांनी केलेल्या या टीकेला उत्तर म्हणून "बीं"नी "अनुकार" ही कविता लिहली. या कवितेतून त्यांनी अत्यंत मार्मिक असे उत्तर दिले आहे. कवींवर होत असलेला अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना टीकाकारांनी काव्यातील खरा ध्वनी लक्षात न घेता प्रतिध्वनीच लक्षात घेऊन टीका करु लागले तेंव्हा बी आपले म्हणणे अतिशय समर्पक भाषेत मांडतात.

"बी" म्हणतात प्राचीन कवी तेवढे चांगले आणि आधुनिक कवी म्हणजे वाईट असा समज करून आधुनिक कवींना दोष देणे हे योग्य नाही.

त्यासाठी ते पुराणातील व्यासाचे उदाहरण देऊन पटवतात.

"व्यासोच्छिष्ट जरी जग सारे
का झाले होतात पसारे ?
उष्ट्या जगती जन्म हरे । रे ।
का सर्वाला ।"

म्हणून "बी" म्हणतात व्यासमुनीचे श्रेष्ठत्व गाऊन इतरांना हीन लेखायचे का ? याही पुढे जाऊन ते म्हणतात.

"विश्वविभूषण पुष्प हवे ना ?
दुखवुनि लघुगुरु तरु लतिकांना
न मिळे । आता पुरे विघटना
जीव तान्हेला ।"

अशी उदाहरणे देऊन ते आधुनिक कवींवरचा अन्याय दूर करण्याचा प्रयत्न करीत असताना माझ्यावरच हल्ला व्हावा हा अजब न्याय आहे म्हणून "बी" म्हणतात -

"अंधार नगराचा उलटा न्याय।
अदंड्या दंडा भाजन होय;
पथ घटिका पी, घड्याळ, हाय!
खाई टोला."।

ह्या आक्षेपाला उत्तर देताना "बीं"नी मनाचा व भाषेचा यत्किंचितही संयम ढळू दिला नाही. संयम तर ढळू दिला नाहीच पण संतापही व्यक्त केला नाही. जे काही सांगायचे आहे ते दुसऱ्यांना टोचणार नाही याची खबरदारी त्यांनी घेतली आहे. काव्यावर केलेली टीका कशी चुकीचे आहे त्यांनी धीरोदात्तपणे सांगितले व आपले मत हिरिरीने मांडले आहे.

## 3·3 सामाजिक कविता -

केशवसुतांनी आधुनिक कवितेत अनेक विषय आणले. त्याचप्रमाणे समाजातील परिस्थिती पाहून त्यांनी सामाजिक कवितेतही रुढी विरुध्द "तुतारी" फुंकली आणि जातिभेद, धर्मभेद, अस्पृश्यता, धार्मिक रुढी परंपरा, अज्ञान त्याचबरोबर बालविवाह, जरठविवाह, विधवांचे केशवपन अशा अनेक विषयावर त्यांनी काव्यरुपी शस्त्र उपसले. जाचक आणि घातक रुढीवर त्यांनी आपल्या काव्यातून हल्ले चढविले. कवी "बीं"च्या काव्यातूनही अशी मते व्यक्त झालेली दिसून येतात. केशवसुतांनी अशा रुढींविरुध्द "तुतारी" फुंकली आणि या "तुतारी"चा पडसाद द-या-खो-यातून घुमला. या गगनभेदी निनादाने त्यावेळी जो जागा झाला तो तडक केशवसुतांच्या झेंडयाखाली दाखल झाला. स्वतंत्र काव्य निर्माण करण्याचे सामर्थ्य ज्यांच्या अंगी होते ते गोविंदाग्रज, बालकवी यांनीही केशवसुताचे शिष्यत्व पत्करले. एवढेच नव्हे तर ते स्वत:ला केशवसुतांचा सच्चा चेला म्हणवून घेऊ लागले.

याच काळात कवी "बीं"नी "डंका" वाजवला पण डंक्याच्या गंभीर निनादापेक्षा "तुतारी" चा गगनभेदी तारस्वर अधिक प्रभावशाली असतो. हा व्यावहारातला अनुभव आहे. "बी" कवी हे स्वतंत्र प्रज्ञेचे एकांडे धारकरी कवी असल्यामुळे मागून येणा-या अनुयायांची त्यांनी वाट पाहिली नाही व पर्वाही केली नाही. "तुतारी" ज्या काळात फुंकली गेली त्याच काळात "डंका" पिटला गेला. त्यामुळे केशवसुतांनी तुतारी म्हणून "बीं"नी "डंका" पिटला अशा अर्थाची टीका "बीं"वर केली गेली. या टीकेबद्दल सविस्तर चर्चा कवी "बीं"नी श्री.वा.ना.देशपांडे यांना पाठवलेल्या पत्रातून केली होती. ते आपण मागील भागात पाहिलेच आहे. केशवसुताचे अनुकरण "बीं"नी केलेले नाही तर ते स्वतंत्रपणे लिहलेले उत्स्फूर्त असे विचार आहेत. योगायोगाने झालेले समकालीन विचार आहेत.

डंका -

समाजसुधारणेच्या हेतूने "बी"नी ही कविता लिहली. त्यांच्या वृत्तीतील त्वेश, वाणीतील आवेश या कवितेत व्यक्त झाला आहे. कवी "बी" हे आपले लक्ष जाणिवपूर्वक भविष्याकडे वळतात. त्यामुळे त्यांना वर्तमानाचे भान असणे स्वाभाविकच आहे. वर्तमान जीवनात कोरड्या कर्मकांडाना महत्व आले होते. जिकडे तिकडे रुढीच्या आगी लागल्या होत्या, समाजात पावित्र्याचे ढोंग फार माजले होते, पोकळ औपचारिक विधीचे नसते अवडंबर माजले होते, तत्वे नाहीशी झाली होती, क्षुद्र गोष्टींना किंमत येत होती. रुढीची गतिमानता संपून गेली तरी रुढीबंधनाचे नगारे घुमत होते. अशा काळात स्वार्थी लोक गरीब जनतेची फसवणूक करीत होते. त्यामुळे समाजाच्या जीवनात अखंडपणे वाहणारे आचार विचारांचे जल स्वार्थामुळे अडून राहते आणि अडून राहिल्यामुळे सडते, तेंव्हा "बी" म्हणतात -

"कोंडिले स्वार्थे कोंड्यात,
जल सडले ते निभ्रान्त
तरी धूर्त त्यास तीर्थत्व
देऊनी नाडिती भोळे !"

अशा वेळी विचारांची शक्ती दुबळी पडते. परंपरेची आंधळेपणाने पूजा करण्याची प्रवृत्ती वाढते आणि त्यामुळे बुध्दीही काही कार्य करु शकत नाही. त्यामुळे तिलाही रुढीचे दास्यत्व स्वीकारावे लागते. आणि मग सर्वच बाबतीत धर्म, रुढी, परंपरा, संस्कृती यांचे थोतांड माजते आणि अशा वेळी -

"ही दंगल जेंव्हा होते,
नाकळेचि कोठुन की ते,
येतात बंडवाले ते
जग हाले "स्वागत बोल" ।

या बंडवाल्यांना निर्माण करावे लागत नाही तर ते अकस्मात अवतरतात. कवी "बीं"च्या कल्पनेतले बंडवाले म्हणजे प्रेमाच्या व शांतीच्या मार्गाने समाजात क्रांती घडवून आणणारे, ज्ञानेश्वर, महात्मा गांधी यांच्यासारखे आहेत. पण कवी "बी" म्हणतात अशी शांतीच्या आणि प्रेमाच्या मार्गाने जाणारी बंडे यशस्वी होण्यासाठी ती व्यापक प्रमाणात व्हायला पाहिजेत.

"दारी बंड, घरात बंड । अवघे ब्रम्हांड बंडि भरे ।"

असे सर्व ब्रम्हांडाला हलवणारे बंड "बीं"ना हवे आहे. ते व्यापक प्रमाणात व्हायला पाहिजे. ज्या अशा थोर महात्म्यांनी प्रेमाच्या व शांतीच्या पायावर समतेचे घटना उभी करून आपले सर्वस्व ब्रम्हार्पण केले -

"आम्ही त्या दिलजनांचे
साथी - ना मेलेल्यांचे
हे डंके झडती त्यांचे
ऐकोत कान असलेले."

यावरून आपणाला असे दिसते की, "बीं"ची "डंका" ही केशवसुतांच्या "तुतारी"चे अनुकरण नाही. "तुतारी"चा सगळा भर सामाजिक सुधारणेवर आहे तर "डंका" मधे धार्मिक सुधारणांचा विचार आहे. भ.श्री.पंडित म्हणतात - "डंका म्हणजे केशवसुतांच्या "तुतारी"चा पडसाद आहे. हा आक्षेप व्यर्थ आहे. "डंक्या"मधेये "बीं"नी ज्ञानेश्वरांना बंडवाला म्हटले आहे. पण हे विशेषण लावताना "बीं"च्या मनातील भाव अगदी वेगळा होता. मूळच्या शुध्द धर्मात अनेक पाखंडे माजली होती. त्यांनाच धर्माचे स्वरूप प्राप्त झाले होते. ती पाखंडे दूर करून ज्ञानेश्वरांनी मुळातला शुध्द धर्म पुनरुज्जीवित केला म्हणजे सुधारला. तेंव्हा बंडवाला म्हणजे "धर्मसुधारक" हा अर्थ "बीं"च्या मनात अभिप्रेत होता. जुने जे जे काही आहे ते ते नष्ट होऊ द्या असे म्हणण्याचा "बीं"चा भावार्थ नव्हता. जे सद् आहे

ते कायम ठेवा असे त्यांना म्हणायचे होते."[१७] म्हणजेच "बीं"ची विचारशील प्रवृत्ती दिसते.

समाजातील विषमता, स्वार्थी वृत्ती, धार्मिक वृत्तीचा अतिरेक दांभिकता, कृत्रीम बंधने त्याच बरोबर धर्माच्या नावाखाली जनतेची होत असलेली पिळवणूक आणि हे होणारे सर्व अन्याय सर्वांच्या कानावर पडावेत म्हणूनच "बीं"नी हा "डंका" पिटला. केशवसुतांच्या "तुतारी"तील आवेश "बीं"च्या काव्यात नसला तरी "बीं"चे विचार जोमदार आहेत.

<u>तीव्र जाणीव</u> -

या कवितेत "बीं"नी सामाजिक समतेची जाणीव अधिक तीव्रतेने पण संयमी वृत्तीने व्यक्त केली आहे. "बीं"च्या विचाराचे प्रातिनिधिक स्वरूप स्पष्ट करणारी ती कविता आहे. भ.श्री.पंडित सांगतात. "ही कविता नोव्हेंबर १९१७ च्या "मनोरंजना"त आली होती. तेंव्हा "बीं"नी सुरवातीस प्रश्न विचारला होता, "सुस्थितीत असलेल्या प्रत्येक राष्ट्रास शांततेचे संग्राम प्रत्यही करावे लागतातच. या उद्याच्या स्थितीत आमच्या समाजाची काय वाट होईल ?"[१८]

मानवाची जर उत्क्रांती व्हायची असेल तर प्रथम राष्ट्राची सामाजिक परिस्थिती सुधारली पाहिजे. सर्वात प्राचीन अशी उदार सत्प्रेरणा शिकविणारी, जगाला पावनता देणारी अशी उदात्त आमची भारतीय संस्कृती आहे. तिचा आम्हाला अभिमान वाटतो. परंतु या समाज रचनेने निर्माण केलेली श्रेष्ठ, कनिष्ठता, जन्माने अधिकार ठरविणारी ही रचना, चातुर्वर्णावर आधारलेला हा समाज अशा समाजात समता, नीती नांदणे अशक्य आहे म्हणून "बी" म्हणतात -

"जन्माने अधिकारजाति ठरते, जन्मेंचि, नीचोत्तम,
वज्रामेध समाजधोरण असे झाले जिवे कायम,

तेथे शुध्द समाजनीति, समता, सत्प्रेरणा नांदती,

आदर्शोक्तिप्रति ह्या मृषा करितसे प्रत्यक्ष सद्य: स्थिती । "

हे जातीभेद मानवाने निर्माण केलेले आहेत. अस्पृश्यांना कमी लेखून त्यांना आपण दूर ठेवले तर आपण स्वातंत्र्य उपभोगण्यास अपात्र आहोत असे "बी"ना वाटते म्हणून ते म्हणतात -

"ठेवू कृत्रिम भेद कायम, कुणा अस्पृश्य मानू जरी,

स्वातंत्र्यास अपात्र आपण ठरु घेऊनि शापा शिरी । "

ब्राम्हण आणि ब्राह्मणेतर असा भेद आपला समाज करीत आला आहे. त्यामुळे ब्राह्मणेतर समाजाची प्रगती खुंटली आहे. त्यामुळे एक भाग कायमचा मागासलेल्या स्थितीत राहिला आहे. आपले स्वातंत्र्य हे सर्वांगशुध्द व्हावे, निसर्गा इतकेच ते शुध्द बनावे म्हणून प्रत्येकच क्षेत्रातील विषमता नष्ट करुन नवीन समाज घटना निर्माण झाली पाहिजे. त्यासाठी वीर पुरुष निर्माण झाले पाहिजेत. दास्यत्वात कुचंबत पडलेल्या आपल्या अज्ञभगिनींना सज्ञान केले पाहिजे. आणि हा बदल आपोआप घडून येणार नाही. तर त्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न केले पाहिजेत म्हणून "बी" म्हणतात -

"आपोआप घडेल इष्ट समयी ते कार्य हे बोलणे,

आहे भ्रामक युक्त काय सगळे काळावरी टाकणे

भागीदार कृतीत मानव असे कालनिसर्गासवे,

आणि त्यास समीप एकवटुनी यत्नप्रयत्नोत्सवे"

स्वातंत्र्या विषयीचा विशाल दृष्टीकोन या कवितेत व्यक्त झाला आहे म्हणून "बी" म्हणतात -

"ते स्वातंत्र्य खरे न, फक्त आपुली जे तोडिते बंधने,

अन्यायाच्या पदशृंखलास बघते निष्कंप ऐशा मने,

या त्या आपण वागवू निजपदी त्यांच्यासवे प्रत्यही,

तोडू त्यास समग्र एक करुनी आकाशपाताळही । "

असा प्रयत्नवादही "बी"नी व्यक्त केला आहे. स्वातंत्र्य, समता आणि बंधुत्व याविषयाचे "बी"चे विचार प्रभावीपणे व्यक्त झाले आहेत.

<u>दीपज्योतीस</u> - ही कविता "बीं"नी बालविधवांना उद्देशून लिहिली आहे. या कवितेत "बीं"नी बालविधवांना कळवळून उपदेश केला आहे. बालविधवा तरूणींना पुनर्विवाह करण्याची रुढीने बंदी होती. बालविवाह पध्दतीमुळे कित्येक स्त्रियांना ऐन तारूण्यात वैधव्य प्राप्त होई आणि मग पुढील सर्व आयुष्य यांना स्वत:चे मन मारून कष्ट करून जगावे लागे. तेंव्हा रुढीच्या या अनिष्ठ बंधनापासून विधवांना मुक्त करावे त्यांना पुनर्विवाह करण्यास समाजाने मान्यता द्यावी व त्यांचे जीवन विकसित व्हावे असा उदात्त हेतू मनात धरून "बीं"नी "दीपज्योतीस" ही कविता लिहली आहे व "बी" म्हणतात -

"घ्याया कोंडुनि मंदिरात जगदुधानी न तूं जन्मली,
वाया नासुनि जावया नुगवली बागेत चाफेकळी !"

या जगातील प्रत्येक वस्तूत सौंदर्य भरलेले आहे. बागेतील चाफेकळी ही कोमेजून जाण्यासाठी जन्मलेली नसते. विधवा असली तरी ती स्त्री आहे. तिला मन भावना आहेत. स्त्री म्हणून जगण्याचा पतिसुख, मातृसुख ही सुखे उपभोगण्याचा तिला अधिकार मिळाला पाहिजे. तेंव्हा आपली सोन्याची कांती अशी पाषाण मूर्तीपुढे जाळताना त्यांच्या मनात विचारांचे वादळ उठते व विधवांचे दु:ख पाहून त्यांचे मन कारूण्याने गलबलून येते व ते म्हणतात -

"सोन्याची तनु जाळितेस आपुली पाषाणमुर्तीपुढे"

हे धर्माच्या नावावर दिलेलू सक्तीचे वैधव्य म्हणजे निसर्गशक्तीचा अपमान आहे असेच "बीं"ना वाटते. या वैधव्याच्या आगीत स्वत:स जाळून घेणाऱ्या एका मुग्धेस "दीपज्योती"ला अनुलक्षून "बी" म्हणतात -

"हे लोकोत्तर रूप तेज तुजला आहे निसर्गे दिले,
की तूं अन्य तशीच निर्मुनि जगा द्यावीस कांही फुले,
दाने दे न कुणा निसर्ग। धन तो व्याजे तुम्हा देतसे,
ते त्याचे ऋण टाक फेडुनि गडे। राजीखुशीने कसे। "

निसर्गाने दिलेल्या मातृत्वाच्या शक्तीचा नाश करू नये. कोणतीही शक्ती निसर्ग दान देत नाही. तेव्हा त्याजासहित फेड करणे हे कर्तव्य आहे. "बी"ची ही कल्पना चिंतनशील वाटते. तर पुढे जाऊन ते म्हणतात -

"होता वेल रसप्रसन्न फुटुनी येतो फुलोरा तिला
ती आत्मप्रतिमांस निर्मुनि हसे संहारकालनाला"

एखादी वेल नष्ट होताना आपल्या स्माची आठवण म्हणून नवी वेली जन्माला घालते आणि मगच नष्ट होते. ह्यातच तिच्या जन्माचे सार्थक असते व म्हणतात -

"वाढा आणि जगा" निसर्ग म्हणतोसृष्टीस भूतात्मिका
डोळ्यानी उघडया पहात असता होशी गुन्हेगार का ?

"बी"च्या कुटुंबातील बाळूमावशी या बालविधवा होत्या. त्यावरून त्यांना बालविधवा विषयी कविता लिहिण्याची कल्पना सुचली असल्याची शक्यता वाटते. "बी"नी बालविधवांना उपदेश करताना जुन्या चालीरीतींचा धिक्कार केला नाही. किंवा अश्रु ढाळून जनतेची सहानुभूती मिळविली नाही. तर निसर्गाच्या उत्क्रांतीच्या आणि समतेच्या आधाराद्वारे मानसशास्त्रीय दृष्टया आपले म्हणणे पटविण्याचा प्रयत्न केला आहे.

<u>जादू</u> -

या कवितेत समाजातील आर्थिक विषमता आणि जनतेने केलेले रूढीचे अंधानुकरण हे पाहून "बी"चे मन दु:खी होते. जनता सुखी करण्यासाठी "जादू" मिळावी. असे त्यांना वाटत होते. त्यामुळे "जादू" या कवितेत त्यांची आंतरिक तळमळ स्पष्ट झाली आहे. समाजसुधारणेच्या जाणीवेतून उत्स्फूर्त झालेली ही कविता आहे.

आपल्या देशातील दारिद्र्य, विषमता, पारतंत्र्य या सर्वांचा सोक्षमोक्ष करणारी "जादू" कवीला पाहिजे. आपल्या देशातील गरीब जनतेला आपल्या नागड्या उघड्या राष्ट्र बांधवांना अंगभर वस्त्र देणारी एखादी "जादू" सापडली पाहिजे असे "बीं"ना वाटते. या समाजाने घातलेल्या रूढीच्या बंधनात सामान्य जनता कुचंबून जात आहे हे पाहून "बीं"चे मन खिन्न होते आणि त्यांना वाटते की,

आकाशातील दिव्य तेजाची रत्नमाला एकाएकी भूतलावर यावी किंवा पृथ्वीच्या पोटातील रत्नांचा खजिना अचानक पृथ्वीवर यावा अशी एखादी जादू सापडावी.

"उभ्या कड्याच्या कपारित
कठीण कोसे दडलेत,
त्यास छेदुनी
पटास निर्मुनि
उघडे जन झाकील अशी
जादू कोठे मिळेल कशी ! "

त्याचबरोबर सर्व जनता सुखी व्हावी अशी एखादी जादू मिळावी असे त्यांना वाटते. रूढीच्या कचाटयात सापडलेल्या लोकांना रूढीमुक्त करण्यासाठी त्यांना जादू हवी आहे म्हणूनच ते म्हणतात -

"चिवट रूढिच्या काचारित
धुरिण पडले कुचंबत,
चिरडुनि तिजला
यशोध्वजेला
दिगंतरी रोवील अशी
जादू कोठे मिळेल कशी !"

"बीं"च्या कवितेतील जादू अपूर्व आहे. त्यांची प्रगतीपरतेची कल्पना

जनतेच्या हिताशी निगडीत आहे हे या कवितेवरून दिसून येते. याबरोबरच सामाजिक रूढीगत स्थितीशिल किती दृढ आहे व ती बदलण्यास एखाद्या जादूचीच आवयकता आहे. याची त्यांना पूर्ण कल्पना आहे. ती ती बदलण्यास कोणती तरी जादू प्राप्त झाली पाहिजे असे त्यांना वाटते.

यमदुतास -

बालकवी "यमाचे दूत" या कवितेमध्ये "बोलवितात विक्राळ यमाचे दूत" असे निराश अंत:करणाने उद्गार काढतात त्यावेळी त्यांचे सांत्वन करण्याच्या उद्देशाने "बी"नी "यमदुतास" ही कविता लिहली.

कवी "बी"चा आशावादी दृष्टिकोन या कवितेतून व्यक्त झालेला दिसतो. निराश झालेल्या बालकवींना निसर्गातील सुंदर दृश्ये दाखवून "बी" आखिल जगतात आनंद नांदतो पूर्ण असे सांगतात. त्यासाठी ते पिंपळाचा दृष्टांत देतात व म्हणतात -

"प्राप्तस्थिती असता विपरीत
भग्न जीर्ण निर्जल विहिरीत
उगवुनि पिंपळ वर येतात.

असा प्रतिकूल परिस्थितीतही निराश न होता त्यावर मात केली पाहिजे असे सांगतात.

पारतंत्र्यामुळे भयभीत न होता त्यावर मात केली पाहिजे. राहिलेले आयुष्य जनकल्याणासाठी घालविली पाहिजे. आपल्या हातून होईल तेवढे कार्य करावे म्हणून म्हणतात.

"थेंबे थेंबे बनला सागर,
भूगोलाला कण आधार,
कार्य करावे लहान थोर."

समाजात सुख शांती नांदावी यासाठी "बीं"ची तळमळ आहे. शेवटी अमरत्वाची कल्पना सांगून ते मृत्यूचे भीषण तांडव पाहून भयभीत झालेल्या मानवाचे सांत्वन करतात व म्हणतात -

"आत्मा स्वामी तूं निभ्रांत
शाश्वत तूं अस्तोदयरहित
उठता विवेक हा -हृदयात
दूर पळतात ते भ्याड यमाचे दूत।"

"बीं"च्या व्यक्तिमत्वातील सामाजिक विचार केशवसुतांच्या ठशातच आकारात आला आहे. पण "बीं"नी हे नाकारलेले आहे. "बीं"नी देशपांडे यांना पाठविलेल्या पत्रात दिसून येतो. पण केशवसुतांच्या सामाजिक कवितेपेक्षा "बीं"ची दृष्टी अधिक व्यापक वाटते डॉ.रा.शं.वाळिंबे "बी" कविवर केशवसुतांची छाप असल्याचे सांगतात व "बीं"च्या सामाजिक कविते विषयी म्हणतात, "समाजशुध्दी ताबडतोब करण्याची वेळ आता आली असून कृत्रिम भेद जर आपण कायम ठेवले, कोणालाही अस्पृश्य मानले, तर आपण स्वातंत्र्याला अपात्र ठरू असे कवि म्हणत आहे."[१९]

केशवसुतांच्या काव्याचा परिणाम "बीं"वर झालेला असला तरीही "बीं"च्या कवितेतील सामाजिक अंश केवळ केशवसुती नाही तर त्यावरही "बी"पणाची एक वेगळी छटा दिसून येते. त्यांच्या कवितेत सुधारणावाद आहे. पण त्यांची दृष्टी पूर्ण सुधारणावादी नाही. ज्यावेळेस ते सुधारणावादाकडे चाललेले असतात त्याच वेळेस भारतीय संस्कृती, हिंदुसंस्कृती, चातुर्वर्ण यावर त्यांचा विश्वास आहे. नव्हे भारतीय संस्कृतीचा त्यांना अभिमान आहे. म्हणून ते पूर्ण सुधारणावादी ठरत नाहीत.

त्यांच्या काव्यातील भावसृष्टीला विचारांची जोड असल्यामुळे ती वजनदार बनली आहे. केवळ सामाजिक आशयातच नाही तर सर्व

जीवनाबद्दलच आशावाद त्यांच्या मनात ठसल्यामुळे त्यांची सामाजिक कविता केशवसुतापेक्षा वेगळी झाली दाखवून देते. केशवसुतांच्या काव्यात आवेश अधिक दिसतो. "बीं"च्या काव्यात विवेक अधिक प्रमाणात दिसून येतो.

"बीं"च्या सामाजिक कवितेविषयी भ.श्री.पंडित म्हणतात - "अन्यायाविरुध्द शस्त्र उपसताना "बीं"नी जुन्या चाली रीतीना शिव्याशाप दिले नाहीत किंवा जनतेची सहानुभूती जिंकण्याचा प्रयत्न केला नाही. त्यांनी विचारवंताना युक्तिवादाच्या जोरावर जागृत केले."[२०] आपल्या कवितेतून "बीं"नी स्वातंत्र्य समता आणि बंधुत्व यांचा पुरस्कार केलेला दिसतो.

## ३.४ राष्ट्रीय कविता -

राष्ट्रीय भावना काव्यातून मांडण्याची रुढी केशवसुतांनी सुरु केली आणि मागून येणाऱ्या कवींनी राष्ट्रीय विचार मांडण्यास सुरवात केली. कवी विनायकांनी तर राष्ट्रीय भावना अतिशय प्रकर्षाने मांडली व "राष्ट्रीय कवी" अशी पदवी मिळविली. "बीं"नीही आपल्या काव्यातून राष्ट्रीय भावना व्यक्त केल्या आहेत.

परंपरेचा अभिमान, हिंदुसंस्कृती आणि तत्वज्ञान यांच्यासंबंधी वाटणारे प्रेम हिंदुराष्ट्राचा अभिमान या सर्व गुणांमुळे कवी "बी" हे अस्सल राष्ट्रवादी कवी वाटतात. "बीं"नी लिहिलेल्या राष्ट्रीय कविता दोन गटात मोडतात. काही कविता पहिले महायुध्द चालू असताना १९१२ ते १९१८ साली "आशादेवी", "क्षणभर", "भगवा झेंडा" या कविता लिहल्या तर काही दुसऱ्या महायुध्दाच्या १९४५-४६ साली "भरतीय जीवन", "दोन मी", "प्रतिमा भंग" या कविता लिहल्या.

पूर्वविभवाच्या त्यांच्या स्मृती जाग्या आहेत. हिंदु धर्माचा अभिमान "बीं"ना आहे पण त्यातील वर्णव्यवस्था मात्र त्यांना मान्य नाही.

चातुर्वर्णावर आधारलेल्या रूढींचा त्यांना धिक्कार वाटतो. जाती-जातीतील श्रेष्ठ कनिष्ठतेचा जन्मावरून उच्च नीच ठरविण्याची जी प्रथा आहे अशा अनिष्ठ रूढींचा त्यांनी धिक्कार केला. त्यांच्या राष्ट्रवादाचे स्वरूप विवेकनिष्ठ आहे.

केशवसुत आणि "बी" दोघांनीही राष्ट्रीय कविता लिहल्या. स्वातंत्र्याची तळमळ दोघांनाही होती. दोघांच्याही कवितेतून ही भावना व्यक्त झालेली आहे. पण दोघांच्याही काव्यात फार मोठा फरक दिसून येतो. केशवसुत पारतंत्र्यामुळे झालेल्या परिस्थितीचे वर्णन करतात पण "बीं"नी दोन्ही महायुध्दे पाहिली होती. त्यामुळे त्या युध्दाचे होणारे परिणामही "बीं"नी पाहिले होते. मानवता नष्ट करणाऱ्या पाश्चात्य संस्कृतीचा त्यांना वीट आला होता. त्यामुळे भारतीयांच्या मनात तिच्या विषयी द्वेष त्यांनी काव्यातून प्रकट केला. त्याचबरोबर समता, मानवता, सत्प्रेरणा हे गुण भारतीय संस्कृतीत आहेत. तिचे श्रेष्ठत्व त्यांनी काव्यातून ठसविण्याचा प्रयत्न केला आहे.

आशादेवी -

"आशादेवी ही कविता लिहिली त्यावेळी १९१८ चे युरोपचे महायुध्द सुरु होते. तेंव्हा एक कॅलेंडर प्रचारात होते त्यात भूगोलावर अधिष्ठित झालेल्या एका देवीचे चित्र होते. जगाच्या भवितव्याविषयी चिंतातून असणारी ही देवता म्हणजेच आशादेवी."[२१] तिचे चित्र "बीं"नी रेखाटले आहे.

"भूगोलावर त्या अधिष्ठित अशी कोणी कुमारी असे,
रूपा आत नव्या छटा उफळता "न्यारी" खुमारी दिसे।
अंगाने गळली, तशीच मळली खेदे मुखश्री किती,
स्कंधीचा सरला जरी पदर तो नाही तिला शुध्दती."

महायुध्दाचा वणवा पाश्चिमात्य राष्ट्रात भडकलेला आहे. रक्तपात होत आहेत, हत्याकांड चालू आहेत हे असे दृश्य पाहून "बी"चे मन खिन्न होते, उद्वीग्न होते आणि ही सुधारलेली राष्ट्रे स्वताच्या स्वार्थासाठी रक्तपात घडवून आणतात हे पाहून त्यांच्यापुढे प्रश्न उभा राहतो तो असा

"रक्ते रंजित भोग काय करणे प्रीत्यर्थ त्यांच्या रणे ?
येथे सात्त्विक संपदा न मिळती का रक्तपाताविणे ?
आहे मानवजाति आक्रमित का उत्क्रान्तिपंथाप्रती ? "

आणि आशादेवीचे त्यांनी काढलेले चित्र नाहिसे होते व खिन्न मनाने "बी" म्हणतात -

"आहे सर्व विनाश "आ" करुनिया आत समीपस्थित
यत्नाच्या परमावधीविण टळेना, तो असे निश्चित."

आपला सर्वनाश होत आहे हे दिसत असताना सुध्दा प्रयत्न न करता पूर्व वैभवाचे गोडवे गाण्यात काय अर्थ आहे. पूर्व वैभवाचे गोडवे न गाता प्रयत्न केले पाहिजेत. हे सांगताना "बी" म्हणतात.

"गाणे पूर्वपरंपरादि महती हे शुध्द हास्यास्पद,
तेणे काय फसेल धूर्त जग हे वाटे असे आपणा ?
हे तो केवळ आत्मवंचन । पुरे आता जुन्या वल्गना."

अशा पूर्ववैभवाच्या पोकळ बडाया मारीत बसण्याची गरज नाही म्हणून ते त्वेषाने म्हणतात -

"विज्ञाने निगमागमान असती किंवा पुराणातली
ती तेथेचि असोनि या । गरज न त्यांची कुणा राहिली."

आपल्या राष्ट्राची होत असलेली अधोगती पाहून त्यांचे मन खिन्न होते पण ही "आशादेवी" त्यांना मार्गदर्शक ठरते म्हणून ते म्हणतात -

"वीणा एक जवाहिरे उडविली होती, जियेला जरी
तारा सर्व तुटोनी एक उरली बाकी, तियेला जरी

होती छेडित ती तशीच बसली काढीत तारेतुनी

नाना सुस्वर मालिका मृत मना चैतन्य दे तो ध्वनी ।"

ही सर्व वीणा जरी तुटलेली असली तरी तिची एक तार शिल्लक आहे. ती एकच तार आपल्या नाना सुस्वरानी मानवास प्रकाश देईल असा आशावादी दृष्टिकोन "बी" ठेवतात. पण पूर्णत्वाकडे जाण्याच्या प्रयत्न केला पाहिजे, आणि ते सहज शक्य आहे. आर्यांचे रक्त आमच्या नसनसात भिनले आहे त्या रक्ताच्या जोरावर आम्ही जगाला दाखवून देऊ की, -

"येते पालटता आम्हासहि पुढे आल्या स्थितीच्या सवे."

या कवितेवरुन आपणास "बीं"चा सुधारणावाद दिसून येतो.

प्रभात पोवाडा -

पहिल्या महायुध्दाच्या वेळी सैन्य भरतीसाठी "बीं"नी प्रभात पोवाडा रचला. भ.श्री.पंडित म्हणतात - "हा पोवाडा डिसेंबर १९१६ या विविधज्ञानविस्तारात आहे. त्यात असलेल्या अठरा ओळी "बीं"नी पुस्तकात गाळल्या आहेत. त्यात इंग्लंड व हिंदुस्थान यांची मैत्री म्हणजे डोंगरचे आवळे व समुद्राचे मीठ यांची मिळवणी आहे. अशी कल्पना होती."[२२] कवी "बी" प्रभात पोवाड्याचा उद्देश सांगतात, "लष्करभरतीचे कामी सरकारास मदत करण्याचा । मग मराठ्यास प्रोत्साहन देण्याकरिता मागील ऐतिहासिक वेळेचे आठवण करुन देण्यापेक्षा अधिक प्रोत्साहक ते काय असणार ?"[२३]

"बीं"चा शिवकालीन मराठ्याविषयीचा, महाराष्ट्राविषयीचा अभिमान या कवितेत व्यक्त झालेला दिसतो. महाराष्ट्र आणि छत्रपती महाराज यांचे अद्वैत "बी" विसरू शकत नाहीत म्हणून ते म्हणतात -

"महाराष्ट्रभूमंडन कंकण बांधुन विजयाचे

राजा शिवाजी आला, वंदू चला चरण त्याचे ।

स्थापायाला स्वराज्य दंडायाला मत्ताला
मदत करी तुळजा, हा राजा अवतारी झाला."

"बी"नी राष्ट्रजाती म्हणून हिंदूंचा अगदी निःसंकोचपणे व निर्भयपणे पुरस्कार केला आहे. हिंदुराष्ट्रजातीचा गौरव म्हणजे "बीं"च्या राष्ट्रीय भावनेचा भाग होता म्हणून ते म्हणतात -

"नुरो पैरवी पृथ्वी वरती हिंदूंची काही
जणू मनसुबा असा करी ही सालिम दुनियाही,
समूळ बुडवा हिंदू मर्जी असेल देवाची
राजी आम्ही करून जाऊ करणी मर्दाची."

महाराष्ट्रीयांच्या पराक्रमानेच बदलत्या कालाप्रमाणे नवभारताची निर्मिती होणार आहे. कवीने केलेले हे आव्हान उत्कटच वाटते. यावरून कवीला नवभारत निर्मितीचा ध्यास लागलेला दिसतो. मराठ्यांनी केलेला पराक्रम त्याची निर्मिती पुन्हा झाली पाहिजे असा विचार या पोवाड्यातून मांडला आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांनी लष्करात भरती होण्याचा विचार भारतीयांपुढे मांडला होता त्या विचारांचा परिणाम "बीं"वर झाला असण्याची शक्यता आहे. विष्णू मोरेश्वर महाजनी यांना हा पोवाडा फार आवडला त्यांनी त्यावर अभिप्राय दिला आहे की, हा पोवाडा "इरेश्री" (वीरश्री) उत्पन्न करणारा आहे. एखाद्या
ला देऊन, तो गायल्याचा काय परिणाम होतो पहावा."

<u>भगवा झेंडा</u> -

"बी" कवी हे प्रगतिवादी विचारसरणीचे आहेत. या प्रगतीसाठी त्यांनी या कवितेतून आव्हान केले आहे. वर्तमान कालीन परिस्थितीचे चित्र रेखाटले आहे. समाजात जे जातीभेद दिसतात, अन्याय, रुढी, विषमता यामुळे आपली अधोगती होत आहे. ही अधोगती थांबवावी. आपला विकास व्हावा व या विकासासाठी देशातील लोकांनी एकत्र यावे व प्रगती करावी हा विचार ते मांडतात.

जुन्या काळातील वैभवाचा बडेजाव सांगत बसल्यापेक्षा, घातक रुढी चालू ठेवून दुराचाराचे प्राबल्य माजवणारे जे लोक आहेत त्यांच्या विरुध्द बंड केले पाहिजे नव्हे बंड करणे हे कर्तव्यच आहे आणि या मार्गाने गेले तरच समाज प्रगतिपथावर जाईल असे त्यांना वाटते असे करता

"जे जे कोणी रडत बसती मागिलाते स्मरोनी,
सद्य:स्थांच्यावर उसळती सिंहनादा करोनी
त्यांनी हास्यास्पद विकृत ही वृत्ती आता त्यजावी,
प्राक्काळाची प्रगतिपरता तेवढी मात्र घ्यावी."

असा इशाराही द्यायला कमी करत नाहीत. दुबळया मनाच्या निष्क्रीय लोकांना प्रयत्नवादी बनविण्यासाठी ते असे सांगतात. हे सांगत असतानाच आपल्या ध्येयाची जाणीव करून देताना "बी" म्हणतात-

"झेंडा बंडास्तव उभविला भव्य गेल्या पिढीने
स्वोत्पन्नांच्या करि निरखुनी जाय ती साभिमाने
जेथे जेथे कटु विषमता आणि अन्याय गाजे
तेथे तेथे झगडुनि जना बंधनिर्मुक्त कीजे."

येथे "बीं"चा समन्वयवादी दृष्टिकोन दिसून येतो.

समाजातील प्रत्येक क्षेत्रात दिसून येणारी विषमता, अन्याय याविरुध्द समाजातील सूज्ञ लोकांनी बंड करावे. शांतीचे प्रतिक असलेल्या या भगव्या झेंडयाखाली जनतेने एकत्र जमावे असे ते सांगतात.

<u>ह्यात काय संशय १</u> -

या कवितेत शैक्षणिक प्रगतीची -हदयभेदक मिमांसा केलेली आहे. या कवितेत जीत (हिंदुस्थानातील लोक) जेत्ये (इंग्रज) यांच्या विरोधी संबंधावर स्वजनांची स्थिती कशी झाली आहे याचे वर्णन "बीं"नी केले आहे.

आपली शैक्षणिक प्रगती ही आपण स्वत:च्या बुध्दिमत्तेने करून घेतलेली नाही. तर ती परपुष्ट आहे. पाश्चिमात्यांच्या ग्रंथाच्या परिशीलनाने झालेली आहे. दिवसेंदिवस पाश्चिमात्य संस्कृतीचा आपल्या संस्कृतीवर प्रभाव पडत चालला आहे. आपणाला या गोष्टीची खंत न वाटता उलट अभिमानचे वाटतो, याची कवीला खंत वाटते. म्हणून ते पोपटाचे उदाहरण देऊन सांगतात की, "पोपटाला बोलता येते ते स्वत:च्या बुध्दीने नाही तर तो विजय मानवजातीचा असतो. तो विजय त्याचा स्वत:चा नसतो. आज आम्ही पुष्कळ गोष्टी शिकलो. आम्हाला परभाषेत सुरेख पांडित्य करता येते. पण हा सगळा पराक्रम आपला स्वत:चा नाही हे लक्षातच येत नाही. राज्यकर्त्यांचे कर्तृत्व आमच्यात उमटलेले पाहून ते आनंदून जात असतील पण पोपटाचे बोल म्हणजे अर्थशून्य बडबड असते. म्हणून "बी" म्हणतात -

> "येती कवितेमधे फिरुनि जरी पदे नित्य तीच ती,
> त्याच त्या अर्थाप्रति दाविती."

वास्तविक पहाता पोपटाने गरूडासारख्या आकाशात उंच भरा-या माराव्यात पण मानव त्याला पिंज-यात अडकून ठेवतो. पण या गोष्टीची पोपटाला खंत वाटत नाही. उलट मानवाने आपल्याला शिकवले त्याबद्दल तो मानवालाच धन्यवाद देतो." तशी हिंदुस्थानातील मानवाची पिंज-यातील पोपटाप्रमाणे स्थिती झाली आहे. याचे दु:ख "बीं"ना वाटते.

<u>दोन मी</u> -

दुस-या महायुध्दाचा वणवा पेटला होता. अमेरिकेने जपानवर अणुबाँबचा स्फोट केला होता. ही बातमी वर्तमान पत्रात आल्यावर "बीं"नी वाचली. या बातमीबद्दल त्यांचे जावई खं.गो.प्रधान यांच्या-बरोबर त्यांना या बातमीबद्दल चर्चा केली होती. त्यावेळेस -

"अणू, रेणू आणि निरत्रेणु" यासंबंधीचे संपूर्ण ज्ञान आपल्या ऋषीमुनींनाही होते. त्या ज्ञानाचा दुरुपयोग त्यांनी केला नाही. त्यांचे आत्मिक सामर्थ्य फार मोठे होते."[२५] असे विचार त्यांनी चर्चेत मांडले होते.

पाश्चिमात्य राष्ट्रे सुधारलेली आहेत पण त्यांच्यात मानवतेचा अंश राहिलेला दिसत नाही. उलट पशुवृत्तीच दिसून येते. अणूरेणूवर वर्चस्व म्हणजे बुध्दी विकास नाही असे त्यांना वाटते. मात्र आपली संस्कृती ही वेगळी त्यामधे मानवतेला महत्व दिले जाते. म्हणून

"योग बुध्दीचा मानवतेशी "बुध्दियोग निस्वार्थपर"
शिकोनी टाकू हा आताचा क्रूर तामसी संहार"

असा आपला मानवतावाद प्रकट करतात "बी"ना पाश्चात्यापेक्षा आपली संस्कृती श्रेष्ठ वाटते म्हणून ते म्हणतात -

"संस्कृति म्हणजे जीवनसरणी वेगवेगळ्या त्या असती
विशेषता तीतली आपली दक्षपणे या रक्षूनी
संस्कृति परकीयांची करणे आत्मसात हे शक्य नसे
अंगलट करू नका तिच्याशी त्यात आपला घात असे."

यातून आपल्या संस्कृतीचा अभिमान त्यांनी व्यक्त केला आहे. त्याचबरोबर पाश्चात्य संस्कृतीचे अनुकरण करणाऱ्या प्रवृत्तीचा निषेधही केला आहे. सृष्टी नियमाच्या अक्षयतेचे तत्व प्रत्येकाच्या मनात ठसले पाहिजे आणि त्याने आपल्या देशासाठी सर्वस्वाचे अर्पण केले पाहिजे असे सांगून म्हणतात -

"जीवन संजीवनी त्याग ही राष्ट्र असो संपन्न नसो
ना तरि त्याचा विनाश मनि हे अक्षयतेचे तत्व ठसो.
देश असो माझा मी त्याचा सर्वस्वार्पण करीन मी
निर्वाणीही कधी न होइन देशाचा बेमानहरामी."

असा निर्वाणीचा निर्धार व्यक्त केलेला आहे.

प्रतिमाभंग -

या कवितेत यवनांनी भारतीय शिल्पांचा, मूर्तींचा केलेला विध्वंस पाहून कवीला अतोनात दु:ख होते. यवनांनंतर परकीयांनी आपल्यावर वारंवार हल्ले केले. पण या विध्वंसाबद्दल भारतीयांना चीड येत नाही याचे आश्चर्य "बीं"ना वाटते. आमचे नेतेही आम्हाला ही दुष्टता विसरून जाण्यास सांगतात व शांतीपाठ देतात. याविषयी "बीं"ना चीड येते अनेक प्रयत्न करून निर्माण केलेल्या या मूल्यांचा विध्वंस होताना पाहून त्यांना दु:ख तर होतेच पण त्यापेक्षा जास्त दु:ख अखंड भारताचे भव्य शिल्प उध्वस्त होताना होते. ती प्रतिक्रिया अतिशय तीव्र शब्दात व्यक्त होते व म्हणतात -

"त्यांनी मूर्ती अनेक यत्न करुनी होत्या श्रमे निर्मिल्या
गर्वोन्मादभरात नीच यवने येवोनी त्या भंगिल्या।
हा विध्वंस समोर एक, दुसरे अद्यापिही चालता -
राष्ट्रात्मा खचोनी जाय न कसा विच्छेद हे साहता ?"

आम्ही निर्माण केलेल्या कलाकृती हेच आमचे जग आहे

"कोणी निष्ठुर येउनी जरि तिला भंगोनी टाकीतसे
या निर्माल्य जगात राहुनि अशा, त्याने जगावे कसे ?"

असा प्रश्नही "बी" विचारतात.

क्षणभर -

ही कविता रचण्याची प्रेरणा "बीं"ना "कार्ल मार्क्सचे चरित्र वाचत असताना सुचली, "मार्क्स कुटुंबियांचा अनन्वित छळ झाल्यामुळे त्याला जर्मनी आणि फ्रान्स सोडून आपल्या कुटुंबियासह इंग्लंडला जाऊन रहावे लागले. तेथे अनेक हाल अपेष्टा सोशीत असताना एक गृहस्थ मार्क्सबाईच्या भेटीस आला. त्याने मार्क्सबाईला विचारले,

"इतका भयंकर छळ व हालअपेष्टा सोशीत असताना आपण अगदी आनंदी कशा दिसता ?, तिने उत्तर दिले, "आमच्या आणि आमच्या मुलाबाळांच्या हालअपेष्टांची जाणीव आम्हांला नेहमी बोचत असते. परंतु ज्या एका ध्येयाकरिता माझे पती व आम्ही या हालअपेष्टा भोगत आहोत ते ध्येय आमच्या डोळ्यापुढे उभे राहिल्याबरोबर भोगीत असलेल्या हालअपेष्टा आम्ही पार विसरून जातो आणि आम्हाला त्याचे भान रहात नाही."[२६]

हे कार्ल मार्क्सचे चरित्र वाचून त्यांना त्या काळातील देशभक्तांना चक्की पिसणे, मोट ओढणे, जमिनीवर जोरात आपटणे वगैरे शिक्षा होत. तरीही आपल्या देशासाठी हा जुलूम ते आनंदाने सहन करीत याचे कारण कळून आले. देशाच्या स्वातंत्र्यासाठी बलिदान करणारे हुतात्मेही त्या काळात अस्तित्वात होते. त्यांचा जयजयकार करण्याच्या हेतूनेच त्यांनी ही कविता लिहली.

यातही "बी"चा जीवनाकडे पहाण्याचा आशावादी दृष्टीकोन व्यक्त झाला आहे, म्हणून ते आपल्या डोळ्यासमोर फुलाचा आदर्श ठेवतात व म्हणतात -

"काटेरी वेलीचे जाळे
रुक्ष चर्म, गाठांनी भरले,
अग्रावर पण निर्मल ढवळे
होते एकच कुसुम विकसले ।

देशभक्तांनीही असेच आदर्श डोळ्यासमोर ठेवले असतील म्हणून स्वातंत्र्यासाठी बलीदान करण्याचे सामर्थ्य त्यांच्यात निर्माण झाले असेल असे त्यांना वाटते असा आशावादी दृष्टिकोन व्यक्त केला आहे.

"बी"नी लिहलेल्या राष्ट्रीय कवितांचा विचार करता असे दिसते की, त्यांच्या पूर्ववैभवाच्या स्मृती ताज्या आहेत. ते पूर्ववैभव परत मिळवायाचे असेल तर त्यासाठी स्वातंत्र्य हवे आणि ते स्वातंत्र्य मिळविण्यासाठी प्रयत्न

केले पाहिजेत आणि हे प्रयत्न करण्यासाठी जनतेत चैतन्य निर्माण केले पाहिजे. त्यासाठी ते पूर्ववैभवाचा आश्रय घेतात व संपूर्ण मानव समाजाचा विकास व्हावा अशी आशा बाळगतात.

## 3·५ प्रेमकविता -

आधुनिक कवितेने इतर अनेक विषय घेतले, त्याचप्रमाणे प्रेमकाव्येही लिहली. पूर्वीही प्रेमकाव्ये लिहली जात होती पण राधाकृष्ण, गोपीकृष्ण अशा देवादिकांच्या बुरख्याआडून केशवसुतांनी या रुढीला धक्का दिला आणि सामान्य माणसाचे प्रेम हा काव्याचा विषय होऊ शकतो हे दाखवून दिले.

केशवसुतांच्या मागून येणाऱ्या कवींनी आपल्या काव्यातून व्यक्तिगत प्रेमभावना व्यक्त केल्या. तरुण मनाच्या प्रेमाचा अविष्कार उघडपणे केला. एवढेच नव्हे तर रा.ग.गडकऱ्यांसारखे कवी "प्रेमाचे शाहिर" म्हणून ओळखले जाऊ लागले.

कवी "बीं"नी प्रेमभावना व्यक्त करणारी प्रेमकाव्ये लिहली. प्रेमविषयक कविता म्हणजे स्त्री-पुरुष संबंधाच्या कविता किंवा शारीरिक आकर्षणावर आधारलेली कविता असा सरळ अर्थ लावला जातो. परंतु "बी" प्रेमाकडे अधिक व्यापकतेने पहातात. त्यांची प्रेमगीते वैषयिकतेपासून आणि वैयक्तिपासून सर्वस्वी अलिप्त आहेत.

### प्रणयपत्रिका -

ही "बीं"ची पहिली कविता. या कवितेच्या नावावरुन विषयाची कल्पना आपणाला येते. "प्रणयपत्रिका" या कवितेत एका विरहिणीचे चित्र अतिशय सुंदर रेखाटले आहे. विरहावस्थेतील भाव अतिशय कुशलतेने कविने उलगडले आहेत. विरहावस्थेत मनात येणारी शंका पुन्हा आपलेच मन त्या शंकेचे निरसन करते आणि पतिप्रेमाबद्दलची खात्री त्या सर्वच

LIBRARY KOLHAPUR

गोष्टी या कवितेत आल्या आहेत. पतीपासून दूर गेलेल्या एका स्त्रीने लिहिलेली ही "प्रणयपत्रिका" आहे. पतीच्या खुशालतेचे पत्र न आल्याने तिला काळजी वाटते आहे. पतीमिलनासाठी ती आतुर झालेली आहे म्हणून विरहातील एक एक क्षण तिला युगासारखा वाटतो आहे. विवाहानंतर आपल्या प्रेमाने वश झालेल्या आपल्या पतीला आपल्या प्रमाणेच आपली आठवण येत असेल असे तिला वाटते. पण लगेचच तिच्या मनात शंका येते की,

"तरल मन नराचे राहते ऐकते मी
विसर बघुनि पावे अन्य पात्रास नामी.
कमलिनि भ्रमराला नित्य कोशात ठेवी
अविरत म्हणुनी तो पंकजी प्रेम दावी."

आणि या शंकेचे निरसनही तिचे मन करते. आपल्या पतीप्रेमावर तिचा दृढविश्वास आहे. तो दुस-या स्त्रीच्या प्रेमपाशात अडकणे शक्य नाही. हे सर्व खरे पण मग त्यांचे पत्र का नाही. अखेर तिचेच मन तिला या प्रश्नाचे उत्तर देते.

"मम विरह तुम्हाला जागवी, शीण देई,
स्थिती जरि असली का आपली सत्य होई,

आपल्या मनातले विचार, काळजी, शंका-कुशंका आणि पतिप्रेमाबद्दलची खात्री या सर्व गोष्टी तिने आपल्या प्रणयपत्रिकेत लिहल्या आहेत. आणि शेवटी स्त्री स्वभावाला अनुसरून ती म्हणते -

"जपुनी सतत वागा काळजी सर्व सोडा"

अशी स्त्री स्वभावाला अनुसरुन सुचनाही करते हे काव्य लिहिताना कवीनी स्त्रीच्या मनाचा हळवेपणा, तिच्या भावना अगदी स्त्रियांच्याच बोली भाषेत रेखाटलेल्या दिसतात.

"परि मम मन आहे खिन्न अत्यंत बाई ।
कुशल कळविणारे पत्र ते का न येई ? "

जणू काही एखाद्या स्त्रीनेच ही कविता लिहिली आहे. अशी सुंदर शब्दयोजना कवीने साधली आहे. स्त्रीमनाच्या स्वभावाचा हळुवार पापुद्रा उकलत असताना पुरुषाच्या स्वभावाचे एक वैशिष्टयही "बी" सांगून जातात व म्हणतात -

"तरल मन नराचे राहते ऐकते मी"

विरहिणीचे भावतरंग कवीने अतिशय हालक्या हाताने उकलले आहेत. तिच्या मनातील स्पंदने हळुवार टिपली आहेत. विरहावस्थेतील भावनेचे एक सुंदर चित्र या कवितेतून कवीने आपल्या डोळ्यासमोर ठेवले आहे.

<u>बकुल</u> -

श्री.अ.ना.देशपांडे सांगतात - या कवितेचा अर्थ कळावा म्हणून खुद्द कवीने दिलेले थोडेसे स्पष्टीकरण "युगवाणी"च्या फेब्रुवारी १९४६ च्या अंकात प्रसिध्द झाले आहे. ते असे

"रूप आणि ऐश्वर्य यांच्या भराने गर्वान्ध झालेली,
स्वभावात अवखळपणा आणि नादिष्टपणा असलेली
व दुस-यावर अधिकार गाजविण्याची हौस असलेली
एक तरुणी सौंदर्याच्या धुंदीत आपल्या ख-या प्रियक-
राची अवहेलना करते आणि नंतर तिला त्याबद्दल
पश्चाताप होतो, अशी या कवितेची भूमिका आहे."[२७]

या कवितेमधे प्रणयिणीचा विरहभाव व्यक्त केला आहे. हे प्रतिकात्मक प्रेमगीत आहे. प्रेमविषयभूत झालेल्या प्रेमीजनाची स्त्रीस्वभाव-सुलभ चांचल्यामुळे एका तरुणीकडून प्रथम हेलसांड होते. कवी वर्णन करतात -

"स्वच्छंदे दिन दोनचार मग मी तत्संगमी रंगले
रूपोन्मादभरागमे मज गमे सौंदर्य लोकेश्वरी"

असे या नायिकेचे चंचल चित्र कवीने रेखाटले आहे. ही तरुणी प्रियकराची

सततच हेळसांड करते. तरीही त्याचे प्रेम कायमच आहे. पण ज्यावेळी तिचा रूपाचा व सौंदर्याचा उन्माद ओसरतो, तेव्हा तिला ख-या प्रेमाची आठवण होते. नंतर ती आपल्या पूर्वप्रियकराकडे जाते व त्याची क्षमा मागते आणि म्हणते -

"पाहू वाट किती ? "क्षमस्व" म्हणते । लाचार माझी स्थिती ।
नेत्री प्राण उरे । करूनि बघणे आता परीक्षा किती ?
नारीधर्मरहस्यभाग नव्हता ठाऊक माते जसा
नारीचा -हृदयस्वभाव कळला नाही तुलाही तसा ।"

हे सर्व स्त्रीच्या चंचल स्वभावामुळे घडले असे कवीने सांगितले आहे. चंचलपणा हे स्त्री स्वभावातील एक वैशिष्ट्येआहे असे कवी सांगतात. या कवितेविषयी आचार्य अत्रे म्हणतात, "सौंदर्याच्या उन्मादाने मस्तक धुंद झाल्यामुळे तरूणी आपल्या प्रियकरांची जी निष्ठुर अवहेलना करतात त्यांच्या डोळ्यात या कवितेने झणझणीत अंजन बसेल."[२८]

बुलबुल -

या कवितेत कवी "बीं"नी प्रेमभंगाची एक करूण कथा वर्णन केलेली आहे. ही कथा सांगताना कवींनी प्रियकराच्या जागी बुलबुल आणि प्रेयसीच्या ठिकाणी जातिलता(जाईचा वेल) या प्रतिमा योजल्या आहेत.

पूर्वजन्माचा एक प्रियकर आणि त्याची प्रेयसी प्रेमाची पूर्तता न होता मरण पावलेली आहेत. पुढील जन्मी तो प्रियकर बुलबुल होऊन जन्माला येतो आणि ती तरूणी एका स्मशानात जातिलतेचा जन्म घेते. पूर्वजन्माच्या प्रेमाची आठवण त्यांच्या ठिकाणी जागृत राहिल्यामुळे या जन्मीसुध्दा त्या दोन जीवांची जोडी जमते. दररोज रात्री प्रेमाने व्याकूळ झालेला तो बुलबुल त्या जाईच्या वेलीखाली येत असे आणि व्याकुळ कंठाने शोकगीत गात असे. बुलबुलच्या सानिध्यात

मागील प्रेमस्मृतीच्या अखंड अमृतसिंचनाने तो जाईचा कृश वेल स्मशानात असूनही अगदी ताजा टवटवीत आणि पानाफुलांनी बहरलेला दिसे. ते दृश्य पाहून तेथे येणाऱ्या लोकांना अगदी आश्चर्य वाटे आणि म्हणत -

"वसंत न करि चैत्रशिंपणे,
डोलत रविकर न करी येणे,
झुरे अंतरी तरिही तेणे
अगाईग, नवल ही जाई न या महीवरिल!"

या स्मशानभूमीला लागून असलेल्या गावातील लोक बुलबुलच्या मधुर स्वरांनी खेचले जात आणि तेथे पसरलेल्या नादब्रम्हात ते विलीन होत आणि त्या प्रेमीयुगुलाशी त्यांचे इतके तादात्म्य होई की, क्षणभर ते बुलबुल आणि जातिलता यांना विसरुन जात व त्यांना असा भास होई की, आपल्याच विफल झालेल्या प्रीतचे बोल आपल्याच अंतकरणातून बाहेर पडत आहेत. बुलबुलच्या शोकगीताच्या स्वरात कोणातरी स्त्रीच्या नावाचा उच्चार होतो आहे. असेच त्यांना वाटे.

प्रेम ही अशी दिव्य शक्ती आहे. प्रणयी जीवांची ताटातूट मृत्यूने झाली तरी सुध्दा त्यांची प्रीती जन्माजन्मांतरी कायमच राहते. या दिव्य प्रेमाची महती या कवितेत वर्णन केली आहे. वैयक्तिक अनुभूतीच्या आधारावर रंगविलेल्या प्रेमभंगाच्या दारुण कहाणीपेक्षा अद्भूत वातावरणात रंगविलेली प्रेमभंगाची कहाणी खरोखरच अधिक उत्कट आणि परिणामकारक वाटते.

निवेदन -

"प्रणयभावनेने वेडापिसा झालेल्या प्रियकराच्या मन:स्थितीचे वर्णन कवीने या कवितेत केले आणि या मन:स्थितीला साजेसे असणारे असे निसर्गात ओतप्रोत भरलेले प्रणयप्रधान जादूचे वर्णन कवी करतो. अशा वातावरणामुळे प्रेमभावनेला आपोआप वाच्यता प्राप्त होते. प्रेम हीच

नैसर्गिक गोष्ट आहे. त्यामुळे निसर्गसानिध्यात ती आपोआपच प्रगट होते. सुगंधाने पुलकित झालेल्या बागेत, रम्य संध्यासमय आहे, कूजन करणारे खग, प्रशांत निकुंज, पूर्णस्यात प्रगटलेला चंद्र आहे अशा वातावरणात मनातील तिच्याविषयीच्या भावना सांगण्याचे तो ठरवितो.

"कथिन तुज मी अव्यंग शुभांगील"

तिच्या विषयीचे अपार्थिव आणि गूढ भावांचे वर्णन त्याच्या चित्तामध्ये दाटलेले आहे. एवढेच नव्हे तर त्याचे मन रानसान ग्रहमालिकाप्रमाणे एकसारखे तिच्याविषयीच विचार करीत होते. तो म्हणतो -

"हाय खळबळ जी अंतरी मदीय
भ्रमणावेगाची तीव्रता तदीय.
स्पंद -हृदयाचे स्तब्ध निकुंजात,
कादिबाही करतील तुला ज्ञात !"

त्यातच मनाला मोह घालणारे सुंदर असे लताकुंज आहेत आणि अशात जर रमणीचा सहवास लाभला तर मग मात्र कनावर ताबा राहणार नाही, आणि तो प्रियकर म्हणतो -

"कुंज आधी सम्मोहनीय भारी,
वरी रमणीसहवास मनोहारी !
भ्रान्त होऊन बरळेन जरी काही !
दोष माझा तिळमात्र त्यात नाही ! "

मीलनाला उत्सुक असणाऱ्या मनाचे काढलेले चित्र कवीने अतिशय सुंदर वर्णिले आहे.

जर आपल्या मनातल्या प्रणयभावना व्यक्त झाल्या तर तो चंद्राला दोष देणार आहे.

"नभी दोषाकार हा पहा उदेला,
भ्रंश मनुजाच्या पाडितो मनाला,
गोड इंदूचा आणि पिसाटाचा
सिध्द आहे संबंध अनादीचा."

अत्यंत रमणीय पण संयमित अशी कविता आहे. प्रेमभावना हीच मुळी अनादी आहे. प्रेमात वेडे होणे, बेभान होणे हे स्वाभाविक आहे हे तत्वज्ञान "बीं"चे येथे प्रकट झाल्यासारखे वाटते. निसर्गाच्या सहवासात केलेले प्रणयभावनेचे हे "निवेदन" आहे. मात्र कवीने एका वेगळ्या वातावरणात रसिकाला गुंगविण्याचा केलेला प्रयत्न यशस्वी वाटतो.

<u>प्रीति -</u>

प्रेमविषयाचे तत्वज्ञान या कवितेत जे कविने प्रगट केले आहे. प्रीतीचा मार्ग हा काटेरी असतो. ही काटेरी वाट लक्षात ठेवूनच प्रीती करावी हा विचार "बीं"नी या कवितेत सांगितला आहे.

प्रेम करणे हे सहज स्वाभाविक आहे पण प्रेम करणे वाटते तितके सोपे नाही. दिसायला ही प्रीती अतिशय मोहक सुंदर अशी आहे.

"दिसो रुचिरा ती असे गरलधारिणी नागिणी"

प्रेमी जीवांना एकमेकाबद्दल जोपर्यंत ओढ आहे तोपर्यंतच ती प्रीती उपभोगता येते आणि ही ओढ असणे हेच खरे प्रेम आहे आणि एकदा का त्यांच्या मनातील प्रीतीचे आकर्षण संपले की मग कलह निर्माण होतात. प्रेमप्राप्ती ही एक महान तपश्चर्या आहे नव्हे संघर्ष हीच प्रीती आहे आणि या संघर्षात जो टिकून राहिल तीच खरी प्रीती होय हे तत्व सांगताना "बीं"नी प्रीतीची दोन रुपे सांगितली आहेत.

रागिणीप्रमाणे मधुर गीत गाणारी प्रीती आणि दुसरी नागिणीप्रमाणे सतत गरळ ओकणारी प्रीती. एक उषेसारखी प्रसन्न, मंगल तर दुसरी वैषयिक भावनेनी बरबटलेली कवी "बीं"ना मधुरगीत गाणारी रागिणीप्रमाणे असणारी प्रीती अभिप्रेत आहे. जीवनाला सन्मार्गाकडे नेणारी, सुखदुखात साथ करणारी, उज्ज्वल, श्रेयस ध्येयाकडे नेणारी अशी श्रेष्ठ प्रकारची प्रीती अभिप्रेत आहे आणि ते म्हणतात तीच खरी प्रीती.

प्रेमातील वाट काटेरी असली तरी ती साध्य करण्यासाठी त्या वाटेवरून जाताना विचारपूर्वक जावे हा विचार या कवितेत मांडला आहे.

मार्गप्रतीक्षा -

या कवितेच्या नावावरून आपल्याला वाट पहाण्याचा बोध होतो. या कवितेत एका विरहिणीचे चित्र निसर्गाच्या पार्श्वभूमीवर रेखाटले आहे.

या कवितेतील नायिका प्रियकराच्या विरहाने व्याकूळ झालेली आहे, आपला विरह क्षणभर विसरावा म्हणून ती निसर्गाकडे धाव घेते. पण तिचा विरह निसर्गातील दृश्ये पाहून अधिकच वाढतो. निसर्गातील प्रत्येकजण प्रणयक्रीडेत मग्न झालेला आहे असे तिला दिसते.

"पुष्पाचे मृदु बाहुबंद पडले उन्मत्त भृंगावरी,
अत्युत्कंठित वल्हारीस धरिती वृक्ष स्वकुक्ष्यंतरी,
झाले निद्रित भानुबिंब - दयिता दिग्देविवक्षावरी"

उन्मत्त अशा भृंग्याभोवती फुलांच्या करांचा विळखा पडला आहे. वृक्षाच्या कुशीत शिरून वेली समाधानी झालेल्या दिसतात. असा सर्व निसर्ग प्रणयक्रिडेत मग्न झालेला तिला दिसतो.

"ओढी उत्कट सिंधू मुग्धवसुधाचैलांचला झोंबुनी,
वाटे मंगल काल रंगमय .त्या जाता प्रसंगातुनी."

ही सर्व प्रेमसाफल्याची दृश्ये पाहून तिच्या एकलेपणाची व्यथा अधिकच गडद होते. हे सर्व प्रेम साफल्याचे मंगल सुंदर प्रसंग पाहून तिला असे वाटते की,

"येथे एकच मी अशीच बसुनी मार्गप्रतीक्षा करी!"

अशा एका विरहिणीची हुरहूर कविने उत्कृष्ट टिपली आहे.

प्रमिला -

प्रियकराने प्रेयसीला उद्देशून गायिलेले हे गीत आहे. प्रेमातील प्रेयसीच्या मोहक विभ्रमाचे अत्यंत उत्कृष्ट चित्र कवीने रेखाटले आहे. या

कवितेतील नायिका आपले भाव ख-या स्वरूपात प्रकट करीत नाही. त्या प्रेयसीला तो एकदा भेटायला गेला असता ती गाढ झोपी गेलेली असते. त्याचे प्रेम हे उदात्त आहे, अशारीरिक आहे. म्हणून तिला त्या स्थितीत पाहून तो म्हणतो -

"ती नीद्रावश होय आज रमणी एकान्त शय्येवर
वाटे की निजले निरभ्र गगनी नक्षत्र हे सुंदर"

या काव्याच्या ओळीवरून कवीची कल्पना खरोखरच गगनाला जाऊन पोहचली असे वाटते.

जागेपणी आपले प्रेमभाव व्यक्त न होऊ देणा-या प्रियेचा झोपेत मात्र आपण त्याला विरोध केल्याचा पश्चाताप तिच्या चेह-यावर दिसतो याचे कवी वर्णन करतात -

"ते निद्रेत मुखारविंद फुलले मंद-स्मिताने किती !
स्वच्छंदे प्रतिकारिता मजप्रति, प्रोत्साह ये ज्या नव,
झाले हात मृणालनालसम, तो माझा करी गौरव !"

जणू काही त्याच्याशी संभाषण करायला ओठ आतूर झालेत म्हणून नायक म्हणतो -

"हे ओष्ठ स्फुरतात, आतुर जणो माझ्यासवे भाषणी,
निद्रा ही उपकारिणी प्रगटली, घाली हिला मोहनी !"

म्हणून निद्रा ही उपकारिणी ठरली असेच त्याला वाटते. म्हणून तो म्हणतो.

"राहो तोवर ही अशीम विषमा निद्रिस्त रामा स्थिर,
मी राहीन असाच पाहत उभा हे चित्र लोकोत्तर."

अशी इच्छा तो रामाजवळ व्यक्त करतो.

एका साध्या प्रसंगातून कविने हे प्रेमाचे वर्णन अतिशय सुंदर केले आहे. नायिकेच्या अंतरंगातील भाव कवितेतून वर्णिला आहे.

रूपमुग्धा -

लावण्यसंपन्न अशा एका किशोरीने तारूण्यात पदार्पण केले आहे. तिच्या सौंदर्याचे वर्णन कवी या कवितेत करतात. ती आपले रूप एकांतात आरशात पहात आहे आणि हे रूप पहात असताना ती अनेक निरनिराळे विभ्रम करीत स्वत:चे सौंदर्य आरशात पहात आहे.

"ओष्ठ भ्रू, कर कधी मोडिशी, स्थिर कधी चंचल दृष्टी
क्षणोक्षणी निर्मिशी विलक्षण नूतन अभिनयसृष्टी !"

हे सौंदर्य इतके फुलले आहे की, साहित्यातील सौंदर्यसुध्दा त्यापुढे फिके वाटते. कवी वर्णन करतात -

"सौंदर्याच्या या स्फुरणाते पाहुनि प्रत्यक्षाते
साहित्यातील रसभावांचे व्यर्थ प्रदर्शन होते !"

हे सौंदर्य पहात असतानाच "खट्ट" असा आवाज येतो आणि ती स्वत:ला सावरते.

"फुटे आरसा, स्वप्न उडाले स्पष्ट वाजता "खट्ट"
मुक्तांगावर सबलित पदर घे सावरूनि ती घट्ट ।
सभोवार भयचकित लोचने पहात उठली पटकन ।
रागात्मक भावांचे तुटले नाजूक सूत्रहि तट्कन !"

तिच्यातील नारीतत्त्वाचा उद्भव याच क्षणी होतो. नारीतत्त्वाचा झालेला हा पूर्णोदय पाहण्याचे भाग्य सर्वांनाच लाभत नाही. प्रत्येकाला हे भाग्य लाभावे अशी इच्छा कवी व्यक्त करतात व म्हणतात -

"जन्मा येउनि एकवेळ हा पर्वकाळ साधावा
पूर्णोदय "नारीतत्त्वाचा" भाग्ये अवलोकावा" ।

अशा प्रसंगी स्वत:ला अनुभव घेता येतो शब्दातून त्याचे वर्णन करणे अशक्यच असते. हा स्वानुभव असतो म्हणून हे भाग्य प्रत्येकालाच लाभावे असे "बी"ना वाटते.

रूपमुग्धेचे वर्णन करताना तिचे लहान सहान विभ्रम कवीने अगदी हळूवारपणे टिपले आहेत. उतारवयातील त्यांची ही कविता पाहिली म्हणजे त्यांची रसिकता व सौंदर्यदृष्टी अगदी शेवटच्या क्षणापर्यंत टिकून होती याची कल्पना येते. पण एक गोष्ट लक्षात येते की, उतारवयात सुध्दा त्यांनी आपला संयम ढळू दिला नाही. त्यांच्या प्रत्येकच प्रेमकवितेत शारीरिक गुंतवणूक कुठे आढळत नाही. उलट अतिशय उदात्त, उत्कट अशा स्वरूपाची प्रेमकाव्ये त्यांनी लिहिली आहेत. प्रेमाला भावनेच्या पातळीत अतिशय उच्च दर्जाचे असे स्थान दिले आहे.

चाफा -

"बी"नी या गीतात शुध्द प्रेमाचे नितांत सुंदर असे वर्णन केले आहे. हे अतिशय गाजलेले आणि नावाजलेले असे गीत आहे. "बी" कवींच्या उदात्त तत्त्वज्ञानाचा व तेजस्वी कल्पनेचा अत्यंत -हृदयंगम असा संगम झालेला आहे. असे दिसून येते. प्रेमाचे अमरत्व सांगणारी आणि प्रीतीच्या सफलतेचा सुंदर साक्षात्कार घडविणारी आणि कल्पनारम्य अशी ही कविता आहे.

"चाफा" हे एक प्रतिकात्मक प्रेमगीत आहे. त्यामुळे तिचा अर्थ कळत नाही व गूढ आहे असे सर्व सामान्यांना वाटते. पण खुद्द कवीने असे वर्णन केले आहे की, "प्रेमीभूत ध्येयविषयाची गाठ पडली असता आणि प्राप्ति झाली असता सबंध देहभाव पालटून निखळ प्रेम हाच एक सहजभाव बनून जातो". [२९]

"चाफा" या कवितेत प्रेममिलनास अत्यंत आतूर झालेली निष्कपट व निर्व्याज भावनेची मैत्रिण गंभीर वृत्ती धारण करून बसलेल्या आपल्या प्राणसख्याला "चाफा" कल्पून हे गीत गात आहे. आपल्याप्रमाणेच आपल्या सख्याने (चाफा) आपल्या आनंदात सहभागी व्हावे असे तिला वाटते. म्हणून ती त्याला फुलविण्यासाठी, खुलविण्यासाठी निरनिराळ्या

प्रकारच्या युक्त्या, प्रयुक्त्या आखते. त्याचे वर्णन कवीने अतिशय कल्पकतेने केले आहे. त्यांच्या आम्लान प्रतिभेची कल्पना आपल्याला येथे दिसून येते.

आपल्या प्रियकराला खुश करण्यासाठी ती प्रेयसी आपल्या प्रियकराला घेऊन आंबेवनात गेली. तिथे तिने मैनांच्या गळयात गळा मिसळून गाणी म्हटली. नंतर ती त्याला केवडयाच्या बनात घेऊन जाते. तिथेही ती देहभान विसरुन नागाप्रमाणे डोलू लागते. नंतर -

"आले माळ सारा हिंडून
डंबर पशुसवे घालून
कोलाहलाने गलबले रान"

पुढे तिने त्याला धिप्पाड कडयाला आपल्या रुपेरी बाहूंचा विळखा घालणारी नदी दाखविली. प्रेमाने वेडा झालेला मेघ विद्युल्लतेला आपल्या करपाशात घेण्याचा प्रयत्न करीत आहे. पण ती त्याला सळकन झुकांडी देऊन निसटून जात आहे. तर पुढे जग काय म्हणेल याचा विचार न करता

"लागुन कलिकेच्या अंगा
वायु घाली धांगडधिंगा
विसरुनी जगाचे जगपण."

निसर्गातील प्रेमाच्या या लीला पाहून त्या प्रेयसीची आतुरता अधिकच वाढली आहे. निसर्गातील या प्रेमीजीवांच्या जोडप्यांचा प्रणय दाखवून तिने प्रणयभावना उद्दीपित करण्याचा प्रयत्न केला. तरीसुध्दा तिच्या सख्याचे गांभीर्य ढळत नाही. तेंव्हा ती त्याला विनंती करु लागली. त्याचा हात आपल्या हातात घेऊन म्हणू लागली.

"चल ये रे ये रे गड्या ।
नाचु उडू घालू फुगड्या
खेळु झिम्मा झिम् पोरी झिम् पोरी झिम् ।"

व त्याला ती म्हणते अरे हे विश्वाचे एवढे मोठे अंगण आपल्याला आंदण दिलेले आहे. अरे पण ते आपल्या प्रेमाच्या पासंगाला देखिल पुरणार नाही. इतर लोकांप्रमाणे आपले प्रेम कामुक थोडेच आहे. अरे

"जन विषयाचे किडे
त्यांची धाव बाह्याकडे
आपण करू शुध्द रसपान."

जोपर्यंत सखी वैषयिक भावनांमधे रंगत होती, तशाच प्रकारची दृश्य ती चाफ्यासमोर उभी करत होती तो पर्यंत "चाफा" गंभीर होता. नि:स्तब्ध होता, अबोल होता. ज्यावेळेस तिच्या ठिकाणी शुध्द रसपानाची जाणीव निर्माण झाल्यावरच तो फुलला -

"दिठी दीठ जाता मिळुन
गात्रे गेली पांगळुन
अंगी रोमांच आले थरथरून"

आणि मग दोघांनीही देहभान विसरून एकमेकास कडकडून मिठी मारली. या अपूर्व मीलनाचे वर्णन कवीने अपूर्वच केले आहे. -

"चाफा फुली आला फुलुन
तेजी दिशा गेल्या आटुन

कोण मी - चाफा ? कोठे दोघे जण ? "चाफा" आणि सखी हे शुध्द प्रीतीच्या उत्कटतेने अद्वैताच्या सीमेवर पोहचली. या अलौकिक मीलनाच्या उत्सवात या कवितेचा शेवट केला आहे.

यातील सखी ही धीट स्वभावाची आहे. प्रियकर हा संकुचित वृत्तीचा वाटतो. या गीतामधे उत्सुकतेने प्रेयातीनेपुढाकार घेतलेला आहे. प्रियकराच्या मनाची तयारी करण्याची भूमिका तिने उत्कटतेने बजावली आहे. जे फुलायला तयार नाही त्याला फुलायला लावण्याचे कार्य ही प्रेयसी करते त्यामुळे ही कविता इतर प्रेमविषयक कवितापेक्षा वेगळया प्रकारची वाटते आणि उठून दिसते.

"चाफा" या कवितेत सृष्टीवर्णन आहे, नादमाधुर्य आहे की, मोहक चाल आहे याचा गूढार्थ उकलण्याचा अनेकांनी प्रयत्न केला पण त्यांच्यात एकवाक्यता दिसत नाही.

कवी अनील यांनी "सत्यकथा" मे-जून १९६५ मधे आपल्या लेखात "चाफा" या संदर्भातील विधानांचा परामर्श घेऊन म्हटले आहे की, "बी"ना अभिप्रेत असलेला "चाफा" हा "खैर चाफा" असे म्हटले आहे. या चाफ्याच्या झाडाची समग्र माहिती ते देतात. व म्हणतात -

"विदर्भात नैसर्गिकपणे वाढणा-या चाफ्याची पाने मार्गशिर्षापासून गळू लागतात. पुढे पावसाला लागेपर्यंत पान फुल काहीच नसते. चाफा बोलेना, चाफा चालेना, चाफा खंत करी काही केल्या फुलेना" याच अवस्थेचे निदर्शक म्हणून "बी"नी वरील धृपद घेतले आहे. पुढे चाफा एकदम फुलुन येतो ती अवस्था -

"चाफा फुली आला फुलून, तेजी दिशा गेल्या आटुन

या शब्दात दाखविला आहे."[३०]

पुढे अनिल सांगतात -

"वारा सुटतो तेंव्हा बागेतील सर्व फुलझाडे हलताना दिसतात. चाफ्याचे झाड राठ असते. इतर झाडाच्या फांधाच्या मानाने चाफ्याची पानेही राठ असतात. त्यामुळे ते झाड हलताना दिसत नाही. त्याची हालचाल आंतरिक असते. ती लोकांना दिसत नाही. आणि म्हणूनच तो खंतावलेला आहे असे लोकांना वाटते. कालांतराने त्याची काया फुलांनी बहरलेली दिसते. तेंव्हा मात्र त्यांना चाफ्याला आंतरिक हालचाल आहे, याची प्रचीती येते, ही गोष्ट ध्यानात घेऊन "बी"नी चाफा हे प्रतीक निवडले असावेसे वाटते."[३१]

चाफा या कवितेसंबंधी पत्ररूपाने जी माहिती प्रसिध्द केली त्या माहितीच्या आधारे "चाफा" हे प्रेयसीने गायिलेले प्रेमगीत नसून एका

-हृदयाने आत्म्याला आळविलेले गीत आहे असे माधव गोपाळ देशमुख म्हणतात." कवीचे -हृदय काव्य रचना करू इच्छिते पण कवीचा आत्मा मात्र मुखस्तंभ झाला आहे. तो बोलत नाही, चालत नाही, खंत करीत आहे, काही केल्या फुलत नाही. कवि-हृदयाने आत्माविष्कारासाठी आटोकाट प्रयत्न करावा, पण कवीच्या -हृदयाने ज्याचा आविष्कार करावयाचा तो आत्मा मात्र आविष्कृत होत होत नाही ही कवि-हृदयाची कथा काहिशी स्वगत पण आत्मनिवेदनात्मक पध्दतीने धृपदात व्यक्त केली आहे. धृपदाचा असा अर्थ लावून त्यांनी कवी -हृदयाने कवीच्या आत्म्याची केलेली आळवणी ही या गीताची मध्यवर्ती कल्पना असल्याचे सांगीतले आहे."[३२]

"चाफा" या गीतासंबंधी कवी "बीं"चे स्नेही रामदासपंत देशपांडे लिहितात -

"एके दिवशी "बीं" च्या चाफा कवितेबद्दल त्यांच्याशी सहज बोलणे सुरू झाले. कविता उत्कृष्ट आहे वगैरे औपचारिक स्वरूपाचे बोलणे आटोपल्यावर त्यांनी खोडसाळपणाने, मुद्दाम विचारले, "कवितेत दाखविलेली दिव्य प्रीती सत्यसृष्टीत पहावयास मिळते काय ? ती प्रीती कल्पनासृष्टीतच केवळ आढळेल. अशी नाही काय ? यावर "बी" गंभीरतेने पण किंचित भावपूर्ण स्वरात म्हणाले -

"नाही, तसे नाही. माझ्या कवितेतला आशय सत्य सृष्टीत आढळणारा, नित्याच्या अनुभवावर उभारलेला आहे. त्यात सत्याभास, अतिशयोक्ती किंवा कल्पनेच्या भरा-या मुळीच नाहीत. आजकाल शुध्द प्रेमाचा आढळ सहसा होत नाही, म्हणूनच तुम्हाला माझ्या कवितेत सत्याविष्कारण सहजपणे होणार नाही."[३३]

"चाफा" या कवितेसंबंधी "बी" लिहितात - "चाफा ही एक रूपकात्मक कविता आहे. "चाफा" म्हणजे "आत्मा" आणि तरूणी म्हणजे जीव होय. जीव कितीही विलासप्रिय असला आणि व्यापारप्रिय

असला तरी त्याला आपल्या सच्चिदानंद स्वरूपाची ओळख होणारच. हरपलेले आपले श्रेय मिळविण्याकरिता त्याला हुरहूर ही लागणारच. चाफा फुली फुलून आला असलेला "तेजी दिशा आटून जाती", आनंदार्णवात सारे जग बुडाल्याचा प्रत्यय येणे साहजिकच आहे. केशवसुतांनी म्हणाले आहे की "-हृदय आत्म्याला जधी बोलाविते, -हृदय आत्म्याला जधी आळविते" त्याच्याप्रमाणे चाफ्यात -हृदयाने आत्म्याला खेळविले आहे, आत्म्याला आळविले आहे."[३४]

तर आणखी एका ठिकाणी "चाफा" या कवितेसंबंधी "बी" म्हणतात -

"अशा कविता बहुधा सांकेतिक असतात. संकेत कळल्यावर साध्या शब्दांचा वस्तूंचा अंतरात्मा कळतो."[३५] सर्व फुलातला रस चाखणारा भ्रमर चाफ्याला मात्र वर्ज्य समजतो, असा चाफ्याच्या बाबतीत संकेत आहे. त्याचा या ठिकाणी "बीं"नी उपयोग केला आहे."[३६] असे सौ. निर्मला कणेकर सांगतात.

"चाफा" या कवितेत व्यावहारिक प्रेम, नैसर्गिक स्थिती आणि आत्मिक अवस्था या गोष्टी या कवितेतून प्रामुख्याने प्रस्फुटित झालेल्या दिसतात. प्रेमाची लौकिकापासून अलौकिकापर्यंतची रूपे आपणाला या कवितेतून दिसून येतात.

### ३·६ कवी "बीं"ची कथाकाव्य

**कमळा -**

हे काव्य "मनोरंजन" (मे १९१४) मधे प्रसिध्द झाले. कमळा ही कविता " बी " कवींच्या काव्य भांडारातील कोहिनूर आहे."[३७] असे आचार्य अत्रे यांनी म्हटले आहे. कमळा या काव्याने कवी "बीं"ना अमाप यश मिळवून दिले आहे. यातील प्रसंग असा आहे. थोरातांच्या पाक कुळात जन्मास आलेल्या कमळेचा युवराज संभाजीसारख्या शूर दिलदार

पण विषयासक्त पुरुषाकडून कसा विश्वासघात होतो याची करूण कहाणी या काव्यात कवीने अत्यंत स-हृदयतेने आणि कलात्मकतेने वर्णिली आहे. हे काव्य वाचत असताना एक चालता बोलता चित्रपट वाचकांच्या नजरेसमोरून सरकतो आहे असे वाटते.

थोरातांची कन्या कमळा एक बाणेदार मराठी कन्या तिच्या प्रेमवंचनेची ही -हृदयद्रावक कथा इतिहासाच्या पार्श्वभूमीवर तिच्यात चैतन्य ओतले आहे.

या काव्याची सुरवात निसर्गवर्णनाने झाली आहे. सर्वत्र शुभ्र चांदणे पसरलेले आहे अशा रात्रीच्या शांत वातावरणात शिवनेरी गडाच्या गवाक्षाचे दार उघडे आहे आणि तिथे ही कमळा बसलेली आहे तिचे वर्णन कवी "बी" करतात.

"कोमल आहे कोणी श्यामा चिंताकुल बसली
लावण्याची किशोरगंगा वाट काय चुकली १

तर पुढे कमळेच्या सौंदर्याचे वर्णन तर कवीने अतीच सुंदर उतरलेले आहे.

"कृष्णाकेशा मोकळे, स्वेदकण तेजस्वी भाळी,
कर्णभूषणांची बहुवर्णच्छवि गाली पडली."

एका सायंकाळी गावाबाहेर निसर्ग शोभा ती पहात बसली असताना शिकारीच्या वेशात युवराज संभाजी तिथे अकस्मात आला अशा ऐटदार शिकारी संभाजीचे चित्र कवीने तितक्याच ऐटदार शब्दात केले आहे. कवी म्हणतात -

"अबलख बाजी, फेस मुखी, उत्शृंखळ गति त्याची
घामाने वर डबडबलेली मूर्ति स्वाराची
लाल नयन मुख लाल, करी समशेर लाललाल
वेश शिकारी, उन्मादे मन झाले बेताल!"

अशा मनस्थितीत असतानाच कमळेचे लावण्य पाहून संभाजी मोहित झाला व

क्षणार्धात उडी टाकून त्याने तिचा हात धरला व पुढील प्रसंगाचे वर्णन कवी ने अगदी चिडून केले आहे.

"कान्तकपोलप्रान्ता उन्मत्ताने चुंबियले
विशुध्द पुष्करणीचे पाणी विषसंकुल केले,
नवतन्वंगा विळखा पडला त्या अधमांगाचा
चंदनविटपा जसा लपेटा जहरी सर्पाचा."

विवाहाची खोटी आशा दाखवून संभाजीने तिला पळवून नेले आहे. तिलाही तो आवडत नव्हता असे नाही. शिवाजी महाराजांचा पुत्र आपल्या वचनाला जागेल व आपल्याला लागलेला कलंक धुवून काढील या आशेवर ती जगत होती परंतु संभाजीने वचनाला हरताळ फासला व रखेल म्हणून माझ्याजवळ रहा असे तो बोलू लागला.

"थोरातांच्या पाककुळी जी जन्माला आली
राख म्हणुनि घ्यायाचे आज आले तिच्या भाळी."

असले लाजिरवाणे जिवन जगण्यापेक्षा आत्महत्या बरी असा निश्चय ती करते. त्यापूर्वी ती म्हणते -

"मनातले मन बोले की मी आहे निर्दोष,
खोटे सांगत नाही, आई अंबेची साक्ष.
कौमार्याचे झाले असते व्रत माझे भ्रष्ट
त्याच क्षणी प्राणाला केले असते मी नष्ट
परंतु झाले काहूर मजवर ज्या आरोपाचे
शुध्द रक्त प्रोक्षुन मी करिते परिमार्जन त्याचे."

त्याचबरोबर आपण निर्दोष आहोत, आपले कौमार्य भ्रष्ट झालेले नाही याबद्दल तिचे अंतर्मन ग्वाही देते. आत्महत्या करण्यापूर्वी ती आईला म्हणते -

"म्हणोत जन, पण म्हणू नको तू गे माझे आई !
कुलबुडवी कारटी कशाला जन्माला येई"

अशी मनातल्या मनात तिने आईची आळवणी केली व गवाक्षातून खाली असलेल्या दरीत उडी घेतली.

या काव्यातून कवीच्या भव्य कल्पना शक्तीची कल्पना येते. तर डॉ.अ.ना.देशपांडे म्हणतात "ही एकच कविता "बीं"नी लिहली असती तरी मराठी कविमंडळातील त्यांची थोर पदवी सर्वमान्य झाली असती."[३८] तर आचार्य अत्रे म्हणतात -

"ही कविता वाचताना आपण महाबळेश्वराच्या एखाद्या उच्च शिखरावर बसून भोवताली उघड्यावर पडलेल्या सौंदर्याच्या राशीच्या राशी अवलोकीत आहोत असे वाटते."[३९]

कविने या कवितेत ऐतिहासिक वातावरण निर्माण केले आहे व आपल्या पूर्वस्मृतींना उजाळा दिला आहे.

3.७ <u>वात्सल्यगीत</u>

<u>माझी कन्या</u> -

या कवितेतील अनुभव सर्वसामान्य कौटुंबिक माणसाला आपला स्वत:चा वाटावा एवढा सार्वजनिक प्रसंग घेतला आहे. पण प्रसंग जितका साधा आहे तितकाच चटका लावणारा आहे. वात्सल्य आणि कारुण्य याचे ह्रदयस्पर्शी चित्र कविने रेखाटले आहे.

"माझी कन्या" या कवितेत आपल्या लाडक्या मुलीची समजूत घालणाऱ्या दरिद्री बापाची भावना व्यक्त झालेली आहे. ही भावना सार्वजनीक होते आणि त्या कन्येला वाचकांची संपूर्ण सहानुभूती लाभते. नुसती सहानुभूतीच नव्हे तर संतारिकांचे डोळे भरुन आल्याशिवाय रहात नाहीत इतके स्वाभाविक वर्णन कवीने केलेले आहे. कौटुंबिक वातावरणातील वात्सल्यरसात वाचक विरघळून जातो.

"माझी कन्या" या कवितेत एक नक्षत्रासारखी देखणी पण गरीब बापाची मुलगी साध्या सुध्या वेशात शाळेत जाते. विभा-विमला

या आपटे प्रधानांच्या कन्या तिला लंकेची पार्वती, भिकारीण म्हणून चिडवतात म्हणून ती रडते आहे याचे फारच सुंदर चित्र कविने रंगविले आहे. कवी लिहितात -

"गाई पाण्यावर काय म्हणूनि आल्या ?
कां ग गंगा-यमुनाहि या मिळाल्या ?
उभय पितरांच्या चित्त चोरटीला
कोण माझ्या बोलले गोरटीला ?"

पितृ-ह्दयाला ही कल्पना व्यथित करते आहे. अशा मैत्रिणीच्या बोलामुळे ती स्फुंदून स्फुंदून रडते आहे. अशा वेळी निघणा-या उष्ण श्वासानी गालावरचे गुलाब कसे झालेत याचे अगदी हुबेहूब वर्णन कवीने केले आहे. तो विनोद -ह्दयाला भिडणारा वाटतो.

"बी" वर्णन करतात -

"उष्ण वारे वाहती नासिकात,
गुलाबाला सुकविती काश्मिरात !"

यावरून आपल्याला कवीच्या प्रतिभेची आणि शब्द सामर्थ्याची कल्पना येते. पुढे तो पिता आपल्या मुलीची समजूत घालीत आहे. तिच्या हुशारीचे, सौंदर्याचे सद्गुणाचे कौतुक करित आहे. पुढील शब्दात -

"भेट गंगा-यमुनास होय जेथे
सरस्वतिही असणार सहज तेथे,
रूपसद्गुणसंगमी तुझ्या तैसे,
भाग्य निश्चित असणार ते अपेसे,"

असे तिचे कौतुक करून तिला शहाणी म्हणून खुश करू पहातात व म्हणतात शहाण्याने वेडपाचे शब्द मनावर घ्यायचे नसतात. माझ्यासारखा वडील असताना तू भिकारीण कशी ?

"खरे सारे, पण मूळ महामाया
आदिपुरूषाची कामरूप जाया

पहा नवलाई तिच्या आवडीची
सृष्टी-शृंगारे नित्य नटायाची"

असा विचार त्यांच्या मनात येतो आणि ते तीला म्हणतात -

"नारि मायेचे रूप हे प्रसिध्द
सोस लेण्यांचा त्यास जन्मसिध्द

ही तिच्या नटण्या मुरडण्याची हास लक्षात घेऊन ते तिला म्हणतात -

"तुला घेईन पोलके मखमालीचे,
कुडी मोत्यांची, फूल सुवर्णाचे,
हौस बाई। पुरवीन तुझी सारी
परि आवरि हा प्रलय महाभारी."

पण त्याचवेळी आपल्या गरिबीमुळे, असमर्थतेमुळे बापाच्या -हदयाची जी कालवा कालव होते त्याचे अगदी हुबेहुब -हदयाला छेद पाडील असे वर्णन कवीने केले आहे. कवी "बी" म्हणतात -

"प्राण ज्यांच्यावर गुंतले सदाचे,
कोड किंचित पुरविता न ये त्यांचे,
तदा बापाचे -हदय कसे होते,
न ये वदतां, अनुभवी जाणती ते."

श्रीमंताना हेवा वाटेल असे आपल्या मुलीचे रूपगुण आहे ते पाहून अभिमान वाटतो पण

"प्राप्त होता परि हे असे प्रसंग
-हदय होते हदरोनिया दुभंग।

कवी सुरवातीला कन्येचे सात्वंन करत करत आत्मसांत्वनात गुंतला जातो. पणगरीब बापाच्या -हदयाचे स्वरूप न कळत प्रगट करू लागतो. कवीने बापाचे -हदय येथे सुंदर रेखाटले आहे. काव्याच्या या ओळी वाचताना अश्रूनी डोळे ओलावल्याशिवाय रहात नाहीत. तो पिता देवाला आणि दैवालाही बोल लावतो -

"देव देतो सद्गुणी बालकांना
काय म्हणूनी आम्हांस करंट्याना १
लांब त्याच्या गावास जाऊनिया
गूढ घेतो हे त्यास पुसोनिया !"

गावाला जाण्याची भाषा काढल्या बरोबर त्या कन्येचा रूसवा जातो व ती आपल्या वडिलांच्या गळ्यात आपले रेशमासारखे मऊ हात टाकते व "येते मी" असे वदते.

वात्सल्य आणि कारूण्य यांचे ह्रदयस्पर्शी मिलन आहे. कन्येच्या दु:खाला तिच्या गंगायमुनानी वाट करून दिली पण पित्याला मात्र स्वताचे स्वत:च आर्त आत्मसांत्वन करून घ्यावे लागते. कवितेच्या सुरवातीला पिता कन्येचे सांत्वन करू लागतो पण फार लवकर कन्या निमित्त मात्र होते. स्वत:चे जखमी ह्रदयच नकळत बाहेर पडते.

कवीने अगदी साधा प्रसंग घेऊन रसिकांना आकर्षित केले आहे. कारूण्याने ओतप्रोत भरलेली अशी ही कविता आहे. सर्व सामान्य कुटुंबातील व्यथाच या गीतातून कवीने मांडली आहे.

वात्सल्य -

या कवितेत कवीने वात्सल्याचा महिमा गायिला आहे. या कवितेतील स्त्रीचा पती तिला कायमचा अंतरला आहे. पण तिला पुत्रप्राप्ती झाल्यामुळे ते दु:ख ती आनंदाने सहन करते.

"पाहता पुत्रमुख अश्रु तिचे ओघळले,
हिम होऊनि होते ते सृष्टीवर पडले."

हे पुत्र सुख तिला प्राप्त झाले पण त्यासाठी तिला आपला पतीदेव शशी याच्या सुखाला कायमचे मुकावे लागले.

"सहकारी प्रेमाचा तो होता तिजला अंतरला जन्माचा"

तरी ही पुत्रप्राप्तीचा आनंद हा काही वेगळाच असतो. पुत्राच्या बाललीला

पाहून ती पती निधनाचे दु:ख विसरली. कवी वर्णन करतात -

"पाहता प्रभाती बालजगा वर खाली
कृष्णास्मृती संपुनि मातृमुखी ये लाली."

असा मातृत्वाचा आनंद तिला मिळतो आहे. ती त्याच्यावर निस्वार्थपणे वात्सल्याची उधळण करते आहे. "बी" लिहितात -

"सदगदीत -हृदय तद्गात्रांसह थरथरले
नेत्रातुनि अविरत वात्सल्याश्रू गळाले."

शेवटी "बी" लिहितात -

"वात्सल्य दिसे ते बहुविध विश्वविकासी,
ते विश्वात्माचे विमल हास्य अविनाशी
ते स्वार्थ समर्पण धन्य परार्थासाठी
प्रत्यक्ष निर्मिते स्वर्ग धरेच्या काठी."

अशा वात्सल्याच्या महिम्याने काव्य ओतप्रोत भरलेले आहे.

## ३.८ गूढगुंजन/तत्त्वचिंतनपर कविता

केशवसुतांनी आधुनिक मराठी काव्यात गूढगुंजन हा काव्यप्रकार आणला. कवी "बी" हे आधुनिक कवितेचे पुरस्कर्ते होते. त्यामुळे त्यांच्या काव्यात गूढगुंजन हे स्वाभाविक आहे. ध्यानयोगाचा आणि तत्वचिंतनाचा अभ्यास फार वर्षांपासून ते करीत आले होते. या अद्वैत चिंतनातूनच त्यांची "पिंगा" ही कविता जन्माला आली असावी.

### पिंगा -

पिंगा हा मुलींचा खेळ झिम्मा खेळणा-या मुली किंवा पिंगा घालणा-या मुली. पिंगा घालता घालता भरात आला की भान हरपते. भोवतालच्या स्थितीचे भान रहात नाही. अशाच प्रकारची स्थिती आध्यात्मामधे असावी लागते. त्यासाठी लौकिक गोष्टींचा विसर पडला पाहिजे. आपल्याच तालात गुंगून स्वच्छंदाने नाचत रहाण्याइतकी मनाची

स्थिती झाली पाहिजे तेव्हा त्या पारलौकिकाचे दर्शन घडते आणि हेच एकाग्रतेचे चिंतनाचे महत्व कवी "बी" ना या कवितेत सांगायचे आहे. या काव्यातील कल्पनेचा खुलासा स्वत: कवी "बी"नीच केला आहे.

"या कवितेत "अहं" या शुध्द जाणिवेचा आणि कल्पनेच्या अनंत वृत्तीचा खेळ आहे. शुध्द"अहं" स्फुरण ते "मी" आणि विकृत अहंभाव म्हणजे देहभाव किंवा द्वैताचे भान हा पिंगा अशी कल्पना या काव्यात केलेली आहे."४०

कवी "बी"नी म्हटल्याप्रमाणे प्रकृती, अहंकार, मन, वृत्ती आणि देह या सर्वांचा पिंगा सुरू झाला की प्रकृतीने गीत गाण्यास सुरवात केली ते गीत म्हणजे "बी"ची पिंगा ही कविता होय.

पिंगा हा खेळ सुरू झाला आणि आत्मा व वृत्ती यांचे नाचणे सुरू झाले. पिंगा खेळणा-या मुलींप्रमाणेच प्रकृतीचे व वृत्ती एक झाल्या त्याचे वर्णन कवी करतात -

"अनेक नेत्राचे बघणे
अनेक कंठाचे गाणे
अनेक चरणाचे जाणे
अनेक चित्ताचे स्फुरणे
दृष्टी, वाणी, गती, मती
एकच येवून तेथुन ती"

असा सर्वच बाबतीत भेदभाव, नाहीसा झाला आणि अद्वैताचा पिंगा रंगात आला व आत्मा कल्पनेच्या अनंत वृत्तीत विलीन झाला आणि आत्म्याने सर्व विश्वच गिळून टाकले. हा पिंगा घालताना देहाची जाणीव नाहिशी झाल्याने

"दुर्बलपणा पहिले गेले,
क्षुद्रपणातून मी सुटले,
जीर्णबंध सारे तुटले
मी माझी मज सापडले.

"सागरावर लाटा अगर बुडबुडे निर्माण झाले तरी ते सागरापासून भिन्न असतात. सागराचे सागरपण त्यामुळे मोडत नाही. त्यामुळे अनेकत्वाचा भास राहूनही तेथे एकत्व निर्माण झाले".[४१] म्हणजेच स्वयंपणाची शुध्द जाणीव राहून देखिल विश्वाला पावन करून घेणे शक्य आहे हेच या काव्यातून कविने सांगीतले आहे. आपले जग पूर्णत्वापासून ढळलेले आहे त्याची सगळी धडपड पूर्णत्वाकडे जाण्यासाठीच आहे असे "बीं"चे ठाम मत आहे. आपल्या ठिकाणच्या दु:ख, यातना अपूर्णावस्थतून जन्माला आलेल्या आहेत म्हणून "पिंगा" या कवितेत पूर्णावस्थेचे वर्णन करताना "बी" म्हणतात.

म्लानपणाविण लावण्य,
क्षीणपणाविण तारुण्य,
मंगलमांगल्या यतन
नित्यानंद निरावरण,
विश्ववैभवालंकरण,
ते माझे ते स्वयंपण ।

या वर्णनातून पूर्णावस्थेचे दर्शन घडविलेच. ती पूर्णावस्था ही द्वैत आहे. पूर्णावस्था हा एक दिव्य अनुभव आहे. म्हणजेच लौकिकात राहून अलौकिकाची प्राप्ती करून घेता येते हे तत्व कवी "बीं"ना या कवितेत सांगावयाचे आहे.

केशवसुतांच्या "झपूर्झा" या कवितेमधे चिंतन आहेच पण ते जीवनविषयक विचार अधिक आहेत तर "बीं"च्या "पिंगा"मधे आध्यात्मिक विचार अधिक आहे.

मुळात कवी "बी" हे चिंतनशील प्रवृत्तीचे होते. त्यामुळे त्यांच्या या वृत्तीचा परिणाम त्यांच्या काव्यावर पडलेला आपल्याला दिसून येतो. जीवनाच्या अंतिम रहस्याबद्दल ते नेहमी चिंतन करीत. एवढेच नव्हे तर वैचारिक कवी म्हणून त्यांची गणनाही झालेली होती. मूळचा "बीं"चा

पिंड वैचारिक वृत्ती, नेहमी गंभीर आणि अंगी असलेली प्रौढता यामुळे त्यांचे विचार स्वच्छ आणि स्पष्ट असत. त्यांची प्रतिभा चिंतनशील असल्यामुळे तत्व विचाराकडे तिचा स्वाभाविक कल आपोआपच झुकलेला होता. अमूर्ताकडे जाणे व अमूर्तातील सौंदर्य उपभोगण्याचे प्रयत्न करणे नुसता प्रयत्नच नव्हे तर त्यातच गुंगून जाणे हाच त्यांचा मनोधर्म होता. वरवरचे सौंदर्य त्यांना मोह घालू शकत नव्हते. तर ते प्रत्यक्षाच्या अन्तर्यामीचा ठावच घेऊ पहात होते. त्यातूनच त्यांच्या अनेक तत्वसुंदर कवितांचा जन्म झालेला आहे.

कवी "बी" हे कर्मठ नव्हते पण श्रध्दावान होते. त्यांना अध्यात्माची गोडी होती. शिवाय जीवनात ते आशावादी होते.

"आत्मास्वामी तू निभ्रांत शाश्वत तू .."

अशी त्यांची धारणा होती तर

"विश्व हे सारे शुचिमंगलमय मुळचे रे !"

असा त्यांचा अनुभव होता.

अध्यात्म -

या कवितेमध्ये अध्यात्मशास्त्र कशाला म्हणतात. "अध्यात्म" हे खरोखरच शास्त्र आहे काय ? त्याचे प्रयोजन काय ? या प्रश्नाचे मार्मिक विवेचन केलेले दिसून येते. अध्यात्म हे शास्त्र आहे असा एक विचार आणि अध्यात्म हे शास्त्र नसून तो कविकल्पनेचा भ्रम आहे असा दुसरा विचार मांडला आहे. काव्याला त्याची मुळीच जरुरी नाही असे म्हणणाऱ्या विद्वानांना कवी "बी" म्हणतात.

"जे का विचार करिते जड भौतिकाचा
ते मात्र शास्त्र म्हणणे अविचार साचा ।
जे दे अचेतन अणुप्रति चेतनेते
ते नित्य तत्व कळणे निवार्य होते ।"

[illegible] LIBRARY

म्हणजेच आध्यात्म हे जड भौतिकाचा विचार करणारे शास्त्र नाही तसेच ते कवि कल्पनाही नाही तर या अध्यात्माचा संबंध अमूर्त अशा चैतन्य तत्वाशी आहे. जे अचेतनाला चेतनाच देते तेच अध्यात्म असे "बी" म्हणतात.

जडाच्या माध्यमातूनच आपण जडाचा शोध घेतला पाहिजे. अध्यात्मात चेतना आणि जड यांचा विचार केला पाहिजे. अध्यात्मामुळे आपले जीवन शुध्द झाले आहे. अध्यात्मामुळेच भारताला वैभव मिळेल असाही विश्वास त्यांनी व्यक्त केला आहे.

या कवितेत काव्य नसून विचार आहेत यावरुन त्यांची अध्यात्मात गुंतून जाण्याची प्रवृत्ती दिसते. जडातले चैतन्य शोधण्याची वृत्ती दिसून येते.

पूर्ण की अपूर्ण -

ही कवी "बीं"ची कविता "पूर्णोत्स्थापन काल तोच पतनारंभ हा" हा सृष्टीचा नियम कवीने येथे सूचित केला आहे हे सूचित करित असतानाच मानवाच्या अपूर्णतेचा हा निर्देश कवी या कवितेत करतात.

पूर्णत्व प्राप्त झाले की पतनाला प्रारंभ होतो हा सृष्टीचा नियम आहे. या सृष्टीच्या नियमाचे वर्णन कवी काव्यबध्द करतात -

"ये तारुण्य भरास पूर्ण अथवा, प्रेमास ये पूर्णता
हाता ध्येय चढे, फुले विकसली संपूर्ण की वाढता
यांना पूर्णपदाभिषिक्त करितो जो मोहनीय क्षण
-हासारंभही तोच होऊनि घडे त्यांच्या लया कारण".

तारुण्य, प्रेम, फूल या सर्वांना हा कायदा सारखाच लागू पडतो. त्यामुळेच तो पूर्णत्वापर्यंत कधी पोहचू शकत नाही.

म्हणून पूर्णत्वाकडे पोहचण्याची किंवा पूर्णत्वाच्याही पलिकडील गूढ हुडकून काढण्यासाठी त्याची सदैव धडपड चालू असते. जणू काही तो त्याचा स्वभावधर्मच बनून गेला आहे.

"पूर्णाच्याही पलिकडे मन पुढे गुढे पहाया उडे
जीवाचा जणू हाचि धर्म दिसतो जावे पुढे त्यापुढे !"

त्यामुळेच त्याला नव नवीन कला, शास्त्रे सापडतात व त्याच्या साह्याने तो आपला विकास घडवून आणतो म्हणून कवी "बी" म्हणतात सृष्टीरचना अखंड ठेवण्यासाठी या अपूर्णतेचीच गरज आहे. कारण "पूर्णोत्स्थापन काल तोच पतनारंभ" हा परमेश्वराने निर्माण केलेला कायदा त्याचा त्यालाही बंधनकारक ठरले. ज्या क्षणी या कायद्याचे उल्लंघन होईल त्याचक्षणी अगाध सृष्टीरचना संपेल. त्याची जर जागा निश्चित की मरेल असला तो संपूर्ण ईश्वर" अशा प्रकारचा तात्वीक विचार कवी "बीं"नी या कवितेतून मांडला आहे.

भारतीय जीवन -

या कवितेत कवीने एका अपार्थिव शक्तीचा म्हणजे आत्म्याचा उल्लेख केला आहे. चैतन्यतत्व जे आहे त्यामुळेच प्राणी अस्तित्वात येतात व त्यांच्या हातून जी क्रिया घडते त्याला कर्म म्हणतात.

"क्रियाशक्तीस्वरूपाने अनेकविध जो घडे
व्यवहार तयालागी "कर्म" ही अभिधा घडे"

संपूर्ण विश्वाच्या मुळाशी चैतन्य हेच एक तत्व आहे. या तत्त्वाला

"सर्वव्यापक तत्त्व या नावे बहुत ठेविती
"जगज्जोति" "अंतरात्मा", "जगज्जीवन" बोलती"

अशी अनेक नावे आहेत. आणि हे तत्त्व हेच भारताचे वैभव आहे. सर्वव्यापक अशा ह्या चैतन्य तत्त्वातूनच थोर विभूती निर्माण होतात. त्यांच्या ज्ञानाच्या अपूर्व तेजाच्या द्वारे मानवी जीवनाचा विकास घडून येत असतो.

महाराष्ट्र हा भारताचाच भाग आहे. त्यामुळे महाराष्ट्रीयांचे आणि भारतीयांचे तत्त्वज्ञान भिन्न नाही. हेच कवीला सांगायचे आहे.

अखंड कर्मयोगाचे आचरण केले तरच देशाचा उध्दार होईल.

भिन्न परिस्थितीत भिन्न जीवनतत्त्वांचे अवलंबन करावे लागते. म्हणून कवी म्हणतात -

"व्यावहारिक तत्त्वे ती सापेक्ष असती सदा,
भिन्नावस्थेत कामाला तेच ते ये न सर्वदा."

स्वतः काहीही न करता इतरांनी केलेल्या कृत्याला नावे ठेवणारांना "बी" म्हणतात.

"देशकार्या तत्पराते निंदिती उत्तरोत्तर
कृतीच्या शून्य नावाने शब्दगुंड घरोघर!"

अखंड कर्मयोगाचे आचरण म्हणजेच देशाचा उध्दार होय. म्हणून नेहमी सुखस्वप्ने रचून ती सत्य सृष्टीत येण्याची वाट पहाण्यापेक्षा कार्याला आरंभ करणे हेच श्रेयस्कर आहे. म्हणून त्यांच्या कर्तव्याची जाणीव त्यांना करून देतात व म्हणतात -

"जाणत्याने सदा व्हावे यत्नसाहसतत्पर
सिध्दिदाता होत आला सत्यसंकल्प ईश्वर!"

अखंड कर्मवाद हाच स्वातंत्र्य देईल म्हणून कर्मवादाचे महत्त्व या कवितेत कवीने गायिले आहे.

## ३.९ निसर्गकविता -

निसर्ग कवितेचे नाव उच्चारल्याबरोबर ओठावर नाव येते बालकवीचे. बालकवी म्हणजे निसर्गकवी. हे समीकरणच झाले आहे. इतके निसर्गाचे आणि बालकवीचे नाते अभिन्न आहे. त्यांनी निसर्गाचा मनमुराद आनंद घेतला आहे.

निसर्गालाही स्वतंत्र अस्तित्व आहे, चेतनात्म आहे. ही जाणिव केशवसुतांपासून मराठी कवितेत रुजली आणि फोफावत गेली. ती इतकी फोफावली की, बालकवींसारख्या एखादा कवी निसर्गकवीच होऊन बसला.

कवी "बीं"नी निसर्ग कविता लिहल्या पण बालकवी प्रमाणे निसर्गात त्यांनी स्वत:ला झोकून दिले नाही किंवा एखाद्या निसर्गदृश्याने झपाटून जाऊन "बीं"नी काव्य केलेले दिसत नाही. "बीं"ची वेगळी काढून दाखविता येईल अशी स्वतंत्र निसर्ग कविता नाही.

कवी "बीं"च्या कवितेत निसर्गवर्णन आहे. निसर्गातील दृश्ये आहेत. ती दृश्ये पाहून त्यांना काव्य स्फुरतेही पण त्या निसर्गाचे, दृश्याचे वर्णन करण्यात ते पूर्णपणे रमून जात नाहीत. निसर्गातील सौंदर्यात प्रतिभा फुलत असतानाच त्यांच्यातील तत्वज्ञवृत्ती जागी होते आणि "बी" कवींच्या प्रकृतीचेच प्रतिबिंब निसर्गापेक्षा जास्त पडलेले दिसते. आणि त्यांच्या काव्यात आपोआपच एखादा विचार प्रकट होतो. बालकवी हे निसर्गाकडे भावनेने पहातात तर "बी" कवी हे विचाराने पहातात. कवी "बीं"च्या काव्यसंग्रहात गाविलगड, आठवण या दोन कविता निसर्गवर्णनपर आहेत. गिरिगान, वात्सल्य, एक दृश्य, एक संवाद या काव्यातील ओघ निसर्ग वर्णनपर आहेत.

गाविलगड -
-------

ही कविता अपूर्ण आहे. "गाविलगड हे खंडकाव्य त्यांनी लिहण्यास घेतले होते. आठशे ओळीत काव्यबध्द करण्याचा त्यांचा मानस होता. तथापि प्रकृतीस्वास्थ्य अभावी ते पूर्ण झाले नाही. त्याचा प्रास्ताविक भाग त्यांनी लिहला त्यावेळी त्यांच्या अंगात ताप होताच. ते अपूर्ण काव्य घाईने प्रकाशित करण्याची त्यांची इच्छा नव्हती तथापि "प्रतिभेचे संपादक हरिभाऊ मोटे यांनी "प्रतिभा" पाक्षिकासाठी कविता द्या, असा अतिशय आग्रह धरला व "बी" जवळ दुसरी कविता लिहलेली नसल्यामुळे त्यांनी श्री. मोटे यांना लिहून झालेला "गाविलगड" काव्याचा प्रास्ताविक भाग प्रसिध्दीसाठी दिला."[४१]

"गाविलगड" या कवितेत कवी "बीं"नी एके काळी वैभवात नांदणा-या पण आजच्या स्थितीत उजाड झालेल्या "गाविलगड"चे वर्णन कवीने केले आहे.

कवितेच्या पूर्वार्धात कविने काही विचार मांडले आहेत. जीवनाप्रमाणेच निसर्गातही वैभवप्राप्ती आणि उतारकळा असतात. निसर्गातील पहिला अनुभव हा शुध्दस्वरूप असतो. नंतर आपण अनुकरण करतो, पण

"द्वितीय पुरुष न जाणिव येथे प्रथमाचा थाट
जिवाचा तो पहिला पाठ
द्वितीयतेची जाणिव मुकुरित होता ते ज्ञान
सृष्टीचे पहिले बलिदान."

संस्कृतीचे महत्व कवीने अतिशय सुंदर शब्दात मांडले -

"ज्ञान सरुनि संस्कार उरे ते तेवढेच तूझे
बाकी भारभूत ओझे."

सर्वसमावेशक संस्कृती हीच इष्ट आहे असे विचार पूर्वाधात मांडले आहेत.

उत्तरार्धात सुंदर अशा "गाविलगड" चे वर्णन कवीने केले आहे.

"क्षितीजाच्या कंकणी ललित लघु तारा जणु विमल
वेलिच्या पालवीत फूल
तसे गाव एक हे नदीच्या वाकणात राहे
पाणी बारामास वाहे."

असे गाविलगडचे सुंदर दर्शन कवी घडवितात. ही बारामहिने वाहणारी नदी गावच्या लोकांना नवजीवन देते. त्यामुळे तिथे नेहमी उल्हास नांदत असल्यासारखा वाटे. टेकडीवर सतीचे रम्य असे स्थान आहे. हे स्थान म्हणजे "गाविलगड"चे अपूर्व असे वैभव आहे. आणि समोरच "गाविलगड" तपस्याप्रमाणे उभा आहे त्याचे वर्णन कवी करतात -

"खडा असे सन्मुख "गाविलगड" साहत तप करिता
आतप-हिम-वर्षा-वाता
दिसे अस्थिपंजर केवळ तो उरे प्राण कंठी
आर्त गतवैभवार्थ पोटी."

असा हा गाविलगड उन्हा, पावसात उभा आहे. गतवैभवाच्या आर्त आठवणी त्याने आपल्या पोटात साठवल्या आहेत. अशा या "गाविलगडाची कथा कवी "बी"नी वर्णन केली आहे.

आठवण -
------

निसर्गातील "बी"नी पाहिलेल्या एका दृश्याची आठवण या कविने सांगितली आहे. या कवितेत दुपारच्या रुक्ष भयाण आणि सायंकाळच्या रमणीय शोभेचे केलेले हे वर्णन आहे.

कवितेच्या सुरवातीला दुपारच्या रुक्ष अशा वातावरणाचे वर्णन केले आहे.

> "ऊन उतरत होते, वारा पडला होता बंदी
> दिशा दिशांच्या नेत्री भरली होती मादक धुंदी."

अशा वातावरणामुळे चालण्यासही उत्साह नव्हता. जिकडे पाय नेतील तिकडे शरीर जात होते. "मूर्तिमंत रुक्षता वावरे अफाट त्या मैदानी
उडता जीवन न दिसला एकहि ध्वनि नच पडला कानी"

अशा या निसर्गाच्या रुक्षतेमुळे मनातही रुक्षता बसली होती असे कवी म्हणतात.

पण थोड्याच वेळात संध्याकाळ झाली आणि ही दुपारची रुक्षता संपून जिकडे तिकडे चैतन्य दिसू लागले. या चैतन्याचे वर्णन कवी "बी" करतात -

> "काळी तरुराजी क्षितिजावर दिसली त्या अवकाळी
> हरिणीच्या नेत्रांतिल जणुं का काजळरेषा काळी।
> उडती दुनिया दिसू लागली रानी गजबज झाली
> स्वर्णरसाने सारवलेली शोते पिवळी पिवळी."

आणि निसर्गाच्या या चैतन्याबरोबर मनातही चैतन्य निर्माण झाले आणि पक्षांप्रमाणे मन आनंदाने विहार करु लागले. तोच स्त्रीचे नृत्यगतिशील असे ध्वनी कानावर आले. तोच चांदणे बहाराला येते. जणू काही असे वाटते की,

"रूपराशि उर्वशी वाटले स्वर्गातिल सुकुमारा

भरुनि हाती शुध्द चांदणे करीत होती मारा."

येथे आपणाला कवीच्या उत्तुंग कल्पनाशक्तीचा प्रत्यय येतो. अशा प्रकारे "आठवण" या कवितेत कवीने निसर्ग ज्याप्रमाणे असेल त्याप्रमाणे मानवी मन स्तब्ध होते किंवा उड्या मारते याचे वर्णन केले आहे.

<u>एक दृश्य -</u>

विदर्भातील बुलढाणे या गावचे वर्णन करणारी ही कविता आहे. बुलढाणा या गावाला वनलक्ष्मीच्या शृंगाराचे अमोलिक लेणे लाभलेले आहे. एका सायंकाळी कवी नित्याच्या व्यावसायाला कंटाळून हे दृश्य पहाण्यासाठी जातात आणि त्या पाहिलेल्या सृष्टीशोभेचे वर्णन "एक दृश्य" या कवितेत केले आहे. अतिशय सुंदर कल्पना करून त्या दृश्याचे वर्णन कवी करतात -

"त्या रमणीय स्थळी पातलो, जाऊनि वरती बसलो

सृष्टीचे ते दृश्य पाहता विसरून मज मी गेलो।

सूर्यबिंब सारखे धावते अस्तगिरीच्या संगा

निजैश्वर्यरंगे अभिषेकी ज्योतिर्मय महिलिंगा।"

जणू काही पृथ्वीच्या शिवलिंगावर सूर्य अभिषेक करित आहे. अशी रमणीय स्थळाप्रमाणे रमणीय कल्पना कवीने केली आहे. आकाशसुध्दा सूर्या बरोबर रंग पालटते आहे असे दिसते. अशा या सृष्टीसौंदर्याचा आस्वाद घेत असतानाच त्यांना एक पक्षी दिसतो त्या पक्षाची सूर्यबिंब न्याहळण्याची जी एकाग्रता आहे त्या एकाग्रतेचे वर्णन कवी म्हणतात -

"तन्मयता ती चिंत्य वस्तुच्या खोल अंतरी शिरते,

बहिरंगाच्या वरते नुसते फेरे घालीत बसते।"

या पक्षाचा खोल ठसा कविमनावर उठला आहे. म्हणजेच तन्मयता हा महत्वाचा घटक कविला येथे सुचवायचा आहे.

गिरिगान -

ही कविता निसर्गवर्णन असली तरी त्यातही कवीची वैचारिक दृष्टी दिसून येते.

कवी म्हणतात निसर्गात उदात्तता स्फुरते, अंतकरण विशाल होते.

"ब्रम्हाडे घालुनि फेरी वायूच्या येती लहरी
लपेटती त्या रणात्करा कणाखर शैलाच्या शिखरा.

अशा वायूच्या लहरी हळूवार स्पर्श करतात. तर उग्र भीषणताही निसर्गातच जाणवते. त्याचे वर्णन "बी" करतात -

"नेत्रास न अग्रे दिसती आढ्यद्रुम जेथे असती,
गवताचे छोटे पाते उत्साहे तेथे डुलते.
प्रचंड खगपंक्ती जेथे आकाशा फोडित जाते
पतंग तेथ नि:शंक फडकावी चिमणे पंख."

म्हणून कवी म्हणतात निसर्ग सानिध्यात अगदी सूक्ष्म कणापासून ते विशालते पर्यंत जीवनाची सखोल जाणीव होते असे निसर्गाचे वर्णन करता करताच शेवटी अजिंक्य आर्यावर्ताच्या पराक्रमाचे गोडवे गाऊन म्हणतात -

"उष:काल तो आर्यांचा जनिता परमाश्चर्याचा,
महोदार नव-घटनेचा मानववंशविकासाचा,
भाग्याची उषा पुन: जरी प्राप्त व्हावी आपणा
जला जाऊ या गिरिगहनी महा सिध्दिमूलस्थानी,

असा मानवंशविकासाचा आशावादही व्यक्त करताना दिसतात

"बी" हे निसर्गाकडे विचाराने पहातात. म्हणून त्यांच्या निसर्ग काव्यातही कविमनाच्या वैचारिक पिंडाचे प्रकटीकरण होताना दिसते.

एक संवाद -

सौंदर्य हे क्षणभंगूर असते. तरी त्या सौंदर्यामुळे मिळणारा आनंद मात्र हा अविनाशी असतो. हाच विचार "एक संवाद" या कवितेतून

मांडला आहे व त्या सृष्टीसौंदर्याचे वर्णन करताना "बी" म्हणतात:

"बालतृणावर वेलबुटीची शाल महीची करी
विरते निमिषाच्या निदाघी खरी ।
नाजुक फुल जाईचे भारी वासे भुवना भरी
एका श्वासे सुकते परी ।"

असे सृष्टीसौंदर्याच्या क्षणभंगुरत्वाचे वर्णन त्यांनी गायिले आहे. तर पुढे सौंदर्याचा महिमा गाऊन म्हणतात -

सख्या सोडिसी मला असे का ? सात चांदण्याविना
निराशेची काही कर कल्पना
बालासम हे स्वैर नाचरे ओढे नसते तरी
होती रुक्ष मती मग पुरी ।

असा सौंदर्याचा महिमा गातात व यापासून मिळणारा आनंद हा अवीट असतो असे सांगून शेवटी म्हणतात

"क्षणभर अमुचे जीवित म्हणाशी, असोचि ते क्षणभरी
चमकुनि जाऊ "कोठे तरी"

अशी त्यांची चार पाचच निसर्ग काव्ये असली तरी त्यांच्या इतर काही कवितातही निसर्ग वर्णने आलेली आहेत.

3·10 भाषांतरित कविता -

कवी "बी"चा व्यासंग दांडगा होता. इंग्रजी, मराठी, संस्कृत या तिन्ही भाषेतील ग्रंथांची वाचने त्यांनी केली होती. त्यांचा संतसाहित्यावर विशेष भर होता. संस्कृत, मराठी इतकेच समान प्रभुत्व इंग्रजी भाषेवर त्यांनी मिळविले होते. त्यामुळे त्यांच्या भाषांतरित कविता अगदी हुबेहुब उतरल्या आहेत. प्रा.भ.श्री.पंडित म्हणतात - "त्यांनी इंग्रजी कवितांची मोजकी चार भाषांतरे केली आहेत. ती इतकी तंतोतंत साधली आहेत की, मूळ उघडण्याचे कारणच पडत नाही."[४२]

प्रणयप्रयाण -

ही शेलेची प्रेमकविता आहे हे शेलेच्या "फ्लाईट ऑफ लव्ह" या प्रसिध्द गीताचे रूपांतर आहे. सौ. निर्मला कणेकर सांगतात - "मूळचे हे गीत ३२ ओळींचे आहे. तथापी "बीं"चे प्रणयप्रयाण मात्र अवघ्या पंचवीस ओळीत गीतबध्द झाले आहे."[४३] शेलेच्या When the lamp is Shattered' या गीताला "बीं"नी "प्रणयप्रयाण" असे अर्थपूर्ण शिर्षक देऊन आपली मार्मिकता व रसिकता व्यक्त केली आहे.

When the lamp is shattered

The light in the dust lies dead.

या शेलेच्या ओळींचे कवी "बीं"नी केलेले भाषांतर सौंदर्यासह अवतीर्ण झाले आहे.

"भंगता दिप तेजाची मृत्तिकेत कलिका दिसते. ।

मुळातील भावसौंदर्य कवीने यत्किंचीतही ढळू दिले नाही.

"तुज विकार आता -हदया । आंदोलन देतिल खासे,

शैलाग्रकोटरी गृध्रा हालवी प्रभंजन जैसे । "

असा सुंदर मराठी साज चढविताना "बीं"चे कौशल्य आणि शब्दसामर्थ्य नजरेत भरल्याशिवाय रहात नाही. शेलेच्या काव्यातील विचारांची विकारांची बारीक छटासुध्दा कवीने वगळलेली दिसत नाही.

तू देशी न तुझे -

सर जॉन सकलिंगच्या "I prithee and me back my heart"

या कवितेचे हे भाषांतर आहे. ही प्रेमकवीता आहे. हे भाषांतर अगदी सुरेख उतरले असून मूळच्या भाव सौंदर्याला यत्किंचितही धक्का लागू दिलेला नाही.

"I prithee and me back my heart
Since I cannot have time."

या ओळीचे भाषांतर मात्र अगदी हुबेहुब उतरले आहे. "बी" म्हणतात -

"तू देशी न तुझे कशास मग मी द्यावे तुला आपले
दे माझे परतोनि चित्त मज जे ठायी तुझ्या गुंतले."

तर पुढील ओळीतून नायकाच्या -हृदयातील भाव अत्यंत हळूवारपणे प्रकट केले आहेत.

"छे ! ते ठेव तसेच नाहक नको ते शीण कां की हटे
माझे चोरूनी चित्त नेतिल पुन्हा डोळे तुझे चोरटे."

अशी नायकाची झालेली द्विधा अवस्था याचे चित्रण कवीने केलेले आहे. तर प्रीतीचे स्वरूप किती बिकट आहे ते एक ठाम असे मत करू देत नाही याचे वर्णनही कवी करतात. -

"वाटे प्रीति मला महा बिकट ही कूट स्वरूपे असे.
निर्धार मनास एकही धरू दे ना करावे कसे."

मनाच्या द्विधावस्थेचे चित्रण तर केलेच आहे, पण प्रेमाच्या वातावरणातील शंका कुशंकाचे केलेल्या वर्णनाला तर तोडच नाही. "बी" लिहितात -

"नाना व्यर्थ करूनि तर्क तुमच्या संगे झुरावे कुणी ?"

मूळ कवितेतील कल्पना व विचार यांच्याशी तारतम्य पावल्याने त्यातील बारीक सारीक छटाही कवीने वर्णिल्या आहेत.

<u>मनोहारिणी</u> -

लॉर्ड बायरनची मिसेस विलमॉर नावाची बहीण असंख्य टिकल्यांचा कृष्णावेश परिधान करून ती बॉलकरिता नटून थटून आली होती. त्या प्रसंगाला अनुसरून बायरनने "She walks in beauty" ही कविता रचली. त्याचे भाषांतर कवीने अगदी हुबेहुब उतरले आहे.

"She walks in beauty" या चरणाचे

"पदव्यास लावण्यप्रान्ती ही करिते रमणी"

हे कवीने मराठीत केलेले भाषांतर अगदी यथार्थ आहे.

"उषा किरण, की अधिक झाक, जर या रुपी पडती
अनिर्वाच्या ती संगमशोभा अर्धी तरि जाती।"

या ओळीत तर इंग्रजी पणाची शंकाही येत नाही. इतक्या बेमालूम रीतीने वर्णिल्या आहेत. तर सुखोपभोगाच्या खाजगी उल्लेखाला "बी"नी वेगळे स्वरुप देऊन चातुर्य प्रकट केले आहे. ते लिहितात -

"मूकचि त्यांच्या वक्तृत्वाने हिजविषयी पटते
साक्ष मनोमय पवित्र चारित्र्याची -हृदयाते.
निर्वैद भूतमात्राच्या ठायी हिची चित्तवृत्ति
निव्यार्ज प्रेमळभावाची ही रमणी मूर्ति."

कवीने संपूर्ण कवितेचे भाषांतर अर्थाची यत्किंचितही हानी न करता केलेले आहे. यावरुन त्यांच्या गाढ्या अभ्यासाची, व्यासंगाची त्यांच्या बुध्दिमत्तेची साक्ष आपल्याला पटते. अगदी यथार्थ आणि समर्पक अशी शब्दयोजना त्यांनी केली आहे.

बंडवाला -

सर वॉल्टर स्कॉटच्या 'The Out-Law' या प्रसिध्द गीताचे भाषांतर आहे. 'The Out Law' या मुळ कवितेतील नायकाला शूर मराठा वीर बनविले आहे. आणि त्याच्या पराक्रमावर अनुरक्त असलेल्या प्रेमळ नायिकेला एक मराठा युवती बनविले आहे. या युवतीचे मन तरुणाकडे आकर्षित झाले आहे. त्याच्या पराक्रमावर ती अनुरक्त झाली आहे. तो शूरवीर तिला सांगतो आहे की, मी राजाची शिपाई नसून गुन्हेगार आहे. पण तरीही ती ऐकत नाही उलट ती आपली इच्छा गौरीहराची पूजा करण्याची आहे असे सांगते. कवीने या कवितेत ऐतिहासिक वातावरण निर्माण केले आहे. या मूळ कवितेतील इंग्रजी मागमूसही राहू दिला नाही.

"वारू पंचकल्याणी अबलख, करी "पिंगा" त्या खुणा
दाविति उघड करूनि अपणा
अंगी ऐट, चमकती हत्यारे, रक्त करी रंव रंव
मेरिचे झडता भैरव रव
नित्य असे पहाते, वाटते शिलेदार फाकडे
असावे खास हुजुरचे गडे
फुले मरुनि ओचले गुंफुनी स्वकरे त्यांचे मर
पुजावा वाटे गौरीहर"

कवी "बीं"नी या गीतात लावणी पोवाड्यातले शब्द वापरल्यामुळे तिचे ऐतिहासिकपणा खुललेले दिसते. प्र.म.श्री.पंडित म्हणतात "बी कवी हे केवळ कलाकवी होते, त्यांचे काव्यजीवनातून उत्स्फूर्त झालेले नव्हते असा युक्तिवाद करणे म्हणजे जीवन व कला यांची सापेक्षता कळली नसल्याची कबूली देणे आहे. वास्तविक कला ही जीवनाला एक अंश आहे. कलेचा अंश नसेल तर निव्वळ जीवन रटाळ, बेचव व नीरस होईल".[४४] कवी "बीं"चा हा भाषांतराचा छंद पाहून भ.श्री.पंडितांचे म्हणने यथार्थ वाटते.

तर आचार्य अत्रे म्हणतात - "कवी "बी" मुळातील कवितेमधल्या कल्पनेशी व विचारांशी ते इतके समरस व तल्लीन होतात की, त्यामुळे त्यातील अत्यंत ओझरत्या छटादेखील त्यांना सुलभ व प्रासादिक वाणीत व्यक्त करता येतात. त्यामुळे त्यांची कविता भाषांतरित आहे असे न वाटता देखील मूळचे ध्वनिसंगीत कायम राहते. परकीय काव्याचे भाषांतर करण्यास देखिल जी एक विशिष्ट प्रकारची प्रतिभा लागते ती Bee कवींच्या जवळ असल्याने मराठी कवितेच्या न्याय कोर्टात कधी काळी जर एखाद्या "पौरस्त्य भाषांतरकारा"ची जरूरी लागली तर त्या जागेला कवी इतका लायक अधिकारी दुसरा सापडणार नाही."[४५] कवी "बीं"नी ही भाषांतरे करताना मूळ कवितेतील अर्थ, भावसौंदर्य याची हानी होऊ दिलेली नाही. सर्वच भाषांतरे करताना शब्द इतके अचूक आणि

समर्पक वापरले आहेतच त्याचबरोबर नादमाधुर्य टिकविण्यासाठी लागणारा शब्दसंग्रह "बीं"जवळ आहे ही गोष्ट मात्र अतिशय उल्लेखनिय आहे. त्यामुळे त्यांच्या भाषांतरित कविता म्हणजे "बीं"ची स्वतंत्र रचना आहे असे वाटू लागते. समजा कवी "बीं"नी कवितेच्या सुरवातीला इंग्रजी कवितेच्या ओळी इंग्रजी कवितेचे शिर्षक किंवा इंग्रजी कविचे नाव दिलेले नसते तर हे भाषांतरित काव्य आहे असा विचारसुध्दा मनात आला नसता. इतके ते भाषांतराशी एकरूप झाले होते.

## 3.११ स्फुट कविता

### नावात काय आहे ? -

कवीने "बी" (मधुमक्षिका) हे टोपण नाव धारण केले त्यामागे थोडासा इतिहास आहे. सौ. निर्मला कणेकर सांगतात की, "बीं"नी त्यांचे आवडते टीकाकार श्री.वा.ना.देशपांडे यांना ७-८-२८ च्या पत्रात आपल्या त्या टोपण नावासंबंधी खुलासा केला आहे. तो असा - " Bee ह्या नावाची आवड वा निवड माझी नाही. यवतमाळास विठ्ठल भगिरथ दीक्षित सर्व्हे खात्यात होते. त्यांचा मुलगा शंकर व मी एकत्र वाढलो व शेवटपर्यंत एकत्र राहिलो. माझ्या "वेडगाणे" यावर त्यांनीच Bee हे नाव घातले. आणि कोणत्याही नावाशी माझे वाकडे नसल्यामुळे मी ते तसेच पुढे चालू ठेवले."[४६]

"बीं"नी "वेडगाणे या कवितेने रसिकांची अंत:करणे जिंकली त्यानंतर एकमागून एक अशा सुरेख कविता "मनोरंजना"तून येऊ लागल्या. तेव्हा "बी" ह्या नावाने काव्यलेखन करणारा हा कवी कोण असावा याबद्दल रसिकांच्या मनात कुतुहल निर्माण झाले. त्यांचे नाव जाणून घेण्यासाठी रसिक अगदी उत्सुक झाले. "तुमचे खरे नाव काय ते सांगा" असे कोणी रसिकाने विचारले असावे तेव्हा "नावात काय आहे ?" ही कविता "बीं"नी लिहली असावी.

"का आग्रह ? रसिका ! नाव सांगा मज म्हणासी,
नावात मोहनी भासो सामान्यासी !
घननीलमणिप्रासादचंद्रशालांत,
ते असंख्य सुंदर तरे चमचमतात."

आकाशात असंख्य तारे चमचमतात. असंख्य नक्षत्रे मनाला मोहिनी घालतात किंवा रानात जाणा-या लोकांना

"तरुलता प्रसूनान्विता राहती रानी,
संपूर्ण भारिती वनश्रेणी गंधांनी,
ह्या प्रमदवनांतरि शिरले - जे जन,
तरुलताचि अंगे झाले - आपण,
निज नामरुपही गेले विसरून."

तरीही आपण त्या नक्षत्रांची किंवा फुलांची नावे विचारायला जात नाही. काव्य रसास्वादात जर रसिक रंगला तर त्याला काव्याचा जनक कोण विचारण्याची शुध्द राहत नाही इतका तो त्यात गुंगुन जातो. नावाची मोहिनी ही सामान्य माणसाच्या मनावर असते. मग तुम्ही मला नाव सांगा असा आग्रह का धरता.

या कवितेत रसिकांची जिज्ञासातृप्ती झाली नसेल पण "नावात काय आहे ? या कवितेची भर पाडण्यात रसिकच कारणीभूत झाले हे निश्चित.

"बी"ची स्वत: विषयी अशीही एकच कविता आहे. त्यांची प्रसिध्दीपराङ्मुख वृत्ती या कवितेवरुन कळून येते.

<u>चांदणी</u> -

ही लावणीसदृश कवीता आहे. "चांदणी"च्या सौंदर्यदर्शनाने निसर्ग किती मोहित झाला होता. तिचे सौंदर्य पाहून जनलोकही बहकून गेले होते. याचे सौंदर्याचे वर्णन कवीने अतिशय रम्य केले आहे.

"तिचे ते उदित तेज पिउनी । जनवन गेले बहकोनी
प्रौढपणा निज निपट त्यजुनी । बनली पोरच जणु धरणी ।
गिरी गंभीरपणा त्यजुनी । पाहतो शिर वरवर करुनी
नेत्रपुट तृणा झटपट मिटुनी । खिळले वुळबुळ विसरोनी."

अशा या "चांदणी" सौंदर्य पाहून तिच्याकडेच सर्वजण आकृष्ट होतात. जणू काही ती स्वर्गातील अप्सराच वाटते. कवीने तिचे चित्र फारच सुंदर काढले आहे.

कुठे तो स्वर्ग कुठे ती धरणी ।
चांदणी त्यांची नच कोणी १
मग ही –हृदयंगम करणी
काय ये "निष्कारणा" घडुनी १

"चांदणी"चे हे सौंदर्य पाहून रसिक विद्वान सामान्यजन हे विरघळतात. या सौंदर्याशी एकरूप व्हावे असेच कवीला वाटते. कारण सौदर्यस्वाद घेणे हेच संस्कृतीचे गमक आहे आणि सर्वांना आकृष्ट करून घेणे हीच सौंदर्याची शक्ती आहे. कवी लिहतात –

"चमक गे तारे तू गगनी आपुल्या शीतल किरणांनी
शान्त सम शुध्द तुझे तेज, रूक्ष जीवन रंगवी सहज

तुझ्या या सौंदर्याने रूक्ष जीवन सुध्दा रंगून जाईल. इतकी शक्ती या सौंदर्यात आहे. "प्रौढत्वी निजशैशवास जपणे" हा "कवीचा बाणा" आहे असे केशवसुत सांगतात तर "बी" "चांदणी" जवळ

"प्रौढपणा मज निज विसरु दे, दिव्य तव तेजी मिसळू दे.
शुध्द अद्भुतरस उसळू दे, जगज्जीवन जगि कवळू दे."

असे आपले मनोगत बोलून दाखवितात.

<u>नागेश</u> –

केशवसुतांना निर्यमक कविता लिहून निर्यमक कवितेचा पाठ आधुनिक

मराठी कवितेला दिला. त्यांच्या निर्यमक कवितेला काव्यात रुढ करण्याचे कार्य "रेंदाळकर", "नागेश" या कवींनी चालू ठेवले. पण टीकाकारांनी मात्र या कवींवर टीकेची झोड उठविली. "नागेश" कवीचे अंत:करण या टीकेचे प्रहार झेलण्यास असमर्थ होते. त्यांनी "माझी कविता" लिहून आपली काव्यशक्ती निर्जीव करण्याचे प्रयत्न या टीकाकाराकडून होत आहेत असे आपले गा-हाणे विषण्ण अंतकरणाने रसिकांपुढे मांडले. या कवितेला उत्तर म्हणून "बीं"नी "नागेश" ही कविता लिहली.

या कवितेत नागेश कवीचा गौरव करुन त्यांचे मन प्रसन्न करण्याचा प्रयत्न बी करत आहेत. ते लिहितात -

"का होतोस विषण्ण काव्यविटपाग्रारुढ हे कोकिळा ?
लागावा तुज वामने वद कसा पाषाण जो फेकिला ?

असा त्यांचा गौरव करतात व टीकाकारांची चांगलीच हजेरी घेतात. शेवटी म्हणतात -

"टीकाकारमतानुसार रचना जात करु सत्वर
रम्योद्यान उजाड रान अवघे होईल शंका नको ।
व्हावा नष्ट "विशेष" इष्ट न मुळी वैचित्र्य यांच्यामुळे
त्यांना काय रुचे मला न बहुधा त्यांचे न त्यांना कळे."

टीकाकारांच्या मताप्रमाणे जर काव्य केले तर रम्य उद्यान सुध्दा रान होईल. टीकाकारांना काय आवडते हे त्यांचे त्यांनाही कळत नाही. त्यांची अशी दयनीय अवस्था पाहून ते टीकाकारांची कीव करतात व नागेश सारख्या कवीचे "मदीयांतरी आहे ती रुचिरा निसर्गधुरा नागेश वागेश्वरी" असे त्यांच्या भाषेचे कौतुक करतात. यावरुन दुस-यांना प्रोत्साहन देण्याची "बीं"ची वृत्ती दिसून येते.

3.12 "बीं"ची उपेक्षा झाली १ -

आधुनिक कविमंडळात कवी "बी"चा पाहिजे तेवढा गौरव व सन्मान झाला नाही. त्यांची कविता सकस असून बहुमोल आहे. पण तिचे मुल्यांकन ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्या प्रमाणात त्यावेळी झाले नाही आणि अजूनही त्यांच्या काव्याकडे समिक्षकाचे जेवढे लक्ष जायला पाहिजे तेवढे गेलेले नाही. आमचे समीक्षक सुध्दा एखाद्याकडे लक्ष गेले की त्यालाच डोक्यावर घेऊन नाचतात व इतरांकडे दुर्लक्ष करतात. भारतीय मनाला व्यक्तीपूजेचे वेड असल्याने कदाचित असे घडत असावे. काव्याच्या संख्येचाही परिणाम रसिकमनावर होत असतो. "बीं" काव्यसंग्रह अत्यंत अल्प म्हणजे अर्धशतकाच्या आतच आहे. त्यामुळेही त्यांच्याकडे दुर्लक्ष झाले असावे. "बीं"च्या काव्याकडे समिक्षकांनी, रसिकांनी जे अक्षम्य दुर्लक्ष केले आहे त्याचा परिणाम आमच्या समिक्षाशास्त्रावरही झालेला आहे.

"बीं"च्या प्रसिध्दीला आड येणारे कारण म्हणजे त्यांची प्रसिध्दीपराड्.मुख वृत्ती हे होय. एकमार्गी आयुष्यक्रम, थोडासा एकलकोंडा स्वभाव. या गोष्टीही त्यांच्या लोकप्रियतेच्या आड आल्या असतील. शिवाय कित्येक वर्षांपर्यंत नारायण मुरलीधर गुप्ते म्हणजेच "बी" कवी असल्याचे समजू दिले नाही. त्यामुळे त्यांच्या स्वभावाची ओळख झाली नाही.

शिवाय आजच्या परिस्थितीच्या काळात त्यांची कविता चटकन कानात भरण्यासारखी किंवा ओठावर खेळण्यासारखी नाही. त्यांच्या "चाफा" या कवितेतील "चाफा बोलेना। चाफा चालेना। चाफा खंत करी। काही केल्या फुलेना। ही शब्दरचना सुंदर व सुलभ आहे. पण सामान्य माणसाच्या ज्ञानाच्या किंवा अनुभवाच्या अटोक्यापार आहे. त्यामुळे हे ही भाग्य त्यांना मिळाले नाही.

१९३४ पर्यंत त्यांची थोडी फार उपेक्षा झाली पण "फुलांची ओंजळ" हा काव्यसंग्रह प्रसिध्द झाला आणि आचार्य अत्रे यांनी "बीं"च्या काव्यसंग्रहास प्रदीर्घ आणि अत्यंत उत्कृष्ट अशी प्रस्तावना लिहून "बीं"चा सत्कार केला. त्यावेळी "बीं" कवी हे "कवींचे कवी" आहेत असा त्यांचा उल्लेख करुन त्यांचा गौरव केला. त्यामुळे "बीं"ची उपेक्षा झाली असे वाटत नाही.

श्री.भालजी पेंढारकर यांनी "बीं"च्या "कमळा" काव्यावर आधारित "थोरातांची कमळा" हा चित्रपट काढला तर त्यांच्या "चाफा" या काव्याचे अनेकांनी रसग्रहण केले आहे तर श्रीपाद कृष्ण कोल्हटकर यांनी "बीं"ना "आधुनिक कवींतील भीष्माचार्य" अशी पदवी बहाल केली आहे.

श्री.ग.त्र्यं.माडखोलकरांनी "आधुनिक कवी पंचक" या टीकालेखात केशवसुत, विनायक, रे, टिळक, गोविंदाग्रज, बालकवी या पाच कवींच्या निवडक कवितांचा समावेश केला पण त्यांच्याच योग्यतेला बसण्याचा मान असूनही "बी" मात्र त्यातून वगळले. एकंदरित "बीं"वर काही टीकाकाराकडून कळत नकळत अन्याय झाला एवढे खरे. पण कालांतराने त्यांच्या काव्यगुणांची पारख रसिकांना झाली.

## 3.13 भाषाशैली -

"बीं"च्या ब-याच कवितांवर जुन्या मराठी वाङ्‌मयाच्या अध्ययनाचा परिणाम झालेला दिसून येतो. त्यामुळे त्यांच्या काव्यात उंफळ गदारोळ, हुंबर, महामूर, दिठी दीठ मिळणे, गात्रे पांगळणे अशा सारखे शब्द येतात. त्यावरुन त्यांच्या जुन्या वाङ्‌मयातील अभ्यासाच्या व्यासंगाची साक्ष पटते.

संत काव्यातील देशी शब्दकला तिने आत्मसात केली आहे. त्यामुळे त्यांच्या वाणीवर ज्ञानेश्वरांचा संस्कार झाल्यासारखे वाटते. संयमपणा

आणि प्रौढपणा यामुळे त्यांच्या शैलीला पक्वता आल्यासारखी वाटते. भाषेत प्रौढपणा असल्यामुळे त्यांच्या सर्व जाणीवा मग त्या काव्यविषयक तत्वज्ञानपर अथवा सामाजिक असोत त्या निश्चित ठरलेल्या आहेत.

त्यांची वाणी संस्कृतप्रचूर आहे पण बहुतेक कवितात त्यांची संस्कृत प्रचूर वाणीच परिपूरक झाल्याची आढळते. संस्कृत शब्दांऐवजी दुसरे साधे शब्द जर कवीने वापरले असते तर काव्याचे मोल कमी झाले असते. त्यांच्या काव्यात दीर्घसमास दिसून येतात. परंतु या दीर्घसमासातील शब्दांचा विग्रह करता येईल इतके ते सोपे आहेत. त्या दीर्घसमासामुळे यतिभंग झाल्याचे आढळून येते. परंतु त्यांचे स्पाइतके नादाकडे लक्ष नसल्यामुळे त्या दोषाची तीव्रता त्यांना वाटत नाही.

एखादी कल्पना मर्यादित शब्दात प्रकट करण्याची त्यांना आवड दिसते पण कमीत कमी शब्दात सौंदर्य व्यक्त करण्याच्या त्यांच्या या छंदामुळे त्यांच्या काव्यात साधेपणा दिसत नाही.

त्यांची वृत्ती रसिक असल्यामुळे त्यांच्या काव्यात कल्पना, भावना, विचार यांचा सुंदर मेळ घातलेला दिसतो.

"सोप्या सोप्या शब्दांनी रचलेली मंजुळ गाणी गाऊन रसिकांच्या अंतकरणात शिरण्याची इच्छा असूनही ही गोष्ट त्यांना साध्य झाली नाही. त्यांची वृत्ती चिंतनशील असल्यामुळे त्यांच्या काव्यात गूढ तत्वविचार येतात. त्यामुळे त्यांची शब्दयोजना पुष्कळ ठिकाणी क्लिष्ट व दुर्बोध वाटते.

आपल्या काव्यात अनेक ठिकाणी मात्रदोष आहेत याची त्यांना जाणीव होती ते म्हणतात -

"यतिभंग, मात्रादोष माझ्याहातून निष्काळजीपणाने झाले नाहीत. मला मात्रा कळत नाहीत, मात्रा मोजता येत नाहीत असे कसे बर म्हणता येईल। एवढेच की दुसऱ्या कशाच्या पेक्षा मी त्यांना जास्त महत्व देत नाही. प्राचीन काळापासून ते आजपर्यंत जी लोकगीते आहेत त्यात ज्याला

साधारणत: मात्रा म्हणतात त्यांचा नियम नसतो. कारण ज्या चालीवर ती गीते म्हटली जातात त्या चालीप्रमाणे ऱ्हस्व अक्षर दीर्घ होईल किंवा दीर्घ अक्षर ऱ्हस्व होईल."[४७] त्यांच्या काव्यातील यतिभंग क्लीष्टता हे दोष सोडले तर त्यांचे काव्य नि:संशय श्रेष्ठ दर्जाचे आहे.

3.१४ सा रां श -

या भागामधे "बी"च्या समग्र कवितांचे विवेचन केले आहे. त्यांचे व्यक्तिमत्व प्रभावी आणि प्रगल्भ असल्यामुळे त्यांच्या ठिकाणी अनेक काव्यात्मक गुणांचा संगम झालेला दिसतो. त्यांनी काव्याचा एकही प्रांत सोडलेला नाही. एकापेक्षा एक सरस अशा कविता त्यांनी लिहल्या आहेत.

आधुनिक कवितेवर टीकाकारांनी जे आक्षेप घेतले त्या आक्षेपांचे खंडण करण्यासाठी त्यांनी काव्यविषयक कविता लिहल्या. या काव्यविषयक कवितेत त्यांनी कवीचे महत्त्व, काव्यनिर्मितीची प्रक्रिया, काव्याचा हेतु आणि काव्यातील घटक यांची चर्चा काव्यातून केली आहे. "सौंदर्यची काव्य" अशी काव्याची व्याख्या केली आहे.

त्यांच्या सामाजिक कविता समाज सुधारणेच्या भावनेतून प्रेरित झाल्या आहेत. त्यांनी आपल्या काव्यातून समता, स्वातंत्र्य, बंधुत्व या तत्वत्रयीचा पुरस्कार केला आहे. मानवाच्या प्रगतीला विरोध करणाऱ्या सामाजिक रुढीवर जोरदार हल्ले चढविले आहेत.

राष्ट्रीय कवितातून मानवता, सन्प्रेरणा, समता हे भारतीय संस्कृतीचे गुण तिचे श्रेष्ठत्व त्यांनी भारतीयांच्या मनात काव्यातून ठसविण्याचा प्रयत्न केला आहे.

तर आपल्या प्रेम काव्यातून प्रेमाची उदात्तता गायिली आहे. प्रेमाकडे ते अधिक व्यापक दृष्टीने पहाताना दिसतात. त्यांची प्रेमगीते वैषयिकतेपासून सर्वस्वी अलिप्त आहेत.

"कमळा" सारखे कथाकाव्य रचून ऐतिहासिक वातावरण निर्माण केले आहे. तर "वात्सल्य" आणि "माझी कन्या" यातून वात्सल्याचा महिमा गायिला आहे.

मुळातच त्यांची वृत्ती चिंतनशील असल्यामुळे जीवन विषयक तत्वज्ञान अगदी हलक्या हाताने उकलून दाखविले आहे. स्वतंत्रपणे वेगळी काढून दाखविता येईल अशी त्यांची निसर्ग कविता नाही पण ज्या काही निसर्ग कविता लिहल्या आहेत त्या उत्कृष्ठ आहेत.

त्यांच्या भाषांतरित कवितातील भाषांतरे अगदी हुबेहुब साधली आहेत. त्यामुळे मुळ उघडण्याचे कारण पडत नाही.

तर डॉ.अ.ना.देशपांडे त्यांच्या शब्दभाडाराबद्दल म्हणतात, हा एखाद्या वीराने मुलुखगिरी करून पराक्रमाने धन लुटून आणावे त्याप्रमाणे "बीं"नी मराठीतून आणि संस्कृतातून वेचक आणि अर्थसौंदर्यवर्धक शब्दमणी आणून आपल्या भाषा सुंदरीला अनेक परीने शृंगारिले आहे."[४८]

त्यांच्या काव्यातील भाषेचा प्रौढपणा, विचारांचे गांभीर्य, नादमाधुर्य आणि उंच उंच भरा-या मारणारी त्यांची कल्पनाशक्ती हे सर्व गुण त्यांच्या काव्यात असल्यामुळे ते अजरामर झाले आहे. आचार्य अत्रे प्रस्तावनेत म्हणतात - " Bee कवींची कविता ही सोन्याच्या साखळ्या पायात घालून संगमरवरी जिन्यावरून उतरणारी एखाद्या मराठी राजघराण्यातील तेजस्वी राजकन्या आहे."[४९]

"विशेष उल्लेखनिय गोष्ट ही की, आधुनिक मराठी कवितेच्या विकासाचा फार मोठा टप्पा त्यांनी आपल्या उघडया डोळयांनी पाहिला होता. टिळक, गोविंदाग्रज, बालकवी यांनी आधुनिक कवितेला आणलेला बहर त्याच बरोबर रविकिरण मंडळाचे कार्य यालाच समांतर असणारे चंद्रशेखर तांबे यांचे काव्य कर्तुत्वच आणि अगदी अलीकडची मराठी नवकविता या सर्व अवस्था त्यांच्या नजरेसमोरून गेल्या

त्यामुळे श्री.कृ.कोल्हटकर त्यांना "आधुनिक कवितेतील भीष्माचार्य"[५०] अशी पदवी देतात.

यतिभंग आणि क्लिष्टता हे दोष सोडले तर त्यांचे काव्य नि:संशय श्रेष्ठ दर्जाचे आहे. त्यामुळे "बी"ची उपेक्षा झाली असे वाटत नाही.

3·?५

## संदर्भ आणि टीपा


| | | |
|---|---|---|
| १) | आचार्य अत्रे - | "फुलांची ओंजळ"<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>सातवी आवृत्ती १९७६<br>प्रस्तावना पृष्ठ क्र. १ |
| २) | डॉ. नाईकवाडे ज. धु. | राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता<br>प्रकाशक - भा. ल. कुलकर्णी, नागपूर<br>प्रथमावृत्ती - १९८९<br>पृष्ठ क्र. २५० |
| ३) | सौ. कर्णोकर निर्मला अनंत | बी कवी - चरित्र व काव्यचर्चा<br>प्रकाशक - ग. ल. ठोकळ, पुणे<br>पहिली आवृत्ती - १९७२<br>पृष्ठ क्र. ४२ |
| ४) | प्रा. पंडित भ. श्री. | आधुनिक कवितेचे प्रणेते भाग दुसरा<br>प्रकाशक - दि. मा. धुमाळ, नागपूर<br>प्रथमावृत्ती - १९७१<br>पृष्ठ क्रे. ३४५ |
| ५) | आचार्य अत्रे | "फुलांची ओंजळ"<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>सातवी आवृत्ती - १९७६<br>प्रस्तावना पृष्ठ क्र. १० |
| ६) | आचार्य अत्रे | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १० |

| | | |
|---|---|---|
| ७) | आचार्य अत्रे | तत्रैव<br>पृष्ठ क्र. १० |
| ८) | आचार्य अत्रे | तत्रैव<br>पृष्ठ क्र. ११ |
| ९) | डॉ. नाईकवाडे ज.धु. | राष्ट्रवाद आणि आधुनिक मराठी कविता<br>प्रकाशक - भा.ल.कुलकर्णी, नागपूर<br>प्रथमावृत्ती - १९८९<br>पृष्ठ क्र. २४९ |
| १०) | सौ. कणोकर निर्मला अनंत | बी कवी - चरित्र व काव्यचर्चा<br>प्रकाशक - ग.ल.ठोकळ, पुणे<br>पहिली आवृत्ती १९७२<br>पृष्ठ क्र. ४८ |
| ११) | आचार्य अत्रे | फुलांची ओंजळ - प्रस्तावना<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>सातवी आवृत्ती १९७६<br>प्रस्तावना पृष्ठ क्र. १८ |
| १२) | सौ. कणोकर निर्मला अनंत | बी कवी - चरित्र व काव्यचर्चा<br>प्रकाशक ग.ल.ठोकळ, पुणे<br>पहिली आवृत्ती १९७२<br>पृष्ठ क्र. ७२ |
| १३) | आचार्य अत्रे | फुलांची ओंजळ - प्रस्तावना<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>सातवी आवृत्ती १९७६<br>प्रस्तावना पृष्ठ क्र. २०-२१ |

१४) सौ.कणोकर निर्मला अनंत — बी कवी - चरित्र व काव्यचर्चा
प्रकाशक - ग.ल.ठोकळ, पुणे
पहिली आवृत्ती १९७२
पृष्ठ क्र.६३-६४

१५) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १३-१४

१६) सौ.कणोकर निर्मला अनंत — तत्रैव
पृष्ठ क्र. १४

१७) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक दि.मा.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१
पृष्ठ क्र. ३४०

१८) प्रा.पंडित भ.श्री. — तत्रैव
पृष्ठ क्र. ३४३

१९) डॉ.वाळिंबे रा.शं. — साहित्यातील संप्रदाय
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
तृतीयावृत्ती १९७४
पृष्ठ क्र. २१६

२०) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक - दि.मा.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती - १९७१
पृष्ठ क्र. ३४१

| | | |
|---|---|---|
| २१) | प्रा.पंडित भ.श्री. | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३४२ |
| २२) | प्रा.पंडित भ.श्री. | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३४२ |
| २३) | प्रा.पंडित भ.श्री. | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३४३ |
| २४) | प्रा.पंडित भ.श्री. | तत्रैव<br>पृष्ठ क्र.३४३ |
| २५) | सौ.कणोकर निर्मला अनंत | बी कवी - चरित्र व काव्यचर्चा<br>प्रकाशक - ग.ल.ठोकळ, पुणे<br>प्रथम आवृत्ती १९७२<br>पृष्ठ क्र.१०७ |
| २६) | सौ.कणोकर निर्मला अनंत | तत्रैव<br>पृष्ठ क्र.१०३ |
| २७) | देशपांडे अ.ना. | आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास<br>भाग पहिला<br>प्रकाशक स.कृ.पाध्ये<br>द्वितीयावृत्ती १९६७<br>पृष्ठ क्र.३४३ |
| २८) | आचार्य अत्रे | फुलांची ओंजळ<br>कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे<br>सातवी आवृत्ती १९७६<br>प्रस्तावना पृष्ठ क्र.२५ |

२९) देशपांडे अ.ना. आधुनिक मराठी वाङ्‌मयाचा इतिहास
भाग पहिला
प्रकाशक स.कृ.पाध्ये,
द्वितीयावृत्ती १९६७
पृष्ठ क्र. ३४४

३०) सौ.कणोकर निर्मला अनंत बी कवी - चरित्र व काव्यचर्चा
प्रकाशक - ग.ल.ठोकळ, पुणे
पहिली आवृत्ती १९७२
पृष्ठ क्र. १२०

३१) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. १२०-१२१

३२) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. ११९-१२०

३३) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. ११९

३४) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. ११८

३५) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. १२१

३६) सौ.कणोकर निर्मला अनंत तत्रैव
पृष्ठ क्र. १२१

३७) आचार्य अत्रे फुलांची ओंजळ
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती १९७६
प्रस्तावना पृष्ठ क्र. ३०

३८) देशपांडे अ.ना. — आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग पहिला
प्रकाशक स.कृ.पाध्ये,
द्वितीयावृत्ती १९६७
पृष्ठ क्र. ३४१

३९) आचार्य अत्रे — फुलांची ओंजळ
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती १९७६
प्रस्तावना पृष्ठ क्र. ३२

४०) आचार्य अत्रे — तत्रैव
पृष्ठ क्र. २८–२९

४१) सौ.कणोकर निर्मला अनंत — बी कवी – चरित्र व काव्य चर्चा
प्रकाशक – ग.ल.ठोकळ, पुणे
पहिली आवृत्ती – १९७२
पृष्ठ क्र. १४४

४२) प्रा.पंडित भ.श्री. — आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक – दि.मा.घुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१
पृष्ठ क्र. ३३५

४३) सौ.कणोकर निर्मला अनंत — बी कवी – चरित्र व काव्य चर्चा
प्रकाशक ग.ल.ठोकळ, पुणे
प्रथमावृत्ती १९७२
पृष्ठ क्र. १३८

४४) प्रा.पंडित भ.श्री. आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक - दि.मा.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१
पृष्ठ क्र.३३७

४५) आचार्य अत्रे फुलांची ओंजळ
प्रस्तावना
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती १९७६
प्रस्तावना पृष्ठ क्र.३२-३३

४६) सौ.कणेकर निर्मला अनंत बी कवी - चरित्र व काव्य चर्चा
प्रकाशक - ग.ल.ठोकळ, पुणे
प्रथमावृत्ती १९७२
पृष्ठ क्र.५७

४७) प्रा.पंडित भ.श्री. आधुनिक कवितेचे प्रणेते
भाग दुसरा
प्रकाशक - दि.मा.धुमाळ, नागपूर
प्रथमावृत्ती १९७१
पृष्ठ क्र.३४०

४८) देशपांडे अ.ना. आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग पहिला
प्रकाशक - स.कृ.पाध्ये, पुणे
द्वितीयावृत्ती १९६७
पृष्ठ क्र.३४७

४९) आचार्य अत्रे — फुलांची ओंजळ
कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे
सातवी आवृत्ती १९७६
प्रस्तावना पृष्ठ क्र. ३९

५०) देशपांडे अ.ना. — आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास
भाग पहिला
प्रकाशक स.कृ.पाध्ये
द्वितीयावृत्ती १९६७
पृष्ठ क्र. ३४८-३४९